

जुलै - डिसेंबर १९८८



महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

# हाकारा

पुणे



वर्ष : नववे। अंक : तिसरा - चौथा।

## प्रत्येक आदिवासी व्यक्तिने घ्यावयाची दक्षता.

१ . आपण कोणत्या जमातीचे आहोत हे समजून घ्यावे .

२ . आदिवासी जमाती किती व कोणत्या हे लक्षात घ्यावे .

३ . नावात थोडाफार सारखेपणा असणाऱ्या जाती आपल्या जमातीच्या नावावर खोटे दाखले मिळवून फायदा घेत नाहीनां ग्राकडे लक्ष द्यावे .

४ . एखादी व्यक्ति आदिवासी नाही परंतु ती त्या जमातीसाठीच असलेल्या सवलतीचा फायदा घेत आहे, अशी शंका आल्यास त्याबद्दल नांव, गांव, कामाचे ठीकाण, जात, इ . माहिती जबाबदार आदिवासी संघटना व जिल्हाधिकारी यांस लेखी कळवावी .

५ . शाळा - कॉलेजेसमधे आदिवासी म्हणून प्रवेश घेणाऱ्या खोटया आदिवासींचा शोध घ्यावा व ती माहिती जबाबदार आदिवासी संघटना व जिल्हाधिकारी यांना कळवावी .

६ . खात्री पटल्याशिवाय व कारण समजल्याशिवाय कोणासही नातेवाईक वा भाऊबंद असल्याचे लिहून देऊ नये .

७ . स्वत:चा शाळा सोडल्याचा व जातीचा दाखला दुसऱ्यास देऊ नये .

८ . आपल्यावर होणाऱ्या अन्याय - अत्याचाराची माहिती जबाबदार आदिवासी संघटनेस व जिल्हाधिकाऱ्यांना लेखी कळवावी .

९ . खोटया आदिवासींच्या पैश्याला व धाकदपटशा यास बळी पडू नये .

१० . संघटित होण्याची आवश्यकता सर्वांस पटवून द्यावी .

११ . आदिवासींसाठी असलेल्या सोयी - सवलतींचा अभ्यास, प्रसार व प्रचार करावा .


## महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद आणि हाकारा
## हार्दिक आभारी आहेत.

* महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ
* शिक्षण व युवक कल्याण मंत्रालय, भारत सरकार
* भारतीय सामाजिकशास्त्र अनुसंधान परिषद ; पश्चिम विभागीय केन्द्र
* आदिवासी विकास संचलनालय, महाराष्ट्र शासन .
* वनविकास महामंडळ, महाराष्ट्र .

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे त्रैमासिक.

# हाकारा

## अनुक्रमणिका


१) आदिवासी : रामचंद्र मुटाटकर ३
२) खोटया आदिवासींचा धोका : दादाभाऊ तळपे २६
३) झगडे - झेन्डे बंद २९
४) महादेव कोळ्यांचे सण आणि उत्सव : एक मानवशास्त्रीय दृष्टीकोण : लता बापट ३४
५) महाराष्ट्र राज्यातील वनविषयक सवलती व कल्याण योजना : सुधीर जोग ३७
६) आदिवासी विकास आणि शिक्षण : अनुताई वाघ ४९
७) आदिवांसीमधील सांस्कृतिक बदल आणि संघर्ष : डॉ. गोविंद गारे ५६
८) कविता ६३
९) पुस्तक परीक्षण ६८



वर्ष नववे : अंक तिसरा - चौथा.
जुलै - डिसेंबर १९८८
पत्रव्यवहाराचा पत्ता :
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
६४, आनंद पार्क, औन्ध,
पुणे - ४११ ००७

संपादक
रामचंद्र मुटाटकर.
सहसंपादक
उल्हास राजज्ञ.
लता बापट.

प्रकाशक
रा. के. मुटाटकर
सचिव
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
यांच्यासाठी
दयाल अँड असोशिएट
ए - ३३, एच् ब्लॉक,
एम्. आय. डी. सी.
पिंपरी, पुणे - ४११०१८.
येथे छापून प्रसिद्ध केले.
फोन : 82737


या अकांस महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृतीमंडळाकडून अनुदान प्राप्त झाले आहे.

पुणे विद्यापीठ

# मुक्त शिक्षण संस्था

आपली चाचणी परीक्षा हुकली आहे काय ?
असल्यास आपणांस पुन्हा एक संधी देण्यात येत आहे.
आपण पूर्वतयारी अभ्यासक्रमास योग्य ती फी देऊन
प्रवेश घ्या. प्रवेश अर्ज मिळविण्यासाठी सचिव,
मुक्त शिक्षण संस्था, पुणे विद्यापीठ, पुणे ४११ ००७
यांच्याशी त्वरित संपर्क साधा.

**पात्रता :-**

१) २० वर्षे पूर्ण असावीत.

२) १२ वी पास असल्यास प्रथम वर्ष बी.ए. / बी.कॉम. ला सरळ प्रवेश

**पूर्वतयारी अभ्यासक्रम :-**

अ) बी.ए. साठी समाजशास्त्र आणि सामान्य गणित.

ब) बी.कॉम. साठी वाणिज्य आणि सामान्य गणित.

**अभ्यासक्रमाची वैशिष्ट्ये : -**

* मराठीतून परिपूर्ण पाठयपुस्तके उपलब्ध.
* आधुनिक पद्धतीने इंग्रजी शिकण्याची सोय.
* बी. ए./बी. कॉम. चा पुनर्रचित अभ्यासक्रम उपलब्ध.
  यात पायाभूत, उपयोजित / व्यावसायिक अभ्यासक्रमांची सोय.
* अनुभवी प्राध्यापकांनी ज्येष्ठ तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली लिहिलेली स्वयं - अध्ययनास उपयुक्त पाठयपुस्तके.
* दृक् - श्राव्य माध्यमांचा व फितींचा अभ्यासासाठी विशेष उपयोग.
* नियमित मार्गदर्शनासाठी महाराष्ट्रातील प्रमुख शहरांत **अभ्यासकेंद्रे** व तज्ज्ञ प्राध्यापकांचे मार्गदर्शन.
* छोटे - मोठे अभ्यासक्रम सोयीनुसार पूर्ण करता येतील.
  प्रमाणपत्रे पदविका मिळतील.
* संगणक आणि इलेक्ट्रॉनिकी या विषयांतील व्यवसायात उपयुक्त अभ्यासक्रम, प्रात्यक्षिक करण्याची विशेष सोय.

संपर्क :- सचिव, मुक्त शिक्षण संस्था, पुणे विद्यापीठ, पुणे - ७.

# आदिवासी

## रामचंद्र मुटाटकर

नागर संस्कृतीपासून दूर व अलिप्त राहिलेले संबंधित प्रदेशातील मुळचे रहिवासी म्हणजे आदिवासी, असे सामान्यपणे म्हणता येईल. सर्वसाधारणपणे जंगलात, दुर्गम दऱ्याखोऱ्यांत व सुसंस्कृत समाजापासून तुटक असलेल्या प्रदेशात ते तुरळक वस्ती करून राहतात. नागर संस्कृतीचा त्याचप्रमाणे वर्गश्रेणीबद्ध समाजाचा संपर्क न झालेल्या वैशिष्ट्यपूर्ण चालीरीती किंवा 'संस्कृती' आदिवासींत आढळतात. अर्थात जगातील सर्व आदिवासी त्या त्या प्रदेशातील मूळ रहिवासी आहेतच, असे ठामपणे म्हणता येत नाही. परंतु दुसऱ्या सर्वमान्य संज्ञेच्या अभावी आदिम संस्कृतीची दर्शक अशी आदिवासी हीच संज्ञा रूढ झाली आहे. अनेक नागर संस्कृतीचे उदयास्त झाले, परंतु त्यांच्याशी संपर्क न साधल्यामुळे किंवा न आल्यामुळे आदिवासी जमाती जशाच्या तशाच राहिल्या. त्यांच्यात हजारो वर्षे विशेष परिवर्तन झाले नाही.

### इतर संज्ञा :

आदिवासी हा इंग्रजीतील 'ॲबॉरिजिनीझ्' या शब्दाचा रूढ मराठी पर्याय आहे. त्यांना वनवासी म्हणावे, आदिवासी म्हणू नये, असाही एक दृष्टिकोन आहे; आदिवासींची वेगळी अस्मिता किंवा संस्कृती नसून ते इतर नागरिकांप्रमाणेच आहेत, ते वनात वस्ती करून राहतात, एवढाच त्यांचा वेगळेपणा आहे, अशा प्रकारचा हा दृष्टिकोन आहे. बरेच आदिवासी गट डोंगरातून राहात असल्यामुळे त्यांना अलीकडे गिरिजन म्हटले जाते. एका विशिष्ट आदिवासी गटास जमात म्हणूनही संबोधण्यात येते; उदा., वारली जमात, ठाकूर जमात इ.

इंग्रजीत 'ॲबॉरिजिनीझ्' या शब्दाव्यतिरिक्त इतरही काही शब्द आहेत. 'प्रिमिटिव्ह' म्हणजे आदिम किंवा अप्रगत लोक आणि 'सॅव्हेज' म्हणजे मागासलेले किंवा रानटी लोक. 'प्रिमिटिव्ह' किंवा 'सॅव्हेज' या शब्दांतून आदिवासींचा मागासलेपणा, अज्ञान किंवा त्यांचा भोळेपणाही सूचित होतो. आदिवासी शब्दास निःसंदिग्ध अर्थ प्राप्त करून देणे, हे मानवशास्त्रातील आजही न सुटलेले कोडे आहे. आंतरराष्ट्रीय मजूर संघटनेने आदिवासींना तद्देशीय (इंडिजिनस) संबोधावे अशी शिफारस केली आहे; कारण आदिवासी संस्कृतीची घडण, इतर संस्कृतींच्या संपर्कावाचून स्वतंत्र रीतीने झाली आहे. अलीकडे त्यांना निरक्षर (नॉन्‌लिटरेट) समाज म्हणून संबोधण्याचीही शिफारस करण्यात येते. आदिवासी बोलींना लिपी नसते. त्यामुळे आदिवासी समाज निरक्षर असतात. अलीकडील मानवशास्त्रीय लिखाणात, आदिवासी समाजांचा निरक्षर समाज असाच उल्लेख करण्यात येतो.

### आदिवासींसंबंधीचे दृष्टीकोन व अध्ययन :


सर्वसाधारण समाजात आदिवासींबाबत भीतीयुक्त औत्सुक्य असते, प्राथमिक अर्थव्यवस्था असणारे, स्त्रियांचे जबरदस्तीने अपहरण करून त्यांच्याशी पाशवी वर्तन करणारे, स्वच्छंद लैंगिक संबंध ठेवणारे, वाटेल ते भक्षण करणारे, किंबहुना नरभक्षणाचीही खंत न बाळगणारे, तसेच जादूटोण्यावर श्रद्धा ठेवणारे, उघडेनागडे लोक म्हणजे आदिवासी, असा एक समज आहे. याउलट निसर्गाशी तादात्म्य पावलेल्या, स्वच्छंदी व स्वतंत्र वृत्तीच्या आणि आधुनिक जगाच्या संपर्कामुळे भ्रष्ट न झालेल्या आदिवासींचे जीवन सुखमय व अनुकरणीय आहे, हा विचारही विशेषतः पश्चिमी साहित्यात आग्रहाने मांडलेला आहे. काही विद्वानांच्या मते विज्ञानयुगात सभ्यतेचा प्रगतिशील विकास झाला असला, तरी त्यामुळे नैसर्गिक सुखांपासून माणसे दुरावतात. विज्ञानामुळे मिळालेल्या भौतिक सुखांपेक्षा त्यामुळे निर्माण झालेली मानसिक दुःखे अधिक आहेत. अर्थात आदिवासी जीवनाच्या सुखाची तरफदारी करणारे लोक फार थोडे आहेत.

भारतीय स्मृती - ग्रंथांत आदिवासी जमातींचा उल्लेख सापडतो. स्मृतिकारांनी त्या अनुलोम - प्रतिलोम संकरांतून निर्माण झाल्या, असे म्हटले आहे. परंतु त्यांतील शबर, रक्श, निषाद, किरात यांसारखे पुष्कळसे गट जाती नसून आदिवासी होते व त्यामुळे त्यांना हीन दर्जा प्राप्त झाला. रामायणात किरात, निषाद, शबर इ. आदिवासींचा उल्लेख आहे. बेटावर राहणारे, कच्चे मासे खाणारे व खाली मानवाचे नि वर वाघाचे शरीर असणारे, असा किरातांविषयीचा उल्लेख आहे. निषाद हे जंगलात राहणारे लोक, असा उल्लेख आहे. महाभारतात पुलिंद व किरात हे हिमालयात राहणारे आदिवासी, असा उल्लेख आहे. पुढे कलचुरी राजाविरूद्ध धिरू नावाच्या जमातीने बंड केल्याचा

उल्लेख चेदी राजांच्या शिलालेखात सापडतो. भारताच्या इतिहासात आदिवासी जमाती स्थानिक राजांच्या वतीने लढल्याची अनेक उदाहरणे आहेत. शिवाजीस रामोशी व कोळी जमातींचे बरेच साहाय्य झाले. आदिवासींची पिळवणूक करणाऱ्यांविरूद्ध बरीच बंडे झाली. १७७८ ते १९४७ च्या दरम्यान आसाम, बिहार, मध्य प्रदेश व आंध्र प्रदेश या राज्यांत सुमारे ७५ बंडे झाली. यांतील अधिकांश ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या विरूद्ध होती. महाराष्ट्रातही भिल्लांनी इंग्रजाविरूद्ध उठाव केला होता. १९५६ ते १९५८ च्या दरम्यान ठाणे जिल्ह्यात वारल्यांनी जमीनदारीच्या विरूद्ध बंड पुकारले होते.

अमेरिकेच्या शोधापासून पश्चिमी लोकांची आदिवासींकडे दृष्टी वळली. अमेरिकेत वसाहत करणाऱ्यांना स्थानिक आदिवासींशी वारंवार युद्धे करावी लागली. त्यावेळी यूरोपात आदिवासींच्या स्थितीबद्दल बरीच उलटसुलट चर्चा झाली. मॉन्टेनने आदिवासी संस्कृतीत ढवळाढवळ न करण्याचा सल्ला दिला होता. त्याच्या मते रानटी फुलांइतकेच आदिवासीही रानटी असतात.

सतराव्या शतकात आदिवासींच्या सुखमय जीवनावर आधारलेले बरेच ललित साहित्य लिहिले गेले. १६४० साली वॉल्टर हेमान्डने मादागास्कर बेटावरील लोक जगात सर्वात जास्त सुखी आहेत, असा निर्वाळा दिला. प्रख्यात फ्रेंच लेखक रूसो याने रानटी आदिमानवाच्या स्वतंत्र रम्य जीवनासंबंधी विचार मांडले व तेव्हापासून 'नोबल सॅव्हेज' या संज्ञेस प्रसिद्ध मिळाली. पुढच्या शतकात कॅप्टन कुक व इतर प्रवाशांच्या प्रवासवर्णनांतून हाच सूर निघतो. कॅप्टन कुकने ऑस्ट्रेलियाचे आदिवासी यूरोपीय लोकांपेक्षा फार सुखी आहेत, असे उद्गार काढलेले आहेत.




**पश्चिम आफ्रिकेतील कॅमेरून जमातीची कोरीव लाकडी तिवई.**

यूरोपीय साम्राज्यवादाचा जसजसा विस्तार झाला, तसतसा ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या कार्याचाही जोर वाढला. ख्रिस्ती मिशनऱ्यांनी वसाहतींतील लोकांना धर्मांतर करण्यास प्रवृत्त केले. साम्राज्यवादाच्या व ख्रिस्ती धर्माच्या प्रसाराबरोबर आदिवासी संस्कृतीचे अधिकाधिक अध्ययन सुरू झाले, किंबहुना त्यांच्यात धर्मप्रसार सुकर व्हावा, म्हणून त्यांच्या चालीरीतींचे काटेकोर अध्ययन करण्यात आले. तत्पूर्वी आदिवासी संस्कृतीची तुटपुंजी ओळख अनेकांच्या प्रवासवर्णनांतून दिलेल्या माहितीच्या आधारे झाली होती. आदिवासींच्या अगदी वेगळ्या आचारविचारांचे वर्णन सर्वसामान्य लोकांना गमतीदार वाटले.

डार्विनने आपला जैवविकासाचा सिद्धांत १८५९ साली मांडला; त्याप्रमाणे हर्बर्ट स्पेन्सरनेही सामाजिक संस्थासंबंधीचा विकाससिद्धांत प्रतिपादन केला. मानवाप्रमाणेच मानवी संस्थाचाही विकास कोणत्यातरी तत्त्वानुसार झाला असावा, हे उघड आहे. मानवप्राणी जर एकाच जातीचा आहे, तर त्याच्या विभिन्न संस्कृती का, या प्रश्नाचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न कसोशीने करण्यात आला. आदिवासी समाज शतकानुशतके आधुनिक सभ्यतेपासून दूर अशा दऱ्याखोऱ्यांतून जगत असल्याने आदिवासींच्या संस्थांचे अध्ययन केल्यास, त्यावरून मानवी संस्थांच्या उगमाबद्दल व विकासाबद्दल निश्चित कल्पना मांडता येतील, असे सुरवातीच्या मानवशास्त्रज्ञांस वाटले. त्या अनुषंगाने अमेरिका, आफ्रिका, आशिया व ऑस्ट्रेलियातील आदिवासींच्या संस्कृतींचे अध्ययन करण्यात आले. मानवशास्त्रीय सिद्धांत या अध्ययनावर आधारलेले आहेत. आदिवासी संस्कृतीत साम्यवादी अर्थव्यवस्था व समाजव्यवस्था होती, असे मत ल्यूइस मॉर्गन या अमेरिकन मानवशास्त्रज्ञाने प्रथम मांडले, तिचा ऱ्हास होऊन पुढे दास्यश्रमाधिष्ठित प्राचीन व्यवस्था, सरंजामशाही व नंतर भांडवलशाही यांचा उदय झाला. हे मत मार्क्सवाद्यांनी उचलले, परंतु त्यानंतर झालेल्या आदिवासींच्या तपशीलवार अध्ययनाने हे मत निराधार ठरले. मानवशास्त्रामुळे आदिवासींच्या अध्ययनास महत्त्व प्राप्त झाले आहे. मानवशास्त्रज्ञांच्या मते आधुनिक जटील संस्कृतींचा अभ्यास करण्यापूर्वी आदिवासींच्या साध्या व बिनगुंतागुंतीच्या संस्कृतींचा अभ्यास जास्त सयुक्तिक ठरतो; कारण साध्या संस्कृतीचे अध्ययन केल्याने मानवी व्यवहाराची मूलभूत तत्त्वे शोधून काढणे व त्यांच्या आधारे जटिल संस्कृतींना समजून घेण्याचा प्रयत्न करणे, अधिक सोपे

व उपयुक्त होते. मानवसमाजाच्या सर्व घटकांचा सारखा विकास घडवून आणण्यासाठी आदिवासींचीही प्रगती करावी, या मानवतावादी दृष्टिकोनानुसारही आदिवासींविषयक अध्ययनास अलीकडे महत्त्व प्राप्त झाले आहे.



मध्यभारतातील माडिया जमातीचे गव्याच्या शिंगाचे शिरोभूषण.

## आदिवासींची ठळक वैशिष्ट्ये :

आदिवासी समाजांसंबंधी भरपूर संशोधन व लिखाण झाले असले, तरी आदिवासी या संज्ञेची एकही सर्वमान्य व्याख्या करता आलेली नाही. आदिवासी जमातींची काही ठळक वैशिष्ट्ये अशी : (१) एक एक आदिवासी जमात एका विशिष्ट भूप्रदेशात राहाते व तो भूप्रदेश क्षेत्रफळाच्या दृष्टीने प्रगत समाजाच्या प्रदेशाच्या मानाने लहान असतो. आदिवासी क्षेत्र इतर प्रगत समाजापासून दूर किंवा जंगलात असते. रस्त्यांच्या अभावी तो प्रदेश दुर्गम असतो. (२) आदिवासी जमात साधारणपणे अंतर्विवाही असते व तिचे बहिर्विवाही कुळींत विभाजन झालेले असते. समाजातील गट लहान असतात व ते नातेसंबंधावर आधारलेले असतात. या गटांचे सदस्यत्व आधुनिक समाजातील मंडळाच्या (क्लब) सदस्यत्वाप्रमाणे ऐच्छिक नसते. (३) प्रत्येक आदिवासी जमातीची स्वतंत्र पंचायत असते. आदिवासी समाजाचे नियंत्रण पूर्णपणे पंचायत किंवा त्यांचा मुखिया करतो. (४) एकेका आदिवासी जमातीची बहुधा स्वतंत्र भाषा वा बोली असते. (५) आदिवासींचा धर्म क्षेत्रीय म्हणजे त्यांच्या निवासस्थानापुरता मर्यादित असतो; त्यांची तीर्थक्षेत्रेही त्यांच्या भागातच असतात. (६) आदिवासी अर्थव्यवस्थेत गटवार श्रमविभाजनाचा वा धंदेवार भिन्न सामाजिक गटांचा अभाव असतो. सर्व लोक सर्व प्रकारची कामे करतात. याशिवाय आदिवासी अर्थव्यवस्थेत उत्पादनाची साधने प्राथमिक स्वरूपाची असतात. पाटा-वरवंटा, सापळे, जाळी, आकडे, गळ, दोऱ्या, टोकदार व धारदार दांडकी, हातोडा, कोयता ह्यांसारखी प्राथमिक अवजारेच वापरात असतात. अर्थव्यवस्थेतील उत्पादन - वितरण - सेवन या तीन टप्प्यांपैकी वितरण म्हणजे मालाची वा उत्पन्नाची सार्वत्रिक देवघेव, हा टप्पा आदिवासी अर्थव्यवस्थेत नसतो. उत्पादन कमी असल्यामुळे बाजारपेठाही नसतात. जो तो आपापल्या उत्पादनाचा उपभोग घेतो. त्यांची अर्थव्यवस्था बहुधा नाणे इ. चलनावाचून चालणारी व वस्तुविनिमयाधिष्ठित असते. वस्तुविनिमय म्हणजे उपयुक्त वस्तूंची देवघेव. (७) आदिवासी समाजात परंपरेला प्राधान्य असते. परंपरेचा ठेवा एक पिढी दुसऱ्या पिढीस कथा, काव्य, नृत्य इ. माध्यमांद्वारे देते. (८) धर्मात निसर्गपूजेस व जादूसारख्या क्रियाकल्पास महत्त्व असते. (९) आदिवासी समाजात परंपरा व सामाजिक नियंत्रण यांवर भर असल्याने सर्व लोकांच्या वागण्यात सारखेपणा असतो. दैनंदिन व्यवहारातील ठराविक चाकोरीमुळे सवयी व चालीरीती बनतात. एकंदरीत समाजात एकजिनसीपणा जास्त आढळतो. (१०) आदिवासी समाज बरेचसे स्वयंकेंद्रित असतात; त्यांचे आर्थिक, सामाजिक व धार्मिक जीवन बाह्यसंपर्कापासून शतकानुशतके अलिप्त राहिल्याने स्वंयकेंद्रितता येणे स्वाभाविक आहे. जगातील सर्व समाज पूर्वी आदिवासी अवस्थेत होते. पुढे ते ग्रामीण समाज झाले. नंतर राज्यसंस्था आल्यानंतर राजधान्या व व्यापारी पेठा झाल्या व त्यामुळे नागरीकरणास प्रारंभ झाला. औद्योगिक क्रांतीनंतर संपूर्ण नागरीकरणाच्या दिशेने मानवी समाज वाटचाल करू लागले आहेत, असे प्रख्यात मानवशास्त्रज्ञ रॉबर्ट रेडफिल्डचे मत आहे. आधुनिक काळात त्यामुळेच निर्जमातीकरणाची प्रक्रिया सुरू होऊन आदिवासी समाजांचे ग्रामीण समाजावस्थेत रूपांतर होऊ लागले आहे.


## आदिवासी अर्थव्यवस्था :

आदिवासी अर्थव्यवस्थेत पैशाचे चलन नसते; वस्तूंची देवाणघेवाण होते. एका जर्मन अर्थशास्त्रज्ञाच्या मते आदिवासी प्राक्-आर्थिक स्थितीत आहेत. व्यक्तीने स्वत:पुरते अन्न गोळा करावयाचे, हाच एक आर्थिक व्यवसाय आदिवासी समाजात आहे, हे म्हणणे बरोबर नाही. अन्नाचा प्रश्न आदिवासी समाजात सामाजिक प्रश्न समजला जातो व त्याप्रमाणे तो हाताळला जातो. कौटुंबिक जबाबदाऱ्या, नातेसंबंध, शेजारधर्म, वडिलांचा व मुखियांचा मान, कुळीचे आचारधर्म, निषेधनियम, पूर्वज व देवता या सर्वांचाच विचार

आर्थिक व्यवस्थेत केला जातो.

कामाकरिता काम किंवा पैशांकरिता काम, असा व्यवहार आदिवासी समाजात नसतो. ज्या व्यक्तिचे काम असेल, त्यास कामास मदत करणे इतरांचे कर्तव्य ठरते. किती वेळ काम केले, यावरून मोबदला ठरविण्यात येत नाही; कारण सर्वसाधारणपणे आदिवासी समाजात वेळेस विशेष महत्त्व नसते. आदिवासी आळशी असतात असे नाही, तर ते गरजेनुसार काम करतात येवढेच. अन्न, वस्त्र व निवारा या मूलभूत गरजांच्या पूर्तीसाठीच त्यांचे आर्थिक व्यवहार होतात. सगेसोयरे व पूर्वज यांचा मान, अतिथ्य, दीक्षाविधी, विवाह, सामाजिक दर्जाचे दिग्दर्शन यांसारख्या इतर गोष्टींनीही आदिवासींचे आर्थिक व्यवहार प्रेरित केले जातात.

आदिवासी समाजातील श्रमविभाजन व्यावसायिक - सामाजिक गटवारीवर आधारलेले नसते; ते लिंग - भेदावर आधारलेले असते. प्रत्येक व्यक्तिस शेती, मासे - मारी, सुतारकी इ. व्यवसाय कमीजास्त प्रमाणात यावे लागतात वा येत असतात, त्यामुळे सहकार हे आदिवासी जीवनाचे ब्रीद आहे. तसेच आदिवासी उद्योगांत तांत्रिक व धार्मिक क्रियांचा फार जवळचा संबंध असतो. शेती, मासे - मारी किंवा होडयांचे उत्पादन, प्रवास इत्यादीशी धार्मिक विधी निगडित असतात. वस्तुविनिमयातही गिऱ्हाईक कोण आहे, त्याचा दर्जा काय आहे इ. घटक लक्षात घेतले जातात. स्वतःचा मोठेपणा दाखविण्यासाठी दुसऱ्याने दिलेल्या देणगीपेक्षा अधिक भारी किमंतीच्या देणग्या दिल्या जातात. वस्तूची किमंत तिच्या विनिमयक्षमतेवरून न ठरविता तिच्या उपयोगावरून ठरविली जाते. काही आदिवासी समाजांत मात्र काही पदार्थांचा चलन म्हणून उपयोग करतात : निकोबार बेटात नारळ, आफ्रिकेत कवडया किंवा भाल्याची पाती, सॉलोमन बेटांवर व न्यू गिनीत डुक्कर, फिजी बेटात व्हेल माशाचा दात, बोर्निओत मेण किंवा भारताच्या अरूणाचल प्रदेशात मिथान नावाचा प्राणी इत्यादींचा चलन म्हणून उपयोग करण्यात येतो. विवाहात वा धार्मिक समारंभांत दान देण्यासाठी अशा चलनाचा उपयोग होतो.



**नैऋत्य पॅसिफिकमधील न्यू हेब्रिडीझ या बेटांवरील आदिवासींचा डुक्कर मारण्याचा मोगरा.**

## अन्नसंपादन :

अन्नसंपादन दोन प्रकारे केले जाते : अन्न गोळा करणे व अन्नाचे उत्पादन करणे. अन्न गोळा करण्याचे तीन प्रकार असतात : शिकार, मासेमारी व इतर अन्न पदार्थांचे अर्जन. प्रत्येक आदिवासी जमातीत हे प्रकार आढळतात. मात्र त्यांचा कमीअधिक उपयोग नैसर्गिक परिस्थितीवर अवलंबून असतो. अन्न उत्पादनही तीन प्रकारे केले जाते : (१) गुराढोरांचा उपयोग न करता केवळ स्वतःच्या अंगमेहनतीने धान्य पिकविणे. (२) गुरेढोरांच्या मदतीने शेती करणे. (३) केवळ दुभत्या जनावरांवर निर्वाह चालविणे.

अन्न गोळा करणाऱ्या जमाती सांस्कृतिक दृष्ट्या एकमेकांपासून भिन्न असल्या, तरी त्यांची काही समान वैशिष्ट्ये दिसून येतात : (१) त्यांत लोकसंख्येची घनता कमी असते. पॅसिफिकचा उत्तर किनारा व अमेरिकेचे सपाट मैदान यांतील काही जमातींचा यास अपवाद आहे. (२) हे समाज लहान व काही अपवाद सोडल्यास भटके असतात. (३) हे समाज स्वावलंबी कुटुंबांच्या संघांनी बनलेले असतात. त्यामुळे समाजनियंत्रण नातेसंबंधांवर आधारलेले असते, ते राजकीय पातळीवर संघटित झालेले नसते. (४) हे समाज दूरच्या व दुर्गम प्रदेशात राहतात; किंबहुना हळूहळू त्यांची अशा प्रदेशात हकालपट्टी झालेली असते. त्यामुळे त्यांच्यातील संस्कृतिपरिवर्तनाचा वेग फारच मंद आहे.

## शिकार :

ऑस्ट्रेलियन आदिवासी कांगारू व तत्सम प्राण्यांची शिकार करतात. एस्किमो हिवाळ्यात सील व वॉलरसची शिकार करतात, तर उन्हाळ्यात कॅरिबू नावाच्या प्राण्याची पारध करतात. वेगवेगळ्या प्रकारच्या शिकारीकरिता वेगवेगळ्या प्रकारची हत्यारे वापरावी लागतात. अमेरिकेत सपाट प्रदेशात राहणारे रेड इंडियन लोक शिकारीसाठी रानरेडयांच्या कळपात लांडग्याचे रूप घेऊन शिरतात. कॅलिफोर्नियाचे

आदिवासी हरणाची शिकार करण्यासाठी अंगावर हरणाचे कातडे पांघरतात. दक्षिण आफ्रिकेचे बुशमन लोक शहामृगाची शिकार करण्यास शहामृगासारखे सोंग आणतात. एस्किमो लोक प्राण्यांच्या नराचा वा मादीचा आवाज काढून त्यांच्या जोडीदारास आपल्याजवळ येण्यास आकृष्ट करतात. शिकार बहुतेक गटागटाने केली जाते. हाकारून प्राण्यास जाळ्यात पकडण्याचे प्रकार सर्व आदिवासी जमातींत सापडतात. ससांची शिकारही या पद्धतीने केली जाते. याकरिता सापळे, जाळी, खंदक आदींचा उपयोग करण्यात येतो. बहुतेक आदिवासी जमाती शिकारीत कुत्र्यांची मदत घेतात.

## मासेमारी :

उत्तर पॅसिफिक, ब्रिटिश कोलंबिया दक्षिण अलास्कातील आदीवासींचे मासे हेच मुख्य अन्न असते. या लोकांना एकाच ठिकाणी राहता येते. शिकाऱ्यांप्रमाणे भटकावे लागत नाही. मासे पकडण्याकरिता भाले, आकडे व जाळ्यांचा उपयोग करतात. तसेच त्यांना बेशुद्ध पाडण्याकरिता विषारी वनस्पतीही वापरतात.

## अन्न गोळा करणे :

जंगलात सापडणारी विविध फळे हे आदिवासींचे बहुतेक ठिकाणी मुख्य अन्न असते. जंगलातील फळे गोळा करणाऱ्या आदिवासींची संख्या उत्तर अमेरिकेत जास्त आहे. बी, बोरे, कंद गोळा करणाऱ्यांना त्यांच्यातील कडवटपणा किंवा विषारीपणा घालविण्याचे प्रकार माहीत असतात. या लोकांनाही ऋतुमानाप्रमाणे भटकावे लागते. भारतात मध्य प्रदेशातील कमार व आंध्र प्रदेशातील चेंचू या जमाती अशा प्रकारे अन्नपदार्थ गोळा करतात.




ऑस्ट्रेलियन आदिवासींच्या बूमरँगचा एक नमूना.

## पशुपालन :

आशियात किरगीज व कझाक हे गोपालन करणारे प्रसिद्ध लोक आहेत. भारतातील निलगिरी पर्वतप्रदेशात तोडा जमातीचे लोकही पशुपालनावर उपजीविका करतात. महाराष्ट्रातील धनगर याच सदरात येतात. बहुतेक गोपालकांना ऋतुमानाप्रमाणे एका प्रदेशातून दुसऱ्या प्रदेशात जावे लागते. एस्किमो, लॅप व तुंगूस या लोकांनी रेनडियरचे पालन करून ते एक उपजीविकेचे साधन बनविले आहे. गोपालक व शेती करणाऱ्या लोकांत नेहमीच वितुष्ट येत असते. आफ्रिका, आशिया खंडांतील गोपालकांनी शेतकरी समाजांचा पराभव करून राज्ये स्थापल्याची उदाहरणे इतिहासात आहेत.

## वस्त्र व निवारा :

एस्किमो लोक हिवाळ्यात बाहेर काम करताना नीट शिवलेले फरचे कपडे नखशिखांत वापरतात, पण ते आपल्या घरात पाहुण्यांच्या देखतही उघडेनागडे वावरतात. त्यांचेच शेजारी लॅब्रॅडॉरचे नास्कापी इंडियन हात व चेहरा सोडून इतर अवयव उघडे टाकणे असभ्यपणाचे समजतात. नीती-अनीतीच्या कल्पना सापेक्ष असल्याने त्यांचा वस्त्रालंकारावरही परिणाम होतो. हैदा इंडियनांत स्त्रीचे शरीर उघडे राहिले, तरी त्यात तिला विशेष लज्जा वाटत नाही; पण ओठांच्या अलंकरणाशिवाय ती इतराच्या नजरेत पडली, तर तिला लाज वाटते. आफ्रिकेतील मुसलमानांत स्त्रीचे स्तन दिसले, तर त्यात विशेष वावगे मानत नाहीत; पण अगदी जवळचे नातेवाईक सोडल्यास तिचा चेहरा दुसऱ्यास दिसणे वावगे मानतात. शरीराचे रक्षण करण्यासाठी ओना जमातीचे लोक माती व मेण यांचे मिश्रण अंगास लावतात. सॅन फ्रॉन्सिस्कोजवळील आदिवासी थंडीपासून बचाव करण्यासाठी अंगास चिखल माखतात. वस्त्रांचा उपयोग आपला सामाजिक दर्जा दाखविण्यासाठीही केला जातो.



मध्य भारतातील मुडिया जमातीचा घंटिकायुक्त तंबाखू - बटवा.

आदिवासी लोक अलंकार तर वापरतातच; पण त्याशिवाय आपले शरीर रंगवितात, गोंदवतात व डाग देऊन त्यावर आकृत्याही काढतात. पॉलिनीशियात उच्च पदाधिकारी आपले सर्व शरीर गोंदवून घेतो.

ऑस्ट्रेलियातील आदिवासींच्या काळेपणामुळे गोंदवलेले दिसत नाही, म्हणून ते कातडीस डाग देऊन त्यावर आकृत्या काढून घेतात. ओशिॲनियात पांढरे दात विद्रूप समजले जातात, त्यामुळे सर्व लोक दात काळे करण्याचा प्रयत्न करतात. तसेच केस, नखे इत्यादींनाही वेगवेगळी रूपे देण्याच्या पद्धती आढळतात. लाकूड, दगड, हाड व कवडी यांचा उपयोग अलंकार बनविण्यासाठी करण्यात येतो. रंगीत बिया, मणी, पिसे यांचाही अलंकार म्हणून उपयोग केला जातो

आदिवासींची घरे दोन घटकांवर अवलंबून असतात : (१) नैसर्गिक परिस्थिती व तीतून घर बांधण्याकरिता मिळणारी सामग्री. (२) अन्नोत्पादनाचे स्वरूप. भटक्या लोकांना आपली घरे सहजासहजी हलवता येतील, अशीच तयार करावी लागतात. अपशी लोक बांबू गवत व कातडी यांचा उपयोग करून घुमटाकार घर बनवितात. ईशान्य कॅनडातील मॅकेंझी भागातील इंडियन कातड्याचे तंबू वापरतात. हैदा आदिवासींची घरे सु. ११ मी. रूंद व १४ मी. लांब असतात व छप्पर उंचीला दाराजवळ सु. २ मी. व मध्ये सु. ३ मी. असते. जवळजवळ दहा खांबांवर हे छप्पर उभे असते. भिंती लाकडाच्या असतात. घरांच्या जुळवणीत खिळ्यांचा वापर करण्यात येत नाही. झाडांच्या सालींनी खांब बांधले जातात. महाराष्ट्रातील भिल्लांच्या घरांना कुडाच्या भिंती व गवती छप्पर असते. अरूणाचल प्रदेशातील आदिवासींची घरे बांबूंवर अधांतरी बांधलेली असतात.

## मालमत्तेचे स्वरूप :

आदिवासी समाजात मालमत्तेचे स्वरूप अधिकांशांनी सार्वजनिक असते, त्यामुळे त्यांची अर्थव्यवस्था साम्यवादी आहे, असा दावा बऱ्याच वेळा करण्यात येतो. अनेकदा आदिवासी खेडेगाव हे एका विस्तारित कुटुंबाचे, नातेसंबंधीयांचे वा एकाच कुळीच्या लोकांचे बनलेले असते. अशा खेड्यात मालमत्ता सार्वजनिक असली, तरी ती साम्यवादी म्हणता येत नाही. आदिवासी समाज हा स्वावलंबी जीवन व्यतीत करत असल्यामुळे एकमेकांशी सहकार्य केल्याशिवाय तो जगूच शकत नाही. नदीच्या काठी नाव रिकामी असल्यास तिचा वापर कोणीही करू शकतो. शिकारी टोळ्या जमिनीच्या हद्दी वाटून घेतात. तसेच मासेमारी करणारे लोकही पाण्याचा प्रवाह वाटून घेतात. आदिवासी समाजात सामाजिक, आर्थिक व धार्मिक जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी एकमेकांना देणग्या देण्यावर भर असतो. देवाचे, नातेवाईकांचे व बदनामीचे भय वाटून देणग्या देतात. त्यांची काही काळानंतर परतफेडही केली जाते. अशा प्रकारच्या व्यवहारांमुळे आदिवासी अर्थव्यवस्था साम्यवादी असल्याचा भास होतो.

मेलानीशियातील ट्रोब्रिआंड बेटावरील आदिवासींत दोन प्रकारच्या वस्तूंद्वारा विनिमय चालतो. त्या म्हणजे हातातील पांढऱ्या कवड्यांची कंकणे व गळ्यातील लाल कवड्यांच्या माळा. या वस्तूंचा दागिने म्हणून क्वचितच उपयोग करण्यात येतो. त्यांचे उत्पादनही मोठया प्रमाणावर करण्यात येते. या विनिमयात निरनिराळ्या बेटांवरील आदिवासी भाग घेतात. अलंकारांबरोबर उपयोगी वस्तू भेटीदाखल देण्यात येतात. दुसऱ्या बेटावर भेटी नेण्याकरिता नवीन नावा बांधण्यात येतात व त्यांना समारंभपूर्वक निरोप देण्यात येतो. अशा रीतीने देणग्यांच्या रूपाने त्या भागात व्यवहार चालतो. यास कुला म्हणतात. सहकार करणे व देणग्यांच्या देवाणघेवाणीने संबंध टिकविणे, हे आदिवासी अर्थव्यवस्थेचे सूत्र दिसते.


## सामाजिक संघटना :

सामाजिक संघटना व्यक्तींच्या समाजमान्य परस्परसंबंधावर आधारलेली असते. समाजमान्य संबंधातून सामाजिक गटांचा जन्म होतो. आधुनिक समाजात ऐच्छिक संबंधांवर आधारलेले बरेच गट आढळतात. आदिवासी जमातींत बहुसंख्य गट नातेसंबंधांवर आधारित असतात.

## आदिवासी कुटुंब :


कुटुंब हा मानवसमाजातील सर्वात महत्त्वाचा नातेगट असतो. सर्व नातेसंबंधांस कुटुंबापासून सुरूवात होते. कुटुंब द्विपक्षीय नातेसमूह असतो. माता व पिता या दोहोंच्या नातेवाईकांशी व्यक्तीचा संबंध येतो. समाज पितृनामी, पितृसत्ताक, पितृनिवासी, पितृवंशी किंवा मातृनामी, मातृसत्ताक, मातृनिवासी, मातृवंशी असतो. याचा अर्थ पितृवंशी समाजात व्यक्तीचा मातृसंबंधीयांशी नातेव्यवहार राहत नाहीत, असा नाही. रोजच्या व्यवहारात व समारंभात दोन्ही बाजूंच्या नातेवाईकांचा संबंध येतो. अमेरिकेतील मातृनामी होपी आदिवासी जमातींत आडनाव आईकडून घेतले जाते, पण व्यक्तीचे नाव पित्याच्या

नातेसमूहातून सुचविण्यात येते. तसेच मातृनामी उत्तर अमेरिकेतील हिदस्ता जमातीत पवित्र वस्तू पित्याकडून पुत्रास मिळतात. पित्याच्या नातेवाईकांस देणग्या दिल्या जातात व अंत्यसंस्कार पितृनातेसंबंधीयाकरवी करण्यात येतात. द. आफ्रिकेतील पितृनामी थोंगा जमातीत वधूला मिळालेल्या देणग्यांचा काही हिस्सा तिचा मामा घेतो. तसेच तो भाच्याशी निगडित असलेल्या समारंभात प्रामुख्याने भाग घेतो. तसेच मामाच्या मिळकतीवर भाच्याचा हक्क पोचतो. क्वचित विधवा मामीही भाच्याजवळ येऊन राहते. या उदाहरणांवरून प्रत्यक्ष व्यवहारात दोन्ही बाजूंच्या नातेसंबंधांचे महत्त्व कळून येते. मातापित्यांचे अपत्यांवर प्रेम तर असतेच, शिवाय त्यांचा एक आर्थिक सहकारी गट निर्माण झालेला असतो. यास बीजकुटुंब म्हणतात. विवाह केवळ लैंगिक सुखाकरिता केला जात नाही. विवाहामुळे एक आर्थिक समूह घडविला जातो. काही आदिवासी विवाहबाह्य संबंध ठेवू शकतात; पण स्वयंपाक करावयास, मातीचा भांडी बनविण्यास, चटया विणण्यास त्यास सहचारिणी हवी असते. तो तिला राहण्यास घर व अन्न देतो. ऑस्ट्रेलियातील क्विन्सलँड प्रदेशात पुरूष मासळी व शिकार पुरवितो, तर स्त्री लहान मासळी, कंद व फळे गोळा करते. आदिवासी जमातींत स्त्रीपुरूषांचे श्रमविभाजन दिसून येते. कोणत्याही प्रकारचा विवाह असला, तरी आदिवासींत बीजकुटुंब हाच मूलगामी गट असतो.




**उत्तर अमेरिकेतील इंडियन जमातीची कुत्रा - गाडी**

कुटुंबाची एकी टिकविण्यास एकत्रनिवास फार महत्त्वाचा असतो; विवाहानंतर वधूने वराच्या घरी जाऊन राहणे किंवा वराने वधूकडे जाऊन राहणे किंवा दोघांनीही नवीन ठिकाणी निवास करणे, असे निवासाचे तीन प्रमुख प्रकार आहेत. निवासप्रकारांवर नातेसंबंधांची घडण अवलंबून असते. पितृनिवासी पद्धती असलेल्या समाजात एका बाजूचे सपिंड नातेसंबंधी एका ठिकाणी राहतात व त्यांच्यात जास्त जवळीक निर्माण होते. त्यांतूनच पुढे घराणे, कुळी इ. नातेगट निर्माण होतात. पितृनिवासी पद्धतीत पुरूषांच्या बाजूचे संबंध जास्त घनिष्ठ होतात. मातृनिवासी पद्धतीत जावई दुसऱ्या कुटुंबात आलेला असतो. अशा कुटुंबात सत्ता मामाच्या हातात असते व तो कुटुंबाचे निर्णय घेतो. मातृनिवासी पद्धतीच्या हिदस्ता, नैऋत्य आफ्रिकेतील ओव्हांबो व आसाममधील खासी जमातीत विवाहानंतर काही वर्षांनी त्या जोडप्याला नवीन निवास स्थापण्यास मदत केली जाते. पितृनिवासी आदिवासी जमातींतही वधूमूल्य देण्याची ऐपत नसल्यास, जावयास सासुरवाडीस काही वर्षे काम करून, देणे चुकते करावे लागते. निवासाचे नियम काहीही असले, तरी त्यांत परिस्थितीप्रमाणे बदल शक्य असतो व त्यामुळे दोन्ही बाजूंचे नातेसंबंध सांधले जातात.



शरीरावरील दर्दुराकृती रंगचित्रण : उत्तर अमेरिकेच्या पॅसिफिक किनाऱ्यावरील क्वाकिउट्ल जमात.

पतिपत्नीमधील श्रमविभाजन वेगवेगळ्या आदिवासी जमातींत वेगवेगळे असते. पुरूषांनी आणलेल्या शिकारीत स्त्रिया कंद, लहान मासे इत्यादींची भर टाकतात. शिवाय त्या अल्पशी शेतीही करतात. अमेरिका, आफ्रिका व ओशिॲनियात



**शरीरावरील अस्वलाकृती रंगचित्रण : उत्तर अमेरिकेच्या पॅसिफिक किनाऱ्यावरील क्वाकिउट्ल जमात.**

मळ्याचे काम स्त्रियांकडेही असते. उत्तर अमेरिकेत चामडी कमावण्याचे काम स्त्रिया करतात, तर आग्नेय अमेरिकेत ते काम पुरूष करतात. अमेरिकेच्या उत्तर ॲरिझोनातील होपी जमातीत कापड विणण्याचे काम पुरूषांचे असते, तर शेजारच्या नॅव्हाहो जमातीत ते काम स्त्रिया करतात. सर्वसाधारणपणे हातांनी बनविण्याजोगी मातीची भांडी स्त्रिया तयार करतात, तर पुरूष चाकावर भांडी घडवितात. भारतातील तोडा जमातीत स्त्रियांना म्हशींच्या गोठयात जाण्यास मज्जाव असतो, इतकेच नव्हे, तर दुधाचा कोणताही पदार्थ त्या शिजवत नाहीत.

आदिवासी कुटुंबात तरूणतरूणींना विशेष प्रकारचे स्थान असते. भारतात मुडिया, नागा, ओराओं इ. जमातीत तरूणतरूणींची युवागृहे असतात. संध्याकाळ व रात्र तरूणतरूणी आपल्या कुटुंबाबाहेर या युवागृहांत घालवितात.

**विवाहसंस्था :**

आदिवासींमध्ये विवाहसंस्थेचा कोणतातरी प्रकार सर्वत्र आढळतो. कोणत्याही प्रकारची विवाहसंस्था नाही, असा आदिवासी समाज नाही. विवाहामुळे दोन कुटुंबे, दोन घराणी, दोन कुळी जवळ येतात. विवाह कोणाशी करावा किंवा करू नये, याबाबत प्रत्येक जमातीत विधिनिषेध आहेत. बीजकुटुंबात पतिपत्नी सोडले, तर इतरांचे परस्पर लैंगिक संबंध निषिद्ध असतात. याशिवाय अगम्य - आप्तसंभोगासंबंधी निरनिराळ्या जमातींत भिन्न भिन्न नियम आहेत. आदिवासींत एका कुळीतील लोकांचे विवाहसंबंध निषिद्ध असतात. एकाच पूर्वजाची प्रजा असल्याने एका कुळीचे लोक आपापसांत बहीणभाऊ ठरतात. त्यामुळे कुळीच्या बाहेर विवाह करावा लागतो, त्यास बहिर्विवाह म्हणतात. मात्र विवाह जमातीतच करावे लागतात, यास अंतर्विवाह म्हणतात. अंतर्विवाह व बहिर्विवाहाच्या नियमांमुळे जोडीदार निवडण्याचे क्षेत्र बरेच मर्यादित होते.

बीजकुटुंब सोडले, तर अन्य प्रकारच्या आदिवासी कुटुंबात विवाहसंबंधांचे अनेक प्रकार पाहावयास मिळतात. पॉलिनीशियातील मारके सॉन जमातीत आतेशी, सेमा नागा जमातीत मावशीशी, ईशान्य भारतातील लखेर व इंडोनेशियातील मेंटावाई बेटावरील मेंटावियन जमातींत सावत्र बहिणीशी ( प्रत्येकाचा पिता वेगळा पण आई एक ), प. आफ्रिकेतील एडो व इंडोनेशियातील सुमात्रा बेटावरील मिनांगकाबाऊ जमातीत सावत्र बहिणीशी (प्रत्येकाची आई वेगळी पण पिता एक ), इंडोनेशियातील बाली व ईशान्य सायबीरियातील चुकची जमातीत चुलत - मावस बहिणींशी असे विविध विवाहसंबंध प्रचलित आहेत. तसेच प्रत्येक जमातीत बीजकुटुंबाबाहेरही विशिष्ट आप्तसंभोग निषिद्ध असतात. आदिवासींत अधिमान्यविवाहाचेही नियम आढळतात. अधिमान्यता म्हणजे अग्रक्रम ठरलेले असणे. जोडीदार निवडताना काही आप्तस्वकीयांस अग्रक्रम द्यावा लागतो. अशा अग्रक्रमी आप्तांत वर व वधू उपलब्ध होत नसल्यास, इतर कुटुंबांतून त्यांची निवड केली जाते. बऱ्याच आदिवासी जमातींत मामेबहीण, आतेबहीण किंवा बहिणीची मुलगी यांस अधिमान्यता असते. मामे - आते भांवडांचे विवाह श्रीलंकेतील वेद्दा व भारतातील तोडा, व मीकीर या जमातींत आढळतात. आते - मामे भांवडे ही शक्य तो सख्खी असावयास हवीत, आते - मामे भावंडे ही बहिर्विवाहाच्या नियमांनुसार कधीही एका कुळीतील नसतात. त्यामुळे त्यांच्यातील विवाह निषिद्ध नसतो. चुलत - मावस भावंडांच्या विवाहामुळे वंशसत्ता, वारसाहक्क इ. प्रश्न गुंतागुंतीचे बनण्याची शक्यता असते. म्हणून बहुतेक जमातींत तसले विवाह टाळण्यात येतात. आप्तविवाहांचा नातेवाचक संज्ञांवर फार दूरगामी परिणाम झालेला आहे. मामा व सासरा ही एकच व्यक्ती असते. तसेच आत्या व सासू, मामेबहीण - आतेबहीण व पत्नी, पत्नीचा भाऊ व मामे - आते भाऊ वा मामे - आते बहीण व पत्नी या निरनिराळ्या भूमिका एका एका व्यक्तीत सामावल्या गेल्यामुळे त्यांच्याकरिता वापरल्या जाणाऱ्या नातेवाचक संज्ञांही सारख्याच असतात. फिजी बेटावरील आदिवासींत व वेद्दा



उत्तर फिलीपीन्सच्या गिरिप्रदेशातील आदिवासींच्या घरांचे विविध प्रकार

जमातीत मामा व सासरा आणि आत्या व सासू यांस एकच संज्ञा वापरली जाते.

देवर - विवाह व मेहुणी - विवाह हे बऱ्याच आदिवासी जमातींत आढळतात : नॅव्हाहो इंडियन, सायबीरियातील कोर्याक तसेच अंदमान बेटे, पश्चिम ऑस्ट्रेलिया, मेलानीशियातील सांताक्रूझ बेट, टॉरसची सामुद्रधुनी, बॅंक्सची बेटे इ. ठिकाणच्या जमाती यांत विधवेने देवराशी, दिराशी म्हणजे आपल्या पतीच्या धाकटया किंवा कधी कधी मोठया भावाशी विवाह करण्याची पद्धत आहे. ज्या जमातींत मेहुणीविवाह समंत आहे - उदा., कोर्याक, उत्तर अमेरिकेतील आदिवासी इ. - त्या जमातींत पत्नी मयत झाल्यावर किंवा जिवंत असताना तिच्या धाकटया बहिणीशी व क्वचित मोठया बहिणीशीही विवाह करता येतो. वधूमूल्य देऊन विवाह केलेली पत्नी मयत झाल्यास तिच्या बहिणीवर हक्क सांगता येतो. हे दोन्ही प्रकारचे विवाह बहुधा द्वितीय विवाह असल्याने त्यांचा नातेसंज्ञांवर विशेष परिणाम होत नाही.

आदिवासींत वराला वधूपित्यास वधूमूल्य द्यावे लागते. हे वधूमूल्य द. आफ्रिकेतील बांटू व इतर गोपालक जमातींत गुरांच्या रूपाने, मेलानीशियात डुक्कर किंवा कवडीच्या चलनाच्या रूपात व तुंगूस जमातीत रेनडियरांच्या रूपात देण्यात येते. भारताच्या अरूणाचल प्रदेशामध्ये मिथानचा उपयोग वधूमूल्यासाठी करण्यात येतो. बहुधा वधूमूल्य एकाच वेळी देण्यात येते; पण ऑस्ट्रेलियातील आदिवासी, शस्त्र, कपडे व अलंकारांच्या रूपाने जन्मभर त्याची फेड करीत राहतो. आदिवासी अर्थव्यवस्थेत श्रमिकांचे फार महत्त्व असते. मुलीचे लग्न केल्याने घरातील एक श्रमिक कमी होतो, त्याची फेड म्हणून वधूमूल्य देण्यात येते. वधूमूल्य देण्याची ऐपत नसल्यास ते फिटेपर्यंत मुलास सासऱ्याकडे काम करावे लागते. यास सेवाविवाह म्हणतात. एखाद्या व्यक्तीची पत्नी दुसऱ्याबरोबर पळून गेल्यास किंवा पित्याकडे परत गेल्यास प्रियकराने वा पित्याने वधूमूल्याची परतफेड करावयाची असते. वाईट वागणूक मिळाल्यास स्त्री पळून जाईल, म्हणून चांगली वागणूक देण्यात येते. वधूमूल्य टाळण्यासाठी कधी कधी विनिमयविवाह केले जातात. दोन बहिणींची दोन कुटुंबांत अदलाबदल झाल्यास वधूमूल्य द्यावे लागत नाही. द. आफ्रिकेच्या थोंगा जमातीत वधूमूल्यास 'लोबोला' म्हणतात. मानवशास्त्रीय लिखाणात लोबोला ही संज्ञा वधूमूल्यासाठी मान्य झाली आहे. बांटू जमातीत घटस्फोटानंतर वधूपित्यास लोबोला परत करावा लागतो. गुरेढोरे परत न केल्यास स्त्रीची मुले पित्याकडे राहतात. लोबोला परत केल्यास मुले आईकडे जातात. इतर विवाह - प्रकारांत गांधर्वविवाह व अपहरणविवाह प्रसिद्ध आहेत. दोन्ही विवाह वधूमूल्य दिल्याशिवाय समाजसंमत होत नाहीत. परंतु या विवाहांत वधूमूल्य कमी असते. पूर्व आफ्रिकेतील किकूयू जमातीत काम विभागले जावे, म्हणून बायकाच सवत आणण्यास नवऱ्यास प्रोत्साहन देतात. न्यूगिनीतील काई, सायबीरियातील चुकची व द. आफ्रिकेतील थोंगा जमातींतही जवळजवळ तशीच परिस्थिती आहे. जास्त मुले होण्यासाठीही बहुविवाह करण्यात येतात व प्रत्येक स्त्रीला राहण्यासाठी स्वतंत्र झोपडी दिलेली असते. पूर्व आफ्रिकेतील काही जमाती, भारतातील तोडा व खस, तसेच एस्किमो व तिबेटमधील काही जमाती यांत तुरळक प्रमाणात बहुपतित्व आढळते. बहुपतित्त्वाची नेमकी कारणे सांगता येत नाहीत; परंतु असल्या जमातींत मुलींना लहान वयात मारण्याची प्रथा आहे. तोडा जमातीत एक पती आपल्या गर्भवती पत्नीस लहान धनुष्यबाण देतो. तो समारंभ झाल्यानंतर पत्नीस होणारी सर्व मुले त्या पुरूषाची समजण्यात येतात. यावरून काही आदिवासींतील पालकत्वाचे महत्त्व सामाजिक असून जैविक पालकत्वास विशेष स्थान नसते, असे दिसते. दुसऱ्या पतीने परत योग्य ते विधी केल्याशिवाय त्यास सामाजिक दृष्टया पालकत्व प्राप्त होत नाही. बहुपतित्व बहुधा भ्रातृक असते, म्हणजे स्त्रीचे पती हे भाऊ-भाऊ असतात. पूर्वी द. भारतातील नायर समाजात अभ्रातृक बहुपतित्त्वाची प्रथा होती, ती आता नष्ट झाली आहे. मारक्वेसॉन जमातीत अजून अभ्रातृक बहुपतित्व आढळते. ऑस्ट्रेलियात आदिवासी जमातींत शय्या देण्याची पद्धत आहे. पूर्व आफ्रिकेतील मसाई लोकांतही पाहुण्यास पत्नी व झोपडी देण्याची पद्धत आहे.

## इतर सामाजिक गट :


एकपक्षी वंशानुक्रम असलेला बहिर्विवाही नातेगट, अशी कुळीची सर्वसाधारण व्याख्या करता येते. कुळीचे सभासद एका पूर्वजाचे वंशज म्हणवितात. हा पूर्वज पुष्कळदा काल्पनिक वा मनुष्येतरही असू शकतो. अशा पूर्वजास कुळीचे गणचिन्ह म्हणतात. कुळी व गोत्र


दोन्ही बहिर्विवाही असतात.

कुळींच्या देवदेवता असतात. कुळींची पंचायतही असते. ती कुळींमधील भांडणे व नियमांचे उल्लंघन यांबाबत निर्णय देते. एकमेकांना मदत करणे हे कुळीच्या सभासदांचे मुख्य ब्रीद असते. विशेषत: दुसऱ्या कुळीच्या लोकांशी भांडणतंटे झाल्यास कुळीचे लोक एकजुटीने त्यात भाग घेतात. कुळींमधील सूडभावना व कुळींबद्दलचे सभासदांचे प्रेम यांस क्रमाने इंग्रजीत 'क्लॅन व्हेन्जन्स' व 'क्लॅनिश मेटॅलिटी' असे म्हणतात. आफ्रिकी देशांच्या राजकारणात कुळींचा प्रभाव अधिक आहे.

ज्या जमातींचे गणचिन्ह किंवा नाव पूर्वजांवरून ठरलेले नसते, त्यांचे गणचिन्ह बहुधा कोणत्यातरी प्राण्याचे असते. गणचिन्हाचे नाव कुळीचे नाव असते. पूर्व अमेरिकेतील इरोक्वाइस या अमेरिकन इंडियन जमातीत अस्वल, कासव, ईल अशी कुळींची नावे आहेत. हैदा जमातीत प्राण्यांच्या आकृत्या अंगांवर गोंदतात, कपड्यांवर काढतात व लाकडांवरही कोरतात. पूर्व आफ्रिकेच्या बूगांडातील आदिवासी जमातींत ३६ बहिर्विवाही कुळी आहेत. प्रत्येक कुळाच्या ढोलाचा ठेका वेगळा असतो. प्रत्येक कुळीस दोन गणचिन्हे असतात. त्यांपैकी एक कुळीचा पूर्वज असतो. कुळींच्या नावांचे भाषांतर असे : सिंह, चित्ता, माकड, उंदीर इत्यादी. ऑस्ट्रेलियात गणचिन्हवादाचा जास्त प्रसार आहे. मध्य ऑस्ट्रेलियातील आरूंटा जमातीत गणचिन्हासाठी विशिष्ट जागा असते व तिची सीमा आखलेली असते. गणचिन्ह असलेल्या प्राण्यांची हत्या करीत नाहीत. ऑस्ट्रेलियन गणचिन्हपद्धतीचे दूरकेम या फ्रेंच समाजशास्त्रज्ञाने संशोधन करून धर्माची सुरूवात त्यापासून झाली, असे प्रतिपादिले आहे. गणचिन्ह मानलेल्या प्राण्यांच्या वा वस्तूंच्या आदरार्थ समारंभ करून त्या निमित्ताने कुळीचे लोक आपली एकी टिकवतात व वाढवतात, असा त्याचा सिद्धांत आहे.

काही कुळींचा मिळून एक मोठा नातेगट निर्माण होतो, त्यास सकुलक (फ्रॅट्री) म्हणतात. जेव्हा एका जमातीत केवळ दोनच सकुलक कुळी असतात, तेव्हा त्यास द्विदल संघटना किंवा अर्धक (मॉइटी) म्हणतात. तोडा जमातीत दोन अर्धके आहेत. सकुलक व अर्धक बहिर्विवाही असतात. क्वचित ते अंतर्विवाही असू शकतात. दोन्ही प्रकारची उदाहरणे आढळतात. भारतातील अर्धके अंतर्विवाही आहेत, तर ऑस्ट्रेलियातील व मेलानीशियातील अर्धके बहिर्विवाही आहेत. आंध्रमधील चेंचू जमातीत चार सकुलक आहेत व दहा कुळी आहेत. एका अंतर्विवाही जमातीचे विभाजन पुढील तीन बहिर्विवाही गटांत होऊ शकते : कुळी, सकुलक व अर्धक.







**आदिवासी पादत्राणे :**
१. फिनलंड.
२. अफगाणिस्तान.
३. पेरू.

## आदिवासी नातेसंबंध :

आदिवासींत नातेसंबंध महत्त्वपूर्ण असतात; कारण बहुतेक सामाजिक गट नातेसंबंधांवर आधारलेले असतात. वंशानुक्रमाने व्यक्तींचे नातेसंबंध दाखविता आल्यास त्यास सपिंड आप्त म्हणतात. वैवाहिक संबंधांमुळे नाते निर्माण झाल्यास त्यास विवाहोद्‌गत आप्त म्हणतात.

निरनिराळ्या आदिवासी जमातींमधील आप्तसंबंधीयांबाबतचे आचारविचार भिन्न असतात. काहींत ते सलगीसंबंध असतात, तर काहींत परिहार्य संबंध असतात. बऱ्याच जमातींत मामा, आते इ. आप्तसंबंध वैशिष्टयपूर्ण असतात. द. आफ्रिकेतील पितृवंशी थोंगा जमातीतील मामा - भाचे संबंधांची विस्तृत चर्चा रॅडक्लिफ - ब्राउन या मानवशास्त्रज्ञाने केली आहे. मामा जन्मभर भाच्याची नीट काळजी घेतो. भाचा आजारी असल्यास, त्याला बरा करण्यासाठी तो देवास कौल लावतो. मामाचे सलगीसंबंध पक्के असतात. मामाच्या मृत्यूनंतर त्याच्या मालमत्तेचा काही हिस्सा भाच्यास मिळू शकतो. मामीवरही त्याचा हक्क असू शकतो. पॉलिनीशियातील टिकोपिया जमातीमधील कुटुंबात आतेचे आगळे स्थान असते. विवाह होईपर्यंत भाच्याच्या संगोपनास आत्या हातभार लावते. विवाह झाल्यावर ती भावाकडे समारंभप्रसंगी येते व तेव्हा तिला मानाची वागणूक मिळते. ती पितृवंशी कुटुंबीय असल्याने तिच्याशी सलगी करण्याचा प्रयत्न केला जात नाही. शिवाय तिला पित्याप्रमाणेच घराण्याच्या देवाबद्दल अभिमान असून घराण्याच्या संस्कृतीची माहिती असते. बऱ्याचदा पित्याचा मृत्यू

झाल्यानंतर तिला वडिलकीचा मान व स्थान प्राप्त होते.

बहुधा आशिया, ओशिॲनिया, उत्तर अमेरिका व आफ्रिका यांतील सर्व आदिवासी जमातींत व्यक्तीचे आपल्या पत्नीच्या धाकटया आप्तांशी सलगीचे संबंध असतात व सासूसासरा आणि तिची वडील भांवडे यांच्याशी अलिप्ततेचे किंवा परिहार्य संबंध असतात.



**१. एस्किमो बोला : पक्ष्यांच्या शिकारीचे एक गोफणवजा साधन.**
**२. अर्जेंटिनामधील आदिवासींचा बोला.**

आदिवासी जमातींमध्ये पूर्वजपूजेला फार महत्त्व असते. त्यामुळे कुळीतील हयात व्यक्ती व मृत व्यक्ती यांमधील आप्तभावना जागृत राहते.

## आदिवासी स्त्री :

आदिवासींतील स्त्रीच्या दर्जाबद्दल परस्परविरोधी मते मांडली जातात. आदिवासी स्त्री ही गुलाम असते, मूल्य देऊन तिला विकत घेण्यात येते व तिच्याशी पाशवी वर्तन करण्यात येते, असा एक दृष्टिकोन आहे. मातृसत्ताक आदिवासी जमाती फार कमी आहेत. ऑस्ट्रेलियातील व आफ्रिकेतील काही जमाती, भारतातील खासी जमात, उत्तर अमेरिकेतील इरोक्वाइस, प्यूब्लो, ट्लीनगिट या जमाती मातृसत्ताक आहेत. ब्रिटिश कोलंबियात वंशसत्ता मातृप्रधान दिसत असली, तरी प्रत्यक्ष व्यवहारात स्त्रीच्या भावाकडे सत्ता असते व नंतर ती भाच्याकडे जाते. खासी जमातीत मात्र मालमत्ता आईकडून मुलीकडे जाते. जोवर विवाहित मुलगी नवीन निवासस्थान निर्माण करीत नाही, तोवर तिचा भाऊ व नंतर तिचा पती मालमत्तेची व्यवस्था पाहतो. इरोक्वाइस जमातीत विवाह स्त्रियाच ठरवितात व मालमत्तेवरील हक्क त्यांच्याकडे असतो. प्यूब्लो जमातीत मालकी हक्क स्त्रियांकडे असतात, पण राजकीय व धार्मिक क्षेत्रांत पुरूषांचा वरचष्मा असतो. मातृनिवासी जमातींत मातृकुळींच्या लोकांचे वर्चस्व असते. त्यात पिता हाच मालमत्तेचा खरा मालक असतो. प्यूब्लो जमातीत स्त्री घराची मालकीण असते व ती मर्जीनुसार नवऱ्यास घराबाहेर हाकलून देऊ शकते.

आर्थिक दृष्टीने पाहता वधूमूल्य देणाऱ्या जमातींत आदिवासी स्त्रीचा दर्जा नीच मानला जात नाही, असे गृहीत धरावे लागते. शेतीप्रधान पशुपालक समाजात स्त्रीचा दर्जा खालावलेला असतो, असे रॉबर्ट लोईने म्हटले आहे. मेलानीशिया व दक्षिण अमेरिका यांतील शेती करणाऱ्या जमातींत स्त्रियांचा दर्जा खालचा आहे. वेद्दा व अंदमानी शिकारी जमातींत स्त्रियांचा दर्जा खालावलेला नाही. तोडा जमातीत स्त्रियांना चांगली वागणूक मिळते, पण आर्थिक व धार्मिक जीवनात त्यांना विशेष स्थान नाही. तथापि आदिवासी स्त्रीच्या दर्जाशी आर्थिक कारणांचा निर्णायक संबंध दाखविता येत नाही.

सर्वसाधारणत: स्त्रीस चांगली वागणूक मिळते. स्त्री जरी नेहमी कामात असली, तरी तिच्या जबाबदाऱ्या पुरूषांच्या मानाने कमी असतात. आदिवासी जमातीत स्त्रीच्या मासिक विटाळाबद्दल घृणा असते. त्यांना त्या काळात वेगळे ठेवण्यात येते व त्यामुळेच त्यांना धार्मिक जीवनात महत्त्वाचे स्थान दिले जात नाही. मात्र आदिवासी स्त्रियांना प्रगत समाजातील स्त्रियांच्या तुलनेने अधिक लैंगिक स्वातंत्र्य असते.

## आदिवासी कायदा व राजकीय संघटना :

आदिवासींतील सर्वात महत्त्वाचा सामाजिक गट म्हणजे कुळी होय. कायद्याच्या बाबतीतही गुन्हा व शासन यांबाबतीत कुळीचे सभासद सार्वजनिक जबाबदारी सामुदायिक रीत्या स्वीकारतात. त्याचप्रमाणे दोन कुळींच्या सभासदांचे भांडण झाल्यास बदला घेण्याची प्रवृत्ती असते. मात्र विरूद्ध कुळीच्या एका विशिष्ट व्यक्तीवर रोख ठेवून बदला न घेता तो त्या कुळीतील कोणत्याही व्यक्तीच्या बाबतीत घेतला जातो. आदिवासी जमातींत गुन्ह्यांचे दोन प्रकार ठळकपणे दिसून येतात : (१) चोरी, खून इ. गुन्हे (२) अगम्यआप्तसंभोग, जादूटोणा इत्यादी. आपल्याच

कुळीतील व्यक्तींच्या बाबतीत गुन्हे केल्यास शिक्षा करणे कठीण असते. दुसऱ्या प्रकारच्या गुन्ह्यांसाठी दैवी शासन मिळते, असा समज आहे. या गुन्ह्यांच्या बाबतीत जमातीची प्रतिक्रिया तीव्र असते व आरोपीला कुळीबाहेर काढण्याची सर्वात मोठी शिक्षाही करण्यात येते. आदिवासींचे जीवन सहकार्यावर आधारित असल्याने असहकार ही शिक्षा परिणामकारक ठरते. जादूटोण्याच्या बाबतीत त्याच स्वरूपाच्या प्रतिकाराची भीती असते. गुन्ह्यास शासन करण्याबाबत मुख्य दोन दृष्टिकोन असतात : (१) सुधारवादी शासन : गुन्हेगारास सुधारण्याचा प्रयत्न करणे. (२) प्रतिरोधक शासन : गुन्हेगारास कठोर शिक्षा देऊन त्याद्वारे संभाव्य गुन्हेगारांना धाक बसविणे. तिसरा शुद्धीचा म्हणजे प्रक्षालनाचा दृष्टिकोनही मांडण्यात आला आहे; व्यक्तीने गुन्हा किंवा वाईट कर्म केल्यास समाजाचा समतोल ढळतो; त्यास शिक्षा करून किंवा दंड करून समाजाचा समतोल पुन्हा प्रस्थापित करण्याचा विचार या दृष्टिकोनात अभिप्रेत आहे.

ऑस्ट्रेलियातील आदिवासींत गुन्ह्यांचा विचार करण्यासाठी पंचायतीची सभा होते. अगम्यआप्तसंभोग हा जमातिविरूद्ध घडलेला गुन्हा मानण्यात येतो. अमंगल जादूचा वापर करून खून केल्यास वा दीक्षाविधीच्या वेळी सांगितलेली गुपिते फोडल्यास शिक्षा करण्यात येते.

ग्रीनलंड बेटावरील एस्किमो लोक शिक्षा करण्याची जगावेगळी रीत अवलंबितात. ज्या माणसाने चोरी केली असेल किंवा दुसऱ्याच्या बायकोस पळवून नेले असेल, त्यास सर्व लोकांसमोर उभे करून त्याच्यावर विडंबनात्मक कविता रचण्यात येतात. एस्किमो जमातीत अन्नाचा नेहमीच तुटवडा असतो. एखाद्याने पाप केल्यास तुटवडा जास्त भासतो असा समज आहे. त्यामुळे गुन्हेगारास शिक्षा करण्यात येते. गुन्हेगाराने गुन्हा स्वतःच कबूल करावयाचा असतो. शामानच्या मदतीने गुन्हेगार शोधला गेल्यास त्यास जबर शासन करण्यात येते. प्रसंगी मृत्युदंडही देण्यास येतो.

पॉलिनीशियातील सॅमोआ जमातीत पंचायतीचे सभासद गुन्हेगाराच्या घरी जाऊन त्याच्या घराची व मालमत्तेची मोडतोड करून ती नष्ट करतात. न्यूझीलंडमधील माओरी जमातीतही असाच प्रकार आढळतो. स्वतःच्या छातीवर व डोक्यावर रक्त येईपर्यंत दगडाचे घाव घालावयास गुन्हेगार सांगतात. तोंड सुजून त्रास व्हावा म्हणून त्यास विषारी वनस्पतीही खावयास सांगतात.

आफ्रिकेतील आदिवासी जमातींत कायदा जास्त सुसंघटित आहे. अफगाणिस्तानमधील काफीर जमातीत दिवाणी व फौजदारी गुन्हे असे फरक करण्यात येतात. राजकीय गुन्हे, चेटूक व खून यांसारखे फौजदारी गुन्हे जमातींच्या मुखियासमोर चालविले जातात. पुरूषाच्या खुनाबद्दल सात गुरे व स्त्रीच्या खुनाबद्दल दहा गुरे असा दंड असतो. व्यभिचार हा दिवाणी गुन्हा मानला जातो. व्यक्तीच्या सामाजिक दर्जास अनुसरून एक ते चार गुरे असा दंड करण्यात येतो. गर्भ राहिल्यास सात ते दहा गुरे दंड होतो. युगांडात खटले चालविण्याकरिता न्यायशुल्कदेखील आकारले जाते.

आदिवासींत जमातसभा व पंचायतशासनाव्यतिरिक्त इतर प्रकारची राजकीय संघटना किंवा प्रशासन काही जमातींचे अपवाद सोडल्यास जवळजवळ नसतेच; कारण सर्व समाजसंघटना नातेसंबंधांवर आधारलेली असते. ऑस्ट्रेलियन आदिवासी जमातींत पुढारीपण वृद्धांकडे असते. आदिवासी ज्ञान अलिखित असल्याने अनुभवी वृद्धांकडे पुढारीपण जाते. वृद्धांच्या सभेत चेटूकामुळे घडलेला मृत्यू, अगम्यआप्तसंभोग व समारंभांची संघटना इ. गोष्टीवर चर्चा होते. एकमताने निर्णय घेतात. एकमत नसल्यास सभा पुढे ढकलतात. पुढारीपण बहुधा आनुवंशिक असते. पुढारी उत्तम वक्ता, सगळ्यांची मने वळविणारा, शूर योद्धा व चांगला वैद्य असावा, अशी लोकांची अपेक्षा असते. आरूंटा व ऑस्ट्रेलियातील वारामुंगा जमातींत कुळींच्या प्रमुखांतून पाच व्यक्तींची निवड करण्यात येते. हे पंच अनौपचारिक रीत्या भेटतात व निर्णय देतात. पॉलिनीशियात पुढारीपण वडिलोपार्जित असते. पण एखादा पुढारी नालायक ठरल्यास त्याच्या परिवारातील दुसऱ्या व्यक्तीस पुढारीपण देण्यात येते. पुढाऱ्यास विशेष अधिकार असतात. तो नदीवरील किंवा जगंलातील वाहतूक यांवर निर्बंध घालू शकतो. त्याच्या आज्ञेचे उल्लंघन केल्यास देव रागावतात व त्यामुळे रोग होण्याचा वा मृत्यू येण्याचा संभव असतो, अशी समजूत असते. सॉलोमन बेटावर तीन प्रकारचे मुखिया असतात. जी व्यक्ती लोकांच्या उपयोगाकरिता वा मनोरंजनाकरिता एक मोठी झोपडी बांधून तीत ढोल व इतर वाद्ये ठेऊ शकते, तिच्याकडे पुढारीपण येते. नंतर

ते आनुवंशिक बनते. जवळजवळ शंभर लोकांना ज्या व्यक्तींचे पुढारीपण मान्य आहे, ते दुसऱ्या दर्जाचे पुढारी होतात. प्रथम दर्जाचे पुढारी प्रमुख कुटुंबांतून निवडण्यात येतात.

आफ्रिकेत मात्र मोठमोठी आदिवासी राज्ये आहेत. राजाचे नातेवाईक जिल्ह्यांवर राज्य करतात व त्यांचेच एक मंत्रिमंडळ असते. त्यांच्यात कलह निर्माण झाल्यास राजाचे वर्चस्व कमी होते. राजाच्या दरबारात भाट व विदूषकांचे बरेच महत्त्व असते. वेद्दा, मैदू, अमेरिकन इंडियन, सॅमोआ इ. जमातींत आप्तसंबंधांपेक्षा क्षेत्रीय संबंध जास्त घनिष्ठ असतात. आपल्या खेडयाचे क्षेत्र वाढविण्यासाठी भांडणेही होतात.

आदिवासी कायद्याचे पालन दैवी शक्तींच्या भीतीपोटी होत असल्याने पुढाऱ्यास त्या शक्तींबद्दलचे ज्ञान आवश्यक असते. आदिवासींतील सामाजिक समारंभ धार्मिक स्वरूपाचेच असतात. त्याकरिता नातेगटांवर प्रभुत्व गाजविणारे पुढारी धर्मपारंगतही असावे लागतात. परंतु सर्वच आदिवासी जमातींमधील पुढारी धर्मपारंगत किंवा वैद्यकीय तज्ञ असतातच असे नाही.

## धर्म व जादू :

आदिवासींच्या धार्मिक आचारविचारांबद्दल गेल्या, दोन शतकांत विचारवंतांनी जितकी चर्चा केली, तितकी इतर कोणत्याही आदिवासी संस्थेविषयी केली नाही. ख्रिस्ती मिशनरी आदिवासींच्या धर्मकल्पना समजून घेण्यासाठी फार उत्सुक होते व आहेत; कारण त्यांना सुधारण्याचे कार्य त्यांनी पहिल्यापासून स्वीकारले आहे. अनपेक्षित संकटांतून मार्ग काढण्यासाठी अनेक विधी व समारंभ आदिवासींमधे करण्यात येतात. एस्किमो जमातीत अन्नाचा तुटवडा झाल्यास त्याचे कारण शोधून काढण्यासाठी शामान जादूप्रयोग करतो. शेतीप्रधान जमातींत शेतीच्या प्रत्येक क्रियेशी विधी व समारंभ निगडित असतात. होपी समाजात सर्पनृत्याने पिकास भरपूर पाऊस लाभतो, असा समज आहे. ट्रोब्रिआंड येथील जमातींत शेतीच्या मशागतीपूर्वी पुरोहित शेतजमिनीवर धार्मिक विधी करतो. नंतर पेरणी, कापणी इ. बाबतींतही पुरोहिताची मदत घेण्यात येते.

धर्माच्या द्वारे मानव सतत आपल्या भोवतालच्या परिस्थितीवर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करीत आला आहे. मानवी व्यवहारात लक्ष घालून हस्तक्षेप करणारे देव, दानव, भूतात्मे, मृतात्मे व आत्मे इत्यादींचे जग असते, असा सर्व आदिवासींचा समज आहे. त्या जगाशी संबंध ठेवणारे विशिष्ट अधिकारी असतात. त्यांस पुरोहित, जादूगार, मांत्रिक, चेटकीण, देवऋषी इ. नावे आहेत. सर्व ब्रम्हांड एक किंवा अनेक विलक्षण व अतिमानवी शक्तींनी व्यापलेले आहे, अशी बहुतेक सर्व आदिवासी जमातींची श्रद्धा असते. त्या शक्ती मानवात, निसर्गात, देवदानवांतही असतात. देवदेवतांत अशी शक्ती अधिक असते एवढेच. या शक्तीस मेलानीशियन लोकांत 'माना' म्हणतात व त्याच अर्थाने हा शब्द मानवशास्त्रात रूढ झाला आहे. एखादी व्यक्ती युद्धकुशल असते, कारण तिच्यात जास्त प्रमाणात मानाशक्ती असते. एखाद्याची शेती चांगली असते किंवा कोंबडी जास्त अंडी देते, तीही मानामुळेच. पॉलीनीशियातील जमातींत उच्चनीच स्तरीकरण आहे, तेही व्यक्तींत कमीअधिक प्रमाणात माना असतो म्हणूनच. देवांतही लहानमोठे भेद यामुळेच असतात. तसेच शिलाखंड, शस्त्रे, होडया, घरे इत्यादींतही मानाचा संचार असतो. मानामुळे यश लाभते. अपयश त्याच्याच अभावामुळे येते. धर्माचरण केल्याने व वेळोवेळी धर्मविधी केल्याने माना टिकून राहतो किंवा वाढतो. त्यामुळे शस्त्र घडविताना किंवा शेती करताना धार्मिक विधी करणाऱ्या मांत्रिकाची वा पुरोहिताची गरज भासते. तसेच जास्त माना असणाऱ्या वस्तू, मानव किंवा देव यांना कमी माना असणाऱ्यांनी स्पर्श करावयाचा नसतो. जमातीचा मुखिया, त्याची शस्त्रे वगैरे त्यामुळेच निषिद्ध म्हणजे 'ताबू' या सदरात मोडतात. आदिवासींत धर्मकर्म सांगणारे पुढारी असतात ते यामुळेच. मानाशक्ती मूळात चांगली किंवा वाईट नसते.


व्यक्तीवरून मानाचे स्वरूप ठरते. आदिवासींत इतरही काही धर्मविषयक समज दिसून येतात. प्रत्येक जीवात आत्मा असतो व तो शरीराचा नाश झाल्यानंतरही अस्तित्वात राहतो. भूत, पिशाच्च, जिंद इत्यादींशी बरोबरी करू इच्छिणारे प्रेतात्मे किंवा भूतात्मे असतात व ते मानवी जीवनात लुडबूड करतात. साहजिकच अशा प्रेतात्म्यांबद्दल आदिवासींना भीतियुक्त आदर असतो. त्यामुळे पूजादी मार्गांनी आदिवासी त्यांची कृपादृष्टी संपादन करण्याचा यत्न करतात. प्रेतात्मे व तत्सम शक्ती मंगल, अमंगल वा तटस्थ असू शकतात. देवांचा दैनंदिन जीवनाशी संबंध येत नाही,

असे नैऋत्य अमेरिकेतील चिरिकाहुआ अपशी जमातीत मानतात. इतर आत्म्यांना मात्र मानवी जीवनात महत्त्वाचे स्थान असते. त्यांची पूजाअर्चा करून त्यांना प्रसन्न करण्यात येते. भूतपिशाच्च जरी अमानवी असले, तरी त्यांची पूजा करीत नाहीत. त्यांच्याबद्दल आदिवासींच्या मनात भीती असते व त्यामुळे त्यांना टाळण्याचे प्रयत्न केले जातात. प्रत्येक प्रौढ अपशी स्त्री-पुरूषाचा एक आवडता आत्मा असतो व संकटकाळी त्यालाच आवाहन केले जाते. त्या जमातीत घुबड, सर्प व अस्वल या तीन प्राण्यांच्या आत्म्यांच्या शक्तीबद्दल आदरयुक्त भीती असते. या आत्म्यांपासून त्यांना शक्ती प्राप्त होते. या शक्तीमुळे त्यांना आजारातून बरे होण्यास किंवा इतर संकटांतून बाहेर पडण्यास मदत मिळते. त्याकरिता बरेच धार्मिक विधी अर्थातच करावे लागतात.

आदिवासी जमातींत पूर्वजपूजेसही बरेच महत्त्व असते. मृतव्यक्तींचे आत्मे आपल्या नातेसंबंधीयांचे संरक्षण करतात, अशी आदिवासींची श्रद्धा असते. आत्मे त्यांची पूजाअर्चा केल्याने संतुष्ट राहतात. मेक्सिकोच्या याकी व मेयो जमातींत मृत हे नातेवाईक कुटुंबांचे सभासद मानण्यात येतात. त्यांनी येऊन भोजन करावे, म्हणून श्राद्धाचे समारंभ केले जातात. प्रत्येक समारंभात मृतात्म्यांची प्रार्थना करण्यात येते. मृतात्मे कुटुंबात पुन्हा जन्म घेतात, असा बहुतेक आदिवासी जमातींचा समज आहे. म्हणूनच पूर्वजांची नावे परत परत ठेवण्यात येतात. न्यू मेक्सिकोच्या झूनी जमातीत मृतात्मे पर्जन्य-आत्म्यांच्या श्रेणीत जाऊन बसतात. पाऊस पडण्यास त्यांची मदत होते. हिवाळ्यात हे आत्मे मानवात मिसळतात. निरनिराळ्या समारंभांद्वारे त्यांचे मनोरंजन करण्यात येते.

पूर्व आफ्रिकेतील बूगांडा राज्यातील जमातींत तीन प्रकारच्या देवदेवता असतात : कुळीदेवता, मृत राजांचे आत्मे व सर्व जमातींच्या देवता. राजांचे आत्मे देवता बनतात; ते पुनर्जन्म घेत नाहीत, असा समज आहे. कुळीदेवता व शाही मृतात्मे पूर्वजपूजेचाच एक भाग आहे. कटोन्डा या देवाने विश्व निर्माण केले व तो निघून गेला. व्हिक्टोरिया सरोवराची मुकासा देवता त्यांना मासळी प्राप्त करून देते व वादळांवर नियंत्रण ठेवते, तसेच ती प्रजननाचीही देवता असते. जुळ्या अपत्यांविषयी बूगांडात बरेच कौतुक असते. चांगले पीक येणे व गुराढोरांची संख्या वाढणे या देवतेमुळेच शक्य होते.

प्रत्येक आदिवासी जमातीत इतर सर्वसामान्य व्यक्तीपेक्षा दैवी शक्तींशी जास्त निकटचा संबंध ठेवणाऱ्या काही व्यक्ती असतात. या आपल्या असामान्य व्यक्तिमत्त्वामुळे किंवा प्रशिक्षणामुळे तशा शक्तींशी संपर्क ठेऊ शकतात, असा समज असतो. धार्मिक कार्ये करणाऱ्या व्यक्तीस शामान म्हणतात. शामानास निरनिराळ्या आत्म्यांचा साक्षात्कार होतो.



उत्तर अमेरिकेतील झूनी इंडियन जमातीचे शिरोभूषण व मुखवटा

वादळ सुरू करणे किंवा शमविणे, शिकारीचे प्राणी जवळ बोलावणे किंवा त्यास दूर पाठविणे व सर्वात महत्त्वाचे म्हणजे रोग बरा करणे इ. कामे तो करतो. आत्मा ढळल्यामुळे रोग होतो व तो नाहीसा झाल्यास मरण येते, असा समज असून शामान आत्म्यास पूर्वस्थळी आणण्याचे कार्य करतो. यासाठी त्यास बरेच विधी करावे लागतात. शामान बहुधा खाजगी विधी पार पाडतो. सर्व जमातींचे किंवा मोठ्या समुदायाचे विधी पुरोहित करतो. पौरोहित्याचे शिक्षण घ्यावे लागते. पौरोहित्य पूर्णवेळेचा व्यवसाय असतो. ज्या जमातीची आर्थिक व्यवस्था अधिक संघटित असते, तिच्यातच असले व्यवसायीकरण शक्य असते. झूनी, पश्चिम आफ्रिकेतील दहोमियन इ. आदिवासी जमातींत पुरोहित वर्ग प्रामुख्याने सापडतो.

एकंदरीत आदिवासी जमातींत धर्मसंस्थेच्या द्वारा मानवाचा अतिमानवी व नैसर्गिक जगांशी संबंध प्रस्थापित होतो. धर्मामुळे सामाजिक मूल्यांचे जतन होते. आदिवासी संस्कृतीत लिखित ज्ञानाचा अभाव असल्याने, धार्मिक विधी व समारंभ यांच्या द्वारा ज्ञानाचे जतन होणे व ते एका पिढीतून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होते. धार्मिक समारंभ व खेळ यांच्या द्वारे आदिवासी संस्कृतीच्या विविध अंगांचा आविष्कार होतो. शिकारी जमातींत नृत्याद्वारे प्राण्यांचे अंगविक्षेप

व शिकारीचे तंत्र दाखविण्यात येते. नॅव्हाहो जमातीच्या समारंभात विश्वाच्या निर्मितीचे दर्शन घडविण्यात येते. धार्मिक समारंभामुळे समाजाची एकजूट कायम राहते. धार्मिक समारंभ हे सामाजिक समारंभही असतात. त्यांत एकमेकांना देणग्या देऊन समाजाची आर्थिक बाजूही सांभाळली जाते. आदिवासी धर्म मुख्यत्वे व्यक्तीच्या मनावरील भीतीचे व अनपेक्षित घटनांचे दडपण दूर करतो व तिला मानसिक शांती मिळवून देतो.



उत्तर अमेरिकेतील झूनी जमातीच्या अलौकिक शक्तीचा मूर्तिरूप आविष्कार.

### जादू :


आदिवासींत जादूटोण्यास फार महत्त्व असते. उत्पादन वाढविण्यास, विशिष्ट व्यक्तीशी विवाह करण्यास, रोगराई दूर करण्यास किंवा सुरू करण्यास जादूटोण्याचा उपयोग करण्यात येतो. जादूटोणा किंवा करणी करण्यासाठी समाजात मांत्रिक, चेटकीण इ. व्यक्ती असतात. त्यांना वैद्यकाचेही चांगले ज्ञान असते. आदिवासींच्या धर्माचा व जादूचा निकटचा संबंध आहे. उत्पादन वाढविण्याकरिता किंवा रोग बरे करण्याकरिता करण्यात येणारे सर्व विधी व समारंभ हे मंगल जादूचेच आविष्कार होत.

### आदिवासी वैद्यक :

आदिवासी वैद्यकविद्येचा धर्मसंस्था व जादू यांच्याशी जवळचा संबंध असतो. दुसऱ्याने चेटूक केल्यामुळे, नियमांचे उल्लंघन केल्यामुळे, भूतात्म्याने किंवा प्रेतात्म्याने झपाटल्यामुळे किंवा आत्मा ढळल्यामुळे रोग होतो, असा आदिवासी लोकांचा समज असतो. रोग बरा करण्यासाठी मांत्रिकाची मदत घेतली जाते. छातीत दुखणे, श्वासोच्छ्वासास त्रास होणे व थुंकीबरोबर रक्त पडणे ही चेटूक केल्याची लक्षणे आहेत, असा आफ्रिकेतील झुलू लोकांचा समज आहे. रोगांवरील उपचारांत औषधांचा वाटा कमी असून मांत्रिकाचा वाटा मोठा असतो. आरोग्यप्राप्तीसाठी आदिवासी जमातींत देवदेवतांपुढे प्राण्यांचे बळी देण्यात येतात. रोग झाला म्हणजे आत्म्याचा शरीराशी असलेला समतोल ढळला, असे मानतात. तो समतोल पुन्हा प्रस्थापित करण्याचे कार्य मांत्रिकाचे वा देवऋषीचे असते.

### आदिवासी कला :

धर्म व जादू यांच्याशी आदिवासींची कला निगडित आहे. ती प्राधान्याने कार्योपयोगी असते. उपयुक्त वस्तूंना कलात्मक रूप देण्याची प्रवृत्ती आदिवासींत




**आदिवासी केशभूषा : १. पापुआ व न्यू गिनीतील आदिवासींची. २. रिओ ग्रॅंड (द. अमेरिका) मधील प्यूब्लो जमातीच्या पुरोहिताची. ३. उत्तर अमेरिकेतील होपी जमातीची.**


आढळते. होडी, वाद्ये, भिंती यांवर काढलेल्या आकृत्या पुष्कळदा चेटकापासून त्या त्या वस्तूंचे संरक्षण करण्यासाठी काढलेल्या असतात; परंतु कित्येकदा त्यांमागे आदिवासीची सौंदर्यदृष्टीही संभवते. अश्मयुगीन आदिवासींनी जादूच्या निमित्ताने निर्मिलेल्या कलाकृती पश्चिम यूरोपातील गुंफांमध्ये सापडल्या आहेत.

पाषाणांची व शिंपल्याची आभूषणे अश्मयुगातही होती. नतंर अस्थी व कच्च्या धातूचा वापर त्यांकरिता करण्यात येऊ लागला. मातीची किंवा लाकडी भांडी, मुखवटे, गणचिन्हे इत्यादींतून आदिवासी कलेचे दर्शन घडते. लाकडी व हस्तिदंताच्या कारागिरीत निग्रोवंशीय लोक जास्त वाकबगार समजले जातात. पश्चिम आफ्रिकेतील लाकडी मूर्ती व मुखवटे उल्लेखनीय आहेत. दक्षिण नायजेरियातील हस्तिदंती वस्तू व पितळी मूर्तिकाम प्रगत आहे. न्यू गिनीत आत्म्यांसाठी लाकडी

समाधी बांधत, ती कलापूर्ण असते. माओरी जमातीत माशांच्या अस्थींवर नक्षीकाम केले जाते. एस्किमो जमातीचे मुखवटे प्रसिद्ध आहेत. प्यूब्लो जमातीत मातीच्या भांडयांवर रंगीत चित्रे काढण्यात येतात. ऑस्ट्रेलियात प्राण्यांच्या केवळ बाह्यांगाचे चित्रीकरण करत नाहीत, तर त्यांच्या शरीरातील हाडे, नसा इत्यादीही दाखवितात. आदिवासी जमातींत कलांचे गटवार व्यवसायीकरण न झाल्याने अनेक व्यक्ती अनेक कलांत पारंगत असू शकतात. आदिवासी कला बऱ्याच अंशी प्रतीकात्मक असते. धार्मिक प्रतीके वापरण्यात आल्यामुळे केवळ आदिवासींनाच त्यांची कला उमगू शकते. मध्य अमेरिकेतील माया जमातीची प्रतीकात्मक कलानिर्मिती प्रसिद्ध आहे. आदिवासी कलेचा उपयोग जमातीच्या मूल्यांचा आचारविचारांचा प्रसार करण्यासाठीही करण्यात येतो. ॲमेझॉन नदीच्या खोऱ्यातील जमातींत पेरणीच्या पूर्वी बरेच धार्मिक समारंभ व नृत्ये करण्यात येतात. या समारंभांत पेरणीबाबत व पिकांची काळजी घेण्याबाबत बरीच माहिती सांगितली जाते. या दृष्टीने लोककथा व दंतकथाही सांगण्यात येतात.

## संगीत व साहित्य :

आदिवासी जमातींत गीतगायनाचे प्रसंग वारंवार




**काही आदिवासी वाद्यप्रकार : १. घर्षण - नगारा. २. नासिका वेणू. ३. वेणुसंघ. ४. वृषभ शिंग. ५. संगीतधनु.**

येतात. अंगाईगीते, प्रीतिगीते, युद्धगीते, भजने हे प्रकार आदिवासींत आढळतात. तसेच थट्टामस्करीही गीतांतून करण्यात येते. एस्किमो जमातींत तर संगीतस्पर्धा योजून भावनांचे उन्नयन केले जाते व भांडणे मिटविली जातात. भांडणाऱ्या व्यक्ती ढोलक्याच्या साथीवर गीत एकमेकांवर आरोपप्रत्यारोप करतात. गीताचा व साहित्याचा अर्थातच संस्कृतीशी निकटचा संबंध असतो. जमातींचा इतिहास सांगण्यासाठी व आयुष्यातील वेगवेगळ्या प्रसंगांचे वर्णन करण्यासाठी गीतरचना करण्यात येते. दंतकथांद्वारे जमातींची माहिती देण्यात येते. त्यांच्या कथांत शिकारीचे अनुभव, प्रणय व प्रणयातील खोटी भांडणे, विवाहप्रकाराचे चित्रण इत्यादींचे रसभरित वर्णन असते. सृष्टी, जमात व कुळी यांच्या उत्पत्तीसंबंधीही कथा असतात. मानव व पशू यांच्या संभोगातून कुळी निर्माण झाल्याबद्दल अनेक कथा आढळतात. गीतांचे काही प्रकार असे : (१) सर्वसामान्य गीते (२) प्रासंगिक गीते (३) कुळी - गीते (४) धार्मिक गीते (५) स्त्रीगीते (६) बोधगीते. याशिवाय म्हणी, उखाणे इत्यादीही आदिवासी जमातींत आढळून येतात.

बहुतेक आदिवासी जमातींत संध्याकाळी युवक व युवती एका ठिकाणी जमून एकत्र नृत्य करतात. अशा तरूणतरूणींस आपापले जोडीदार निवडण्याची मोकळीक असल्याने प्रियाराधन करण्याकरिता गीतांचा भरपूर उपयोग करण्यात येतो. तसेच नातेसंबंध, सलगीसंबंध व परिहार्यसंबंधही गीत गाऊन दर्शविले जातात. त्यांच्यात संगीत नृत्याला फार महत्त्व असते व सर्व लोक त्यांत उत्साहाने भाग घेतात.

आदिवासींची वाद्ये त्यांच्या आसपास मिळणाऱ्या वस्तूंची बनविलेली असतात. निरनिराळ्या प्रकारचे ढोल, बासरी, टाळ, टिपऱ्या, एकतारी ही वाद्ये त्यांच्यात आढळतात. काही आदिवासी जमातींत धनुष्याकृती वीणा वाद्येही आढळतात. त्यांना एक किंवा अनेक तारा असू शकतात. या वाद्यांचे अनंत प्रकार आढळतात.

## भारतातील आदिवासी :

आफ्रीका खंडाच्या खालोखाल भारतात आदिवासींची संख्या जास्त आहे. १९६१ च्या जनगणनेनुसार आदिवासींची संख्या २,९८,४६,३०० म्हणजे भारताच्या एकूण लोकसंख्येच्या ६.८ टक्के होती. या आदिवासींपैकी सु. निम्मे आदिवासी मध्य प्रदेश (६६ लक्ष), ओरिसा (४२ लक्ष) व बिहार (४२ लक्ष) या तीन राज्यांत आहेत. त्याशिवाय गुजरात (२७ लक्ष), राजस्थान (२३ लक्ष), आसाम (२० लक्ष), महाराष्ट्र (२४ लक्ष), पश्चिम बंगाल (२० लक्ष) व आंध्र प्रदेश (१३ लक्ष) यांतही आदिवासी मोठया संख्येने आहेत. नागालॅंड, मेघालय व अरूणाचल प्रदेश ही आदिवासी राज्ये आहेत. भारतीय संविधानानुसार आदिवासींना अनुसूचित जमाती म्हटले जाते. गोंड, संथाळ व भिल्ल

या जमातींचे लोक प्रत्येकी २५ लाखांहून अधिक आहेत. गोंड आंध्र, बिहार, मध्य प्रदेश, महाराष्ट्र व ओरिसा; संथाळ बिहार, ओरिसा व पश्चिम बंगाल; तर भिल्ल आंध्र, गुजरात, मध्य प्रदेश, महाराष्ट्र व राजस्थान या राज्यांत विखुरलेले आहेत. ओराओं, नागा, खोंड, मुंडा या जमातींची संख्या ५ ते १० लाखांच्या दरम्यान आहे.

भौगोलिक दृष्ट्या भारतातील आदिवासींचे चार प्रमुख गटांत विभाजन करता येईल : (१) उत्तर व ईशान्य विभाग : यात मुख्यतः भुटिया, थारू, लेपचा, नागा, गारो, खासी, डफला, कुकी, अबोर, मीकीर इ. जमाती येतात. यांपैकी भुटिया व थारू जमाती उत्तर प्रदेशाच्या उत्तर सीमेवरील प्रदेशात राहतात. लेपचा सिक्कीम व भारत - सिक्किम सीमेलगत आहेत. इतर जमाती आसाम - ईशान्य सीमाप्रदेशात व कामेंग नागा पर्वतक्षेत्रात राहतात. (२) मध्य विभाग : या प्रदेशात आदिवासींची संख्या सर्वात जास्त आहे. बिहारमध्ये संथाळ, मुंडा, ओराओं, बिऱ्होर, ओरिसात बोंडो, खोंड, सावरा व जुआंग, मध्य प्रदेशात गोंड, बैगा, कोल, कोरकू, भूजिरा इ. राजस्थानात भिल्ल व दख्खनच्या पठारावरील चेंचू, कोलाम, कोया इ. आदिवासी जमाती प्रसिद्ध आहेत. (३) पश्चिम विभाग : या विभागात सह्याद्रीच्या परिसरात राहणाऱ्या आदिवासी जमातींचा समावेश होतो. त्यापैकी वारली, कातकरी, महादेव - कोळी, ठाकूर व भिल्ल या प्रमुख जमाती आहेत. यांशिवाय अंध, कोलाम इ. जमाती आहेत. गुजरातमध्ये वारली, भिल्ल, दुबळा, वाघरी इ. जमाती राहतात. (४) दक्षिण विभाग : या प्रदेशात अनेक अल्पसंख्यांक आदिवासी राहतात. त्यांपैकी तोडा, बदागा, कोरा, इरूला, कुरूंबा, एरवल्लन, अडियन, अरंडन इ. उल्लेखनीय आहेत.

त्रिपुरा, मणिपूर, अंदमान व निकोबार बेटे येथेही बऱ्याच आदिवासी जमाती राहतात. एकंदर भारतात ३०० च्या वर आदिवासी जमाती आहेत.

भारतातील सर्व आदिवासी जमातींचा इतर संस्कृतीशी संपर्क आल्याने त्यांच्यात काही महत्त्वपूर्ण बदल झाले आहेत. या दृष्टीने आदिवासी जमातींचे पांच भागात वर्गीकरण करता येईल : (१) इतर संस्कृतीशी संपर्क न आलेल्या किंबहुना अत्यंत अल्प प्रमाणात बदललेल्या जमाती. (२) बाह्य संपर्काने प्रभावित झालेल्या, परंतु स्वतःची समाजरचना व सांस्कृतिक वैशिष्ट्ये टिकविणाऱ्या जमाती. (३) जातिसंघटनेप्रमाणे समाजरचना करून इतर जातीशी व धार्मिक समूहांशी मिळून - मिसळून राहणारे आदिवासी. (४) बाह्य संपर्कामुळे ज्यांना अस्पृश्यांसारखी वागणूक मिळते, असे आदिवासी समूह. (५) आर्थिक स्थिती सुधारल्यामुळे व राजकीय प्रभावामुळे भारतीय समाजात स्वतःचे उच्च स्थान मिळवलेले आदिवासी.

या वर्गीकरणामुळे भारतातील आदिवासी जमातींमधील सांस्कृतिक प्रक्रिया समजण्यास, त्यांच्या आर्थिक, सामाजिक, धार्मिक स्थितींचे वास्तविक मूल्यांकन करण्यास व त्यांच्या समस्यांवर तोडगा सुचविण्यास मदत होऊ शकते. पुढील आदिवासी जमाती अत्यंत अविकसित अवस्थेत आहेत : आंध्रमधील कोया, चेंचु, येनाडी; आसाममधील मीकीर; अबोर; बिहारमधील बिऱ्होर, असुर, खाडिया, सावरा पहाडिया; केरळमधील कादर, इरूलर, पणियन, कट्टुनायकन, विशवन; मध्यप्रदेशमधील कोया, बैगा, अभुज, माडिया, बिऱ्होर, सेहरिया; तामिळनाडूमधील कादर, इरूलर, पणियन, मलयाली; महाराष्ट्रामधील कातकरी, गोंड; कर्नाटकमधील कुरूंबा, जेनू - कुरूबा, कोरगा, इरूलर; ओरिसातील बिऱ्होर, बोंडो, जुआंग, सावरा पहाडिया, राभा व लेपचा आणि अंदमान निकोबार बेटांवरील ओंगी, सेंटिनीली आणि शॉपेन.

## भाषिक व वांशिक वर्गीकरण :

भारतातील आदिवासींच्या भाषा प्रामुख्याने द्राविडी व ऑस्ट्रो - आशियाई भाषासमूहांतील आहेत. तसेच हिमालयाच्या दक्षिण प्रदेशातील काही आदिवासी भाषा सिनो - तिबेटन भाषासमूहातील आढळतात. तथापि आधुनिक भारतीय भाषांच्या संपर्काने आदिवासींच्या भाषांवर बराच परिणाम झाला आहे. खासी व संथाळी भाषांस कलकत्ता विद्यापीठाने दुय्यम भाषा म्हणून मान्यता दिली आहे. मुंडारी जमातीची बोली तर आता लोप पावू लागली आहे. नागा जमाती एकमेकांच्या बोली समजू शकत नाहीत. त्यापैकी काही बोलींची अलीकडे ख्रिस्ती मिशनऱ्यांनी लिपी बनविली आहे. मणिपुरी आदिवासींनी बंगाली लेखनपद्धती स्वीकारली आहे. भारतीय आदिवासी द्राविड व मंगोल वंशगटांत येतात. जोसेफ हेडनच्या मते प्राक् - द्रविड काळातील आदिवासी हे भारताचे मूळ रहिवासी. हॅमनडॉर्फच्या मते ज्या काळात आर्य भारतात आले, त्याच सुमारास द्रविड लोक पश्चिम किनाऱ्यावर

समुद्रमार्गे आले. हा काळ ख्रि. पू. सरासरी २००० ते १००० हा होय. वायव्य व दक्षिण प्रदेशांतून आर्यांनी व द्रविड लोकांनी हुसकलेले लोक मध्य क्षेत्रातील डोंगरात व जंगलात गेले; ते आजचे आदिवासी होत असा विचार मांडण्यात आला आहे. अलीकडे बी. एस्. गुहा व जे. एच्. हटन यांनी वांशिक वर्गीकरणाबाबत आपले विचार मांडले आहेत. आजचे आदिवासी नेग्रिटो, प्रोटो - ऑस्ट्रेलॉइड किंवा मंगोलवंशी असावेत. त्यांपैकी नेग्रिटो सर्वात प्राचीन आहेत. केरळमधील कादर आदिवासी नेग्रिटो वंशीय आहेत. मध्य क्षेत्रातील आदिवासी प्रोटो - ऑस्ट्रेलॉइड वंशीय व ईशान्येकडील मंगोलवंशीय आहेत, असा सिद्धांत आहे. बी. एस्. गुहांच्या मते भारतीय आदिवासींचे चार प्रकार करता येतात : (१) कादर, इरूला व पणियन हे दाक्षिणात्य आदिवासी. त्यांच्या केसावरून त्यांच्यावरील निग्रो वंशाचा प्रभाव दिसतो. (२) मध्य क्षेत्रातील आदिवासी प्रोटो - ऑस्ट्रेलॉइड आहेत. (३) ईशान्येकडील पृथुकपाली मंगोलवंशी. (४) ब्रम्हपुत्रेच्या खोऱ्यातील मध्यम बांधा व मध्यम नाक असणारे आदिवासी मंगोलवंशी असावेत.

जरी काही भारतीय जमातींत निग्रोवंशीय विशेष आढळतात, तरी त्यावरून निग्रोवंशीय जमाती भारतात आल्या होत्या किंवा काय यासंबंधी मानवशास्त्रज्ञांत एकमत नाही. एकंदरीत भारताचे मूळ निवासी कोण, याबाबत निर्णायकपणे काहीच सांगता येत नाही. शिवाय वांशिक मिश्रणामुळे आदिवासींचे निर्विवाद वर्गीकरण करता येत नाही.

## आर्थिक संघटना :

भारतातील आदिवासींच्या आर्थिक अवस्था तीन प्रकारच्या आहेत : (१) अन्नसंकलनावस्था (२) अस्थिर किंवा स्थलांतरित प्राथमिक कृषि - अवस्था (३) स्थिर प्राथमिक कृषि - अवस्था. यांशिवाय तीन इतर प्रकार संभवतात : (१) पशुपालन करणारे (२) विशिष्ट उद्योगांद्वारा उपजीविका करणारे (३) गुन्हेगारीवर उपजीविका करणारे. या तीन प्रकारांतील आदिवासींची संख्या कमी आहे. वर सांगितलेल्या कोणत्याही अवस्थेतील लोक केवळ एकाच प्रकारचे जीवन व्यतीत करू शकत नाहीत. पूर्णपणे स्वावलंबी अर्थव्यवस्था कोणत्याही गटातील आदिवासींची नाही. खाद्यसंकलन करणारे आदिवासी वनात राहतात. यात बिहारमधील बिऱ्होर व खाडिया; आसाम व ईशान्येकडील कुकी, कोन्याक नागा; बस्तरचे डोंगरी माडिया, गोंड; ओरिसाचे जुआंग; आंध्रमधील चेंचू; केरळमधील कादर इ. जमातींचा समावेश होतो. आदिवासींत शिकार व्यक्तिगत किंवा सामूहिक रीतीने करण्यात येते. जंगलातील मध, डिंक इ. गोळा करून ते कंत्राटदाराला विकतात. अस्थिर किंवा स्थलांतरित शेती करणाऱ्या जमातींत मध्य प्रदेशातील कमार व बैगा, आंध्रमधील कोंडा रेड्डी, महाराष्ट्राच्या चंद्रपूर जिल्ह्यातील डोंगरी माडिया व आसाममधील नागा यांचा समावेश होतो.

आदिवासींत शेतीस वेगवेगळ्या ठिकाणी झूम, पोडू, बेवार, दाही अशी विविध नावे आढळतात. त्यांपैकी झूम ही संज्ञा भारतीय मानवशास्त्रीय साहित्यात सर्वमान्य झाली आहे. या पद्धतीमुळे जंगलांचा नाश होतो. झूम शेतीस सरकारी जंगलखात्याचा विरोध असल्याने सामान्य शेती करावयास आदिवासी शिकत आहेत. ईशान्येकडील नागा व इतर आदिवासी सोपानशेती करतात व तिच्यासाठी पाटबंधाऱ्यांचाही उपयोग करण्यात येतो. तसेच खासी, गोंड, ओराओं, भिल्ल, मुंडा, संथाळ इ. जमातीही स्थिर शेती करतात.

निलगिरीतील तोडा जमात पशुपालनावर उपजीविका करते. त्यांचा भर म्हशी पाळण्यावर असतो. दूध व दूधाच्या पदार्थांचा ते बदागा जमातींशी विनिमय करतात. कोटा जमातीचे लोक त्यांना भांडी पुरवतात. बिहारमधील असुर व मध्य प्रदेशातील आगरिया जमाती लोहारकाम करणाऱ्या आहेत. बस्तरचे आदिवासी लोक मासेमारी करतात. भटक्या जमातींत कोल्हाटी, गाडिया लोहार, कंजर, फासेपारधी, कैकाडी इ. अनेक जमाती समाविष्ट आहेत. त्यांच्यापैकी बऱ्याच जमाती वराहपालन, दोर वळणे, माकड - अस्वलांचे खेळ इ. व्यवसाय करतात. याशिवाय मोघीया, बैरागी, संसी, लमाणी, भामटे, बेरड, मांगगारूडी, बंजारा, लोधा इ. जमातींना गुन्हेगार जमाती म्हणत. अलिकडे त्यांना विमुक्त जाती म्हणून संबोधण्यात येते.

औद्योगिकीकरणामुळे बिहार, प. बंगाल व आसामातील कारखान्यांत आदिवासी अलीकडे काम करू लागले आहेत. आसामातील चहाच्या मळ्यांत, जमशेटपूरच्या पोलाद कारखान्यांत, बिहार व मध्य प्रदेश यांतील खाणीत संथाळ, हो, गोंड, भुईया, मुंडा इ. जमातींचे लोक रोजगारी करतात. या आदिवासींच्या

प्रदेशात खाणींचा शोध लागल्याने तेथे मोठया उद्योगांचा झपाटयाने विकास होत आहे. हा विकास पचनी पाडण्याच्या दृष्टीने आदिवासी जमाती अपरिपक्व आहेत.

भारतीय आदिवासींत आठवडयांचे बाजार भरतात. त्या ठिकाणी रोख पैसे देऊन किंवा वस्तूंचा विनिमय करून व्यवहार चालतात. कंत्राटदारीची पध्दत वाढल्यामुळे आदिवासींची फार मोठया प्रमाणावर आर्थिक पिळवणूक होत आहे.

## सामाजिक संघटना :

भारतातील आदिवासींच्या जमातींत कुटुंब हाच प्राथमिक गट आहे. पितृसत्ताक कुटुंबपद्धती अधिक जमातींत आढळते. परंतु मातृसत्ताक कुटुंबाचीही काही उदाहरणे आहेत. आसाममधील खासी, गारो इ. जमातींमधील मातृसत्ताक कुटुंबपद्धती प्रसिद्ध आहे. काही पितृवंशीय जमातींत मातृनिवास अपवाद म्हणून आढळतो. डेहराडून जिल्ह्यातील खस जमातीत बहुपतिकत्व आढळते. सर्व भाऊ आपल्या एक किंवा अनेक बायकांसह एकाच कुटुंबात राहतात. पहिले मूल मोठया भावाचे मानले जाते व नतंरची मुले क्रमशः इतर भावांची मानली जातात. ओरिसातील खाडियांत एकविवाही पितृसत्ताक कुटुंब असते. शेतीकामात स्त्रियांना मज्जाव असतो व धर्मसमारंभात भाग घेण्यास त्यांस मनाई असते. एकंदरीत आदिवासी जमातींत कुटुंबाचा एकच एक विशिष्ट प्रकार आढळत नाही. नागा जमाती एकविवाही अथवा बहुपत्नीविवाही असतात, परंतु पितृसत्ताक असतात. त्यांच्या शेजारीच मातृसत्ताक कुटुंब असलेल्या खासी जमातीचे वास्तव्य आहे. तोडा, खासी व कादर या जमाती मातृपितृसत्ताक आहेत. मध्य भारतातील जमाती बहुतेक पितृसत्ताक आहेत.

बऱ्याच जमाती स्वतंत्र उपजमातींत विभागलेल्या आढळतात. या उपजमाती अंतर्विवाही बनल्या आहेत. गोंड जमातीत अनेक उपजमाती निर्माण झाल्या आहेत. त्यांत सांस्कृतिक भिन्नताही आढळते. मध्य प्रदेशचे गोंड, बस्तरचे मुडिया व माडिया आंध्र प्रदेशातील राजगोंड व कोया ह्या मूळच्या उपजमाती आता स्वतंत्र झाल्या आहेत. त्यांच्यात परस्परांत विवाह होत नाही. नागा जमातीचेही असेच आहे. तोडा जमात तार्थारोल व ताइव्हलिओल अशा दोन अंतर्विवाही अर्धकांत विभागलेली आहे. अंगामी नागातील अर्धके पूर्वी बहिर्विवाही होती, आता ती अंतर्विवाही आहेत. तसेच ओरिसातील बोंडो जमातीतील ओंतल व किल्लो ही अर्धके अंतर्विवाही आहेत. राजगोंडी जमातीत चार सकुलक आहेत व ते बावीस कुळींचे बनलेले आहेत. कुळी व सकुलक दोन्ही बहिर्विवाही आहेत. अंदमान बेटावरील आदिवासी तसेच कादर ही जमात सोडल्यास भारतातील इतर सर्व आदिवासी जमातींत कुळी आहेत. संथाळ जमातीत शंभरावर कुळी आहेत. हो जमातींत ५०, तर मुंडा जमातीत ६४ कुळी आहेत. बऱ्याच जमातींत कुळींची स्वतंत्र गणचिन्हे असतात. गणचिन्ह असलेल्या प्राण्यास न मारणे, तो मेल्यास शोक करणे व कोणत्यातरी स्वरूपात त्याचे चित्र धारण करणे या प्रथा गणचिन्हाशी निगडित असतात. ओरिसातील जुआंग व कोंड जमातींत एका गावातील मुलामुलींचे विवाह त्याच गावात होत नाहीत.

कुटुंब, कुळी, सकुलक, अर्धक व गाव यांव्यतिरिक्त सामाजिक संघटनेचा महत्त्वाचा घटक नातेसंबंध. अधिकांश आदिवासी जमातींत वर्गात्मक नातेसंबंध आहेत. दर्शक अथवा वर्णनात्मक संबंध कमी आहेत. तोडा जमातीत 'पिता' या आप्तसंज्ञेत पित्याचे भाऊ, कुळीतील पित्याच्या वयाचे सर्व पुरूष व मावशीचे पती यांचाही समावेश होतो. सेमा नागांत 'आज' ही संज्ञा माता, काकू व मावशीस लागू पडते. माता व काकूकरिता असलेली एकच संज्ञा देवरविवाह सुचविते, तर माता व मावशीकरिता वापरण्यात येणारी एकच संज्ञा मेहुणीविवाहाची प्रथा सूचित करते. पिता, काका व मावशीचा नवरा भाऊभाऊ असावेत हे दिसते. आत्या व मावशीकरिता एक संज्ञा आते-मामे भावंडांतील विवाहाची द्योतक आहे. कुकी कुळीत पित्याचा पिता, मातेचा पिता, मामा, पत्नीचा पिता, मामेभाऊ, पत्नीचा भाऊ व पत्नीच्या भावाचा मुलगा यांस 'हेपु' म्हणतात; म्हणजे वेगवेगळया पिढीच्या लोकांना एकच संज्ञा वापरली जाते. अंगामी नागांत थोरला भाऊ, बायकोची थोरली बहीण, नवऱ्याचा मोठा भाऊ, थोरल्या बहिणीचा नवरा, थोरल्या भावाची बायको, मामी व काकू या सर्वांस 'शि' संज्ञा वापरतात. यांत लिंगभेद पाळण्यात आलेला नाही. ओरांओ जमातीत आत्या, मामा, मावशी व सासू यांस 'ताची' म्हणतात. यावरून आते-मामे भांवडातील विवाह व मेहुणीविवाह सूचित होतात. अशा प्रकारे आप्तसंज्ञांवरून सामाजिक

चालिरीतींचे दर्शन घडते.

बहुतेक सर्व भारतीय आदिवासी जमातींत पुरूष आपल्या धाकटया भावजयीशी व थोरल्या मेहुणींशी परिहार्यसंबंध पाळतात. एकमेकांशी बोलणे, स्पर्श करणे, एकांतात बसणे निषिद्ध समजले जाते. याउलट पुरूष भावजयीशी वा धाकटया मेहुणीशी सलगीसंबंध ठेवू शकतो.

जीवनचक्रातील जन्म, विवाह व मृत्यू या तीन महत्त्वाच्या अवस्थांशी आदिवासींचे रीतिरिवाज निगडित झालेले आहेत. यांशिवाय नामकरण, दीक्षाविधी, रजोदर्शनविधी इ. संस्कारही महत्त्वपूर्ण असतात. पूर्वजआत्म्यास त्याच कुटुंबात पुनर्जन्म घेण्याची इच्छा असल्यास व देवाने तसा आदेश दिल्यास गर्भाधान होते, असा कमार जमातीत समज आहे. बोंडो जमातीत मुलगा झाल्यास पतिपत्नीला दोन महिने व मुलगी झाल्यास तीन महिने एकमेकांपासून वेगळे करण्यात येते.

भारतीय आदिवासींत जोडीदार मिळविण्याचे बरेच प्रकार आहेत. कुकी जमातीत मुलगा मुलीकडे जाऊन राहतो. त्यांचे एकमेकांशी पटल्यास विवाह होतो. विवाह न झाल्यास मुलगा मुलीच्या पित्यास भरपाई देतो. बळजबरीचे विवाह कमी झाले आहेत, तथापि नागा, गोंड, भिल्ल, हो इ. जमातींत अजून हा प्रकार आढळतो. वधूमूल्य देता न आल्यास मुलगा मुलीकडे जाऊन शेतावर काम करतो. व त्याच्या मजुरीच्या रूपाने वधूमूल्य दिले जाते. गोंड, बिन्होर व बैगा जमातींत अशा प्रकारचे सेवाविवाह आढळतात. तसेच दोन कुटुंबांनी आपल्या मुलींची परस्परांत अदलाबदल केल्यास वधूमूल्याचे प्रश्न उद्‌भवत नाहीत. बहुतेक सर्व जमातींत हा प्रकार आढळतो. तसेच मुलामुलींचा विवाह कुटुंबियांना अमान्य असल्यास दोघेही पळून जाऊन विवाहबद्ध होतात. यास सहपलायनविवाह म्हणतात. भिल्ल जमातीत होळीच्या अथवा दिवाळीच्या प्रसंगी गर्दीचा फायदा घेऊन असे पलायनाचे प्रकार घडतात. हो व बिन्होर जमातींमधील मुलगी ज्या मुलाशी लग्न करावयाचे असते, त्याची संमती नसतानाही त्याच्या घरात घुसते. मारहाण केली किंवा मानहानी केली, तरी ती जात नाही व तिच्याशी विवाह केल्याशिवाय गत्यंतरच राहात नाही. यास पैठू विवाह किंवा अनादरविवाह म्हणतात.

आदिवासींत बालविवाह क्वचितच आढळतात, मात्र विधवाविवाह सर्वमान्य आहे. खाडिया जमातीत विधवेच्या पुनर्विवाहात वधूमूल्य द्यावे लागत नाही. हो जमातीत वयाच्या अठराव्या वर्षापूर्वी मुलीचा व वयाच्या चोविसाव्या वर्षापूर्वी मुलाचा विवाह होत नाही. मुलगी अविवाहित राहिल्यास ती चेटकीण होण्याचा सभंव असतो. देवरविवाह व मेहुणीविवाह बहुधा सर्व जमातींत मान्य असतो.

खाडिया, ओराओं व गोंड जमातींत आते - मामे भावंड विवाहास अग्रक्रम देण्यात येतो. गोंड जमातीत तसा विवाह न केल्यास दंड भरावा लागतो. खासी, संथाळ व कादर या एकविवाही जमाती आहेत. वधूमूल्याची रक्कम मोठी असते, त्यामुळे हो जमातीत बहुपत्नीविवाह अशक्य आहे. मात्र तो भिल्ल, गोंड, बैगा इ. जमातींत रूढ आहे. भ्रातृक बहुपतिविवाह तोडा व खस जमातींत आढळतात.

बहुतेक सर्व जमातींत विवाहपूर्व लैंगिक संबंधांकडे दुर्लक्ष केले जाते. गर्भाधान झाल्यास संबंधित व्यक्तिंना विवाह करावा लागतो. वधूमूल्य देण्यात येत नाही किंवा अल्पसे देण्यात येते. गोंड जमातीत अविवाहित मुले व मुली एकाच युवागृहात झोपतात. विवाहबाह्य संबंधांतून खुनाचे प्रकार उद्‌भवतात. माडिया व भिल्ल जमातींत व्यभिचारामुळे खून पडतात. बहुपतिक खस जमातीत पत्नीला विवाहबाह्य संबंध ठेवता येत नाहीत; परंतु माहेरी गेल्यावर मुलगी या नात्याने तिच्यावर बंधने नसतात.

आदिवासींत घटस्फोट मान्य आहे. खासी जमातीत व्यभिचार, वंध्यता व बेबनाव या कारणांकरिता घटस्फोट मिळतो. घटस्फोट सार्वजनिक विधी असतो. ईशान्य भारतातील लुशाई जमातीत नवऱ्याने बायकोस टाकल्यास तो भरपाई देतो. स्त्री व्यभिचारी असल्यास तिला वधूमूल्याची रक्कम नवऱ्यास परत करावी लागते. गोंड, मुडिया व खाडिया जमातींतही वरील कारणांनी घटस्फोट मिळतो. भरपाईची रक्कम पंचायत ठरविते.

आदिवासी जमातींत मृत्यू हा जीवनाचा शेवट मानीत नाहीत. मृत्यू हा एक अपघात असतो : देवाचा कोप, मृतात्मे, जीवात्मे व भूतात्म्यांचा रोष, चेटूक इत्यादींमुळे मृत्यू येतो, अशी आदिवासींची समजूत असते. शवाचे दहन अथवा दफन करण्यात येते. मृत व्यक्ती वृद्ध असल्यास शवाचे बहुधा दहन करतात. मयताच्या वस्तूंवर चेटूक करणे शक्य असते म्हणून त्या

त्याज्य असतात. दफनाच्या जागी लाकडावर किंवा दगडावर कोरलेले स्मारक उभे करण्यात येते. काही काळ गेल्यावर मृतात्म्यास परत आवाहन करण्यात येते व त्यास सर्वांचे रक्षण करण्याची विनंती केली जाते. शुद्धिस्नान व शुद्धिभोजन करण्यात येते.

भारतातील बऱ्याच जमातींत युवागृहे आढळतात. मुंडा, हो, ओराओं, खाडिया, गोंड, भुईया व नागा जमातींत ही संस्था महत्त्वपूर्ण आहे. युवागृहांना त्या त्या जमातीत निरनिराळ्या संज्ञा असतात. स्त्रियांच्या व पुरूषांच्या युवागृहांना काहींच्यामध्ये भिन्न भिन्न संज्ञाही असतात. दक्षिणेत मुथुवन, मन्नन व पल्लियन जमातींत युवागृहे आढळतात. युवागृहे गावाच्या एका टोकास असतात. युवागृहांत आदिवासी संस्कृतीचे शिक्षण दिले जाते. मुडियांच्या गोटुलमधील लैंगिक जीवनाचे व्हेरिअर एल्विनने यथातथ्य वर्णन केले आहे. युवागृहातील वातावरण अत्यंत उत्साहवर्धक असते. युवकांचे ते स्वतंत्र राज्यच असते. युवागृहातील घटनांबाबत गुप्तता पाळण्यात येते. युवागृहे केवळ मनोरजंनाची स्थाने नसून, आदिवासी संस्कृतीचे शिक्षण देणाऱ्या संस्थाच होत. तेथे नेतृत्वाचे तसेच धर्म व जादूटोण्याचेही शिक्षण देण्यात येते. अलिकडे त्यांचा अतिथिगृह म्हणूनही उपयोग करण्यात येतो.

## आदिवासी स्त्री :

मातृसत्ताक कुटुंबांत स्त्रीचा दर्जा उच्च असणे स्वाभाविकच आहे. हॉबहाउसच्या मते पशुपालन करणाऱ्या ८७ टक्के जमातींत व शेतीव्यवसाय करणाऱ्या ७३ टक्के जमातींत स्त्रीचा दर्जा निकृष्ट असतो. शेती व पशुपालन ही प्रामुख्याने पुरूषांची कामे आहेत, असे या संदर्भात कारण देण्यात येते. अन्नसकंलन करणाऱ्या कादर, मलपंतरम, पल्लियन, इरूला, पणियन, चेंचू व अंदमान - पिग्मी जमातींत वारसाहक्काचे काहीही नियम नसल्याने स्त्रीपुरूषांना समान दर्जा असतो. विवाहोत्तर निवासाचा स्त्रियांच्या दर्जावर फार परिणाम होतो. पितृनिवासी जमातींत पुरूषांस जास्त अधिकार असतात. स्त्रीवर अनेक प्रकारचे निर्बंध घालण्यात येतात. त्यांपैकी काही संरक्षणात्मक, काही निषेधक व इतर संवर्धक असतात. तोडा स्त्रियांवरील धर्मविषयक निर्बंध निषेधक असतात. बाळंतपण, रजोदर्शन यांसारख्या अशुद्ध अवस्थांचा दूध - उत्पादनावर विपरित परिणाम होऊ नये, म्हणून निषेधनियम केलेले असतात. गोंड स्त्रीस विवाहपूर्व लैंगिक स्वातंत्र्य, आपला जोडीदार निवडण्याचा हक्क व घटस्फोटाचा अधिकार असतो. थारू जमातींत पुरूषांवर स्त्रियांचा वचक असतो, कारण स्त्रियांना चेटूकाचे ज्ञान असते असा समज आहे. खस स्त्रीस माहेरी पूर्ण स्वातंत्र्य असते.


## धर्म :

भारतातील आदिवासींच्या धर्मकल्पनांत जडप्राणवाद, मानावाद, पूर्वजपूजा, मृतात्मे, जीवात्मे, प्रेतात्मे अथवा भूतात्मे इत्यादींचा अंतर्भाव होतो. डोंगर, झाडे, नद्या यांत जीवात्मे वास करतात अशी कमारांची श्रद्धा आहे. त्यांना वेळोवेळी बळी देण्यात येतात. पीकपाणी, गुरेढोरे यांचे पालन करणारे जीवात्मे असतात, अशी काही जमातीत समजूत आहे. मुंडा, हो व छोटा नागपूर भागातील इतर जमाती अतिमानवी माना शक्तीस 'बोंगा' म्हणतात. अमंगल शक्तींना आदिवासी फार घाबरतात व त्यामुळे त्यांची जास्त उपासना करण्यात येते. व्यक्तीचे बाह्य व आंतरिक असे दोन आत्मे असतात, यांवर बऱ्याच जमातींचा विश्वास असतो. स्वप्नात आत्मा कधी कधी शरीराबाहेर जातो व नंतर त्यात परत येतो, मृत्यू अस्थायी असतो, अशा श्रद्धेतून तोडा व हो जमातींत अंत्यविधी दोनदा करतात. मृत्यू झाल्याबरोबर कच्चा अंत्यविधी करतात व नतंर दफनसमयी पक्का अंत्यविधी करतात. कमार जमातीत महादेव हा सर्वात प्रमुख देव आहे. आकाश आणि पृथ्वी मानवी व्यवहारात हस्तक्षेप करत नसल्यामुळे त्यांची विशेष पूजाअर्चा करण्यात येत नाही.

सपाट प्रदेशात राहणाऱ्या आदिवासींच्या धर्मकल्पनांवर हिंदुधर्माचा प्रभाव आहे. त्यांच्या स्थानिक देवाशिवाय हिंदूचे राम, कृष्ण, हनुमान, गणपती व महादेव हे देव त्यांनी स्वीकारले आहेत.

भारतातील सर्व आदिवासी जमातींचा जादूटोण्यावर विश्वास आहे. फलप्राप्तीकरिता विविध मंत्र वा मंतरलेल्या वस्तू वापरतात. जडीबुटी, देवतांनी स्पर्श केलेल्या वस्तू, विशिष्ट ठिकाणची माती व पाणी, विशिष्ट पक्ष्यांचे पंख इत्यादींना फार महत्त्व असते. प्रत्येक जमातीत जादूटोणा करणाऱ्या विशिष्ट व्यक्ती असतात. त्यांना बैगा, भगत, गुनी अशी जमातीपरत्वे वेगवेगळी नावे आहेत. हेच मांत्रिक रोगाचे निदान करतात व मंत्रसामर्थ्याने आणि जडीबुटी देऊन रोग बरे करतात. बऱ्याच जमातींत कौल लावण्याकरिता सुपात

धान्य घेऊन मंत्र म्हणतात व त्यांचे छोटे छोटे ढीग रचून त्यांतील दाणे मोजण्यात येतात; त्यांतील सम अथवा विषम संख्यांच्या आधारे निष्कर्ष काढले जातात. बाधेचे निराकरण करण्यास बहुधा कोंबडयाचा बळी देण्यात येतो. वाघापासून जास्त त्रास झाल्यास मंतरलेले दगड वेशीजवळ टांगण्यात येतात. गावात रोग फैलावल्यास मंत्रसामर्थ्याने त्या रोगास



भारताच्या ओरिसा राज्यातील जुआंग जमातीचा बांबूचा अलंकृत कंगवा

वाजतगाजत गावाच्या बाहेर हाकलण्यात येते.

**कला :**

भारतातील आदिवासीची कला बहुरंगी आहे. घरावरील नक्षीकाम, स्मशानातील कोरीव खांब, समारंभप्रसंगीचे पोशाख, आभूषणे, मुखवटे, देवदेवतांच्या आकृत्या इ. प्रकारांत आदिवासींची कलादृष्टी दिसून येते. नागा जमातीचे पोषाख, मिझोंच्या, टोप्या, टोपल्या, वाद्ये, मासे पकडण्याची जाळी इत्यादींतील रंगसंगती, तसेच कोरीवकाम व नक्षीकाम कलात्मक असते. साजशृंगाराची आदिवासींना आवड असते. अंगावर गोंदवून घेणे, समारंभप्रसंगी शरीरास रंग लावणे, केशभूषा करणे, गळ्यात रंगीबेरंगी माळा घालणे हे प्रकार सर्व जमातींत आढळतात. कपडयांचा वापर फारच अल्प करण्यात येतो. माळा चकचकीत दगडांच्याही बनविण्यात येतात. नागालँड व मणिपूरमध्ये कपडे जमातीतच विणतात. बोंडो जमातीत झाडाच्या सालीपासून कपडे तयार करतात. गदाबा लोक वाघांच्या कातडीसारखे पट्टयापट्टयांचे कपडे विणतात. कोंड जमातींत केळीची पाने कमरेभोवती गुंडाळतात.

आदिवासींच्या दागिन्यांत कवडयांचा सर्वात जास्त उपयोग करण्यात येतो. आदिवासी स्त्रिया वेणीवर कवडयांचा गजरा घालतात, जाकिटासाठी व पिशव्यांसाठी कवडयांचा वापर करतात. कवडयांबद्दल बरीच मते आहेत. काहींच्या मते कवडी ही मानवी डोळ्याचे प्रतीक आहे. काहींना ती स्त्रीच्या योनीचे प्रतीक वाटते, तर काही तिला केवळ अलंकार मानतात. कवडी वापरल्याने दृष्ट लागत नाही, असा लमाणी, मुडिया, माडिया व जुआंग या जमातींचा समज आहे. बोंडो, गोंड व परधान जमातींमधील स्त्रियांही कवडयांचा वापर दागिन्यांकरिता करतात.

फणीचा वापर प्राचीन काळापासून करण्यात आला आहे. मुडिया जमातीत तिचा जास्त वापर केला जातो. युवागृहात एकमेकींची वेणी घालण्यास किंवा अंग खाजविण्यास फणी वापरतात. तरूण मुले आपल्या प्रेयसींना फणी भेट देतात. स्त्रिया अशा फण्या सतत केसांत खोचून ठेवतात. घरांच्या दारांवरही फण्यांच्या आकृत्या कोरण्यात येतात.

माडिया जमातीत समारंभप्रसंगी बांबूच्या टोपीवर वनगाईचे शिंग व मोराचे पीस लावतात. कोंड जमातीत कधी कधी पितळेची शिंगेही वापरतात. सावरा जमातीत बांबूच्या टोपीस रंगीत कागद लावतात. बऱ्याच जमातींचे लोक निरनिराळ्या पक्ष्यांची पिसे डोक्यावर खोचतात.

माडिया, मुडिया व कोंड जमातीचे लोक तंबाखू ठेवण्यासाठी कलाकुसर केलेल्या डब्या व बटवे वापरतात. बांबू कोरून, चाक, कासव, आंबा, मासे इत्यादींच्या आकारांच्या तबांखूच्या डब्या ते तयार करतात.

विवाहसमयी दीपस्तंभ बनविण्याची पद्धत आहे. दिव्यास प्रेमाचे प्रतीक मानतात. त्याबद्दलचे उखाणे बैगा जमातीत गाईले जातात. प्रत्येक घरात दिवाळी असतेच.

माडिया, मुडिया, भिल्ल, कोरकू, गोंड इ. जमातींमध्ये मृताच्या स्मरणार्थ दगडाचे व लाकडाचे कोरीव खांब उभारतात. दरवाज्यांवर व भिंतीवर प्राण्यांची चित्रे कोरतात. तसेच गणचिन्हदर्शक खेळणी बनविण्यात येतात. नृत्यप्रसंगी व इतर धार्मिक व सामाजिक समारंभांत मुखवटे वापरण्यात येतात. त्यांना भडक रंग देतात. मुखवटे लावून आदिवासी नकला करतात. त्यांच्या रोजच्या जीवनातील प्रसंग युवागृहांच्या वा घरांच्या दारांवर कोरण्यात येतात. त्यांत शिकारीचे प्रसंग जास्त असतात. तसेच घरातील भिंतीवर देवाधर्माची चित्रेही रंगविण्यात येतात. सामग्री स्थानिक असते, हे आदिवासी कलेचे वैशिष्टय होय.

## महाराष्ट्रातील आदिवासी :

१९७१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रात ५,०४,१२,२३५ लोकांपैकी २९,५४,२४९ म्हणजेच एकंदर लोकसंख्येच्या ५.८६ टक्के आदिवासी आहेत. ते

१९६१ मध्ये भारतातील आदिवासी लोकसंख्येच्या ७.९६ टक्के होते. धुळे - ६,१५,८०१; ठाणे - ५,७९,५३८; नासिक - ५,६१,२०२; चंद्रपूर - २,३१,४०२; यवतमाळ - १,९७,९७७; अहमदनगर - १,४५,७१३; जळगाव - १,२५,०२६; पुणे - १,०८,४०५ अशी काही जिल्हावार विभागणी आहे. याशिवाय इतरत्रही त्यांची तुरळक वस्ती आहे. ठाणे जिल्ह्यातील तलासरी व मोखाडा, नासिक जिल्ह्यातील सुरगाणा व धुळे जिल्ह्यातील अक्राणी या तालुक्यांत आदिवासींचे प्रमाण जास्त आहे. महाराष्ट्रातील ४० आदिवासी जमातींना अनुसूचित जमाती म्हणून सरकारने मान्यता दिली आहे. त्यांपैकी भिल्ल - ५,७५,००० (२४ टक्के); महादेव कोळी - २,७४,००० (११ टक्के) गोंड - २,७२,००० (११ टक्के); वारली २,४३,००० (१० टक्के); कोकणा - २,१२,००० (९ टक्के); ठाकूर - १,५९,००० (७ टक्के) व काथोडी किंवा कातकरी १,४०,००० (६ टक्के) या १९६१ च्या जनगणनेनुसार बहुसंख्य आहेत.

महाराष्ट्रातील आदिवासींची अर्थव्यवस्था समाजसंघटना, धर्मविधी, कला इ. भारतातील इतर आदिवासींप्रमाणेच आहेत. मुख्य व्यवसाय शेती, याशिवाय अन्नसंकलन, मासेमारी व शिकार हे इतर व्यवसाय, शेतमजूर व जंगल कामगार म्हणूनही बरेच आदिवासी राबतात. कातकरी कोळशाच्या भट्टयांवर काम करतात. चंद्रपूर जिल्ह्यात घनदाट जंगलात राहणाऱ्या माडिया गोंड जमातींत अजूनही वस्तुविनिमय पद्धत आढळते. झोपडया बांबूच्या किंवा कुडाच्या, पण स्वच्छ असतात. कपडे फार कमी वापरतात, उदा., वारली व भिल्ल केवळ लंगोटीच वापरतात. माडिया स्त्रिया कमरेभोवती मांडया झाकतील एवढाच कपडा गुंडाळतात. त्यांना मण्यांच्या दागिन्यांची फार हौस. काही आदिवासी जर्मन - सिल्व्हरचे दागिने वापरतात. माडिया गोंड अजूनही थोडया प्रमाणात चोरून फिरती शेती करतात. महाराष्ट्रातील आदिवासींचे कुटुंब सर्वसाधारणपणे एकविवाही असते. गावपाटील, भगत इ. प्रमुख व्यक्तींत बहुपत्नीकत्व आढळते. वधूमूल्याच्या रिवाजामुळे चांगल्या परिस्थितीतील आदिवासी व्यक्ती अधिक विवाह करू शकते. बहुपतिकत्व नाही. मेहुणीविवाह व क्वचित देवरविवाहाची उदाहरणे आढळतात. सेवा, सहपलायन, विनिमय, घरघुशी इ. विवाहप्रकारही आढळतात. अलीकडे शिक्षणप्रसारामुळे मुलीच्या शिक्षणावरही वधूशुल्क अवलंबून असते. स्त्रीचा दर्जा चांगला आहे व तिला पुरूषाच्या बरोबरीने वागणूक मिळते. स्त्रीस घटस्फोटाचे स्वातंत्र्य असते.



भारताच्या अरूणाचल प्रदेशातील अका जमातीच्या स्त्रीची केशभूषा

महाराष्ट्रातील आदिवासींच्या धर्मावर हिंदूधर्माचा बराच पगडा आहे. जडप्राणवाद व जादूटोणा यांवर माडिया गोंड जमातीची जास्त श्रद्धा आहे. भिल्ल लोक अर्जुनास राजा फांटा व कृष्णास गांडा ठाकूर म्हणतात. ते दिवाळी व होळी हे सण करतात, निरनिराळ्या गावांची दिवाळी निरनिराळ्या दिवशी करतात. सणांच्या व यात्रेच्या गर्दीत प्रेमप्रकार व सहपलायनाचे प्रसंग घडतात. दिवाळीस सकाळी देवाची पूजा करून त्यास बळी देण्यांत येतात. संध्याकाळी गावजेवण असते. पुजारी व मांत्रिक ह्या दोन भिन्न व्यक्ती असतात. मांत्रिक चेटूक काढणे, रोगांवर औषधे देणे इ. बाबतींत मदत करतो. बहुतेक पुजारी व मांत्रिक हे स्वत:चा शेतीव्यवसाय सांभाळून काम करतात. जमातींत गावप्रमुखही असतो. ही सर्व पदे वंशपरंपरागत असतात.

महाराष्ट्रातील भिल्ल, महादेव कोळी, ठाकूर, कातकरी, गोंड व वारली जमातींत नृत्यगीते, विवाहगीते, शिकारीची गाणी, शोकगीते, शेतकऱ्यांची गाणी, अंगाई गीते इ. लोकगीतांचे प्रकार आहेत. त्याशिवाय पौराणिक दंतकथा, उखाणे, म्हणी यांचे अलिखित लोकसाहित्य बरेच आहे.

पंडित जवाहरलाल नेहरूंनी आदिवासींच्या विकासाची पाच सूत्रे सांगितली आहेत : (१) आदिवासी लोकांनी आपली बुद्धी व कुवत यांनुसार विकास करून घ्यावा. इतरांनी त्यांच्यावर याबाबत दडपण आणू नये. त्यांच्या पारंपरिक संस्कृतींना व

(पान २८ वर पाहा)

# ‘खोटया आदिवासींचा धोका :- एक मार्गदर्शक पुस्तिका’

दादाभाऊ तळपे

चोरांच्याच उलटया बोंबा सुरू झाल्यावर आपण चोर पकडणार तरी कसा? त्यातही चोर संघटीत असतील तर मग प्रश्न अधिकच बिकट बनतो. ‘जनतेचा आवाज’ ( Voice of the People) या न्यायाप्रमाणे त्यांचं म्हणणंही खरं ठरण्याची वेळ येते. एखादी खोटी गोष्ट शंभर वेळा खरं आहे असं ठासून सांगत राहिल्यास ती खरीच वाटायला लागते.

नेमकी हीच परिस्थिती सध्या आदिवासींच्या बाबतीत झालीय. बिगर आदिवासी जातीची खोटी प्रमाणपत्रे सादर करून आदिवासींसाठी असलेल्या राखीव जागांमध्ये घुसखोरी करून सवलती लाटताहेत पुन्हां वर आम्हीच खरे आदिवासी असूनही आम्हाला जातीचे दाखले वेळेवर मिळत नाहीत म्हणून बोंबा मारतात. एवढेच नाहीतर विशिष्ट क्षेत्रात अमुक-अमुक जमात नाहीच असा जावई शोध लावून जाहीर केलेली अनुसूचित जमात म्हणजे आम्हीच असे ठासून सांगतात. तर त्याचबरोबर आम्हाला अनुसूचित जमातीत सामाविष्ट करा, जातीचे दाखले वेळेवर द्या. अशा विचित्र मागण्याही मोर्चा काढून करतात. इतिहास, भूगोल, समाजशास्त्र, अर्थशास्त्र यांचा अभ्यास नसणारे आमचे राजकिय पक्षाचे कार्यकर्ते पक्ष यंत्रणेसह त्यात सहभागी होतात. कशासाठी? केवळ मतांच्या गठ्ठयावर लक्ष ठेऊन (?)

त्यांच्या या एक सुरात ओरडण्याकडे बारकाईन लक्ष न दिल्यास विश्वास बसायला लागतो. परंतु वस्तुस्थिती वेगळी आहे. जुन्नर ( जि. पुणे ) येथे आदिवासी मेळाव्यात- ‘खोटया आदिवासींचा धोका’ या पुस्तिकेचं प्रकाशन झाले. या पुस्तिकेत या साऱ्या प्रकारावर प्रकाश टाकला आहे! मागासवर्गीयांच्या किती पिढयांनी राखीव जागांचा फायदा घेतला व गुणात्मक फरक काय पडला हे एकदा ‘खडू-फळा मोहिमे’च्या आधारे शासनाने, जाहिर करावं!

आत्ताशी मागासवर्गीयांची पहिली पिढी शिक्षण घेत आहे. राखीव जागांचा फायदा घेण्यांस ती अद्याप समर्थ व्हायची आहे. मग तुम्ही म्हणाल की, आजपर्यंत याचा फायदा घेतला कोणी? या सवालाचं उत्तर सदर पुस्तिकेनं दिलेलं आहे. एकीकडे राखीव जागांना कडवा विरोध करावयाचा आणि गैरमार्गाने आपणच त्या लाटावयाच्या असा दुहेरी नितीचा खेळ सुरू आहे.

मागासवर्गीयांच्या त्यातही बहुतांशी आदिवासींच्याच राखीव जागा व सवलती केवळ जाती-जमातींच्या नामसाधर्म्याच्या आधारे बिगर आदिवासींनी लाटल्या व लाटतात. त्यामुळे शासनाकडे आदिवासींच्या प्रगतीची खोटी आकडेवारी जमा होते व खोटे चित्र उभे राहते. सध्या शासन आदिवासींच्या यादीमधून काही जमाती वगळण्याच्या विचारात असल्याचे समजते. परंतु हा विचार अत्यंत घातक आहे. कारण ज्या जमाती वगळल्या जाणार आहेत त्यांतच प्रामुख्याने जास्त प्रमाणात घुसखोरी झालेली आहे. सदर पुस्तिकेतील वेगवेगळ्या लेखांमध्ये त्याचा उहापोह झालेला आहे. या बाबीचा फेरविचार व्हायला हवा.

या पुस्तिकेची रचनाही वैषिठ्यपूर्ण आहे. तसे हे वैचारिक पुस्तक आहे. सुरूवातीलाच प्रत्येक आदीवासी व्यक्तीने घ्यावयाची दक्षता कोणती? याचा उल्लेख आहे तशी ती आदिवासींची मूलभूत कर्तव्येच आहेत त्यात १) आपण कोण आहोत हे नीट समजून घ्यावे. २) अनुसूचित जमाती किती व कोणत्या हे लक्षात घ्यावे. ३) नावात थोडाफार-सारखेपणा असणाऱ्या जाती आपल्या जमातींच्या नावावर खोटे दाखले मिळवून फायदा घेत नाहीतना हे पाहावे. ४) खात्री पटल्याशिवाय व कारण समजल्याशिवाय कोणासही नातेवाईक वा भाऊबंद असल्याचे लिहून देऊ नये. ५) खोटया आदिवासींच्या प्रलोभनाला बळी पडू नये इ. चा समावेश आहे. पुस्तिकेचं पहिल प्रकरण प्रास्ताविक आहे. त्यात काही महत्वाचे मुद्दे उपस्थित झालेत. शासकीय नोकऱ्यांमध्ये बॅकलॉग भरला नसतांना महाराष्ट्र शासनाने शुन्याधारित अर्थसंकल्पाच्या नावाखाली नोकरभरती बंद केली आहे. किमान आदिवासींना त्यातून वगळण्यास हवं होतं.

## असे हे नेतृत्व

आमच्या नेतृत्वाचा अक्षरशः पालापाचोळा झालाय त्यांनी या प्रश्नावर एकत्र येऊन जनजागृती करायला हवी. परंतु तेही जिकडे घुगऱ्या तिकडे उदो उदो असल्या लाचार अवस्थेत आहेत. त्यांना सामाजिक जाणीवाच नाहीतं. आमच्यात सुशिक्षित मंडळी देखील

आहे. शिपायापासून साहेबापर्यंत विविध पदावर कामं करतात पण तेही अर्ध्या हळकुंडानं पिवळे झालेत. समाजासाठी काम करणं म्हणजे पोझीशन डाऊन करून घेण्यासारखं वाटतं. इ. परंतु त्यानांही चळवळीत उतरण्याचं आवाहन केलेलं आहे.

दुसऱ्या प्रकरणात आदिवासी कल्याणमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या हाय पॉवर कास्ट कमिटीने दिलेल्या अहवालाच्या आधारे तयार केलेली माहिती महाराष्ट्र शासनाने दि. २४ एप्रिल १९८५ च्या शासन निर्णयाने जातीचे दाखले देणाऱ्या सक्षम अधिकाऱ्यांना माहितीसाठी व अंमलबजावणीसाठी सोयीचे व्हावे म्हणून दिलेली आहे. त्यात खरी आदिवासी जमात व त्यांच्या नावावर फायदा घेणाऱ्या आदिवासी जाती कोणत्या यांची तुलनात्मक माहिती दिलेली आहे. यामध्ये मूळ अनुसूचित जमात तिचे राहण्याचे ठिकाण, व्यवसाय, संस्कृती, भाषा, कुलाचार इ. सर्वसाधारण माहिती असून या जमातीच्या नावावर फायदा घेणाऱ्या खोटया आदिवासींची मूळ राहण्याची ठिकाणे, व्यवसाय, संस्कृती इ. सर्वसाधारण माहिती आहे. अनुसूचित जमातीच्या यादीतील एकूण २९ जमातींची माहिती व त्यांच्या नावावर फायदा घेणाऱ्या इतर जाती यांची माहिती दिलेली असल्यामुळे नावात जरी सारखेपणा असला तरी त्या जाती - जमाती एकमेकांपासून कशा भिन्न व दोन टोकांवर आहेत याची अत्यंत हुबेहुब माहिती मिळते. ही माहिती कार्यकर्त्यांना शासनावर व खोटया लोकांवर वचक ठेवायला फार उपयोगी आहे.

दुसरी महत्वाची माहिती म्हणजे सक्षम अधिकारी जेव्हा जमातीचे प्रमाणपत्र देतात. तेव्हा त्या संबंधीचे रजिस्टर कार्यकर्त्यांना पाहावयास खुले असते तसेच ज्या इसमास आदिवासी म्हणून दाखला दिला त्या इसमाच्या गावच्या ग्रामपंचायतीच्या नोटीस फलकावर तसेच सदर इसम राहात असलेल्या इलाख्यातील आदिवासी सहकारी संस्थेच्या सूचना फलकावर त्या दाखल्याची प्रत व तो दिला असल्याची माहिती दिलेली असते. हेतू हाच कि सदर इसम खरोखरच आदिवासी आहे काय? व दाखला देण्यात काही चूक तर झाली नाही ना? याची पडताळणी व्हावी.

परंतु या पुस्तिकेत ठिकठिकाणी जी माहिती मिळते त्यावरून खोटे आदिवासी खोटेपणा जिरविण्यात किती तरबेज आहेत हे दिसून येते. त्यासाठी हे लोक प्रामुख्याने १) खऱ्या आदिवासी माणसाकडे जाऊन त्याच्या अज्ञानाचा, दारिद्र्याचा फायदा उठवून, पैशाचे आमिश दाखवून त्याच्याकडून नातेवाईक असल्याचे लिहून घेतात. २) हस्ते-परहस्ते पैसे पाठवून आदिवासी संघटना व संस्थांचे सभासद होऊन पावती घेतात व ती आदिवासी असल्याचा पुरावा म्हणून सादर करतात. ३) शाळेत दाखल होतानाच जातीच्या नावांत बदल करतात. उदा. आमदार कांती कोळी, ठाणे (मच्छिमार कोळी) यांचा मुलगा लोणावळ्यात महादेवकोळी म्हणून शिक्षण घेत आहे. बापाच्या व मुलाच्या जाती-जमाती वेगवेगळ्या असतात काय? ४) कधी लग्नसंबंध जोडून नातेसंबंध प्रस्थापित करतात. जाती - पाती नष्ट करण्यासाठी, सामाजिक अभिसरण होण्यासाठी आतंर-जातीय रोटी-बेटी व्यवहार समर्थनीय आहेत परंतु विशिष्ट हेतू, सवलतींवर डोळा ठेऊन हे घडत असेल तर त्याचं समर्थन कसं करता येईल बरं? ५) एखाद्या क्षेत्रात दावा उघडकीस आल्यास तेथील हक्क स्वत:च नाकारून दुसरीकडे त्याच दाखल्याचा उपयोग करावयाचा. ६) सध्या छाननी समितीला फक्त वैद्यकीय, अभियांत्रिकी व महाराष्ट्र लोकसेवा आयोगाद्वारे सरळ सेवा भरती यासाठी उमेदवारांची प्रमाणपत्रांची छाननी करण्याचा अधिकार आहे. ती संधी अचूक पकडून इतर क्षेत्रात मुसंडी मारावयाची उदा. M.B.B.S. ऐवजी M.A.M.S., Engg. ऐवजी Polytechnic आणि इतर व्यवसायीक क्षेत्र इ. ७) जमातीच्या नावात थोडासा फेरफार करावयाचा जसे हलबा कोष्टी ऐवजी हलबा, धोबी ऐवजी धोबा, मच्छिमार कोळी किंवा सोन कोळी ऐवजी महादेव कोळी इ. ८) छाननी समितीच्या निर्णयाविरूद्ध उच्च न्यायालयातून स्थगिती मिळवायची, गरज असेपर्यंत प्रश्न लोंबकळत ठेवायचा व गरज संपली की (उदा. पदवी प्राप्त झाल्यास) स्वत:च खटला काढून घ्यावयाचा व सवलत नको म्हणून जाहीर करावयाचं. ९) छाननी समितीच घटनाबाह्य म्हणून ओरड करावयाची.

परंतु मुंबई न्यायालयाने याचिका क्र. २०८/७१९८८ व याचिका क्र. १७ / १९८६ या वरील दिलेल्या निर्णयात छाननी समिती, ॲपिलेट ॲथॉरिटी, व शासनाचे अधिकार मान्य करून, वैध असल्याचे म्हटले आहे.

अशा प्रकारे खोटे आदिवासी खोटेपणा जिरविण्यात तरबेज तर आहेतच शिवाय सत्ता आणि संपत्तीच्या जोरावर ते काहीही करू शकतात. खोटे दाखले पवित्र देखील करू शकतात! या उलट खरा आदिवासी जागृत नाही, संघटीत नाही त्यामुळे व शासनही ढिलेपणाने आणि अर्धवट कामे करत असल्यामुळे चोर निर्ढावत आहेत, निर्ढावले आहेत.

या पुस्तिकेतील शेवटचा भाग म्हणजे यापूर्वीच वेगवेगळ्या वृत्तपत्रांतून या विषयावर येऊन गेलेल्या लेखांचं संकलन केलेलं आहे. यात आदिवासी सेवक किसनराव साबळे (गुरूजी) पासून आमदार शिवराम झोले यांच्या सारख्या मान्यवरांचे अभ्यासू व सडेतोड असे लेख आहेत. या साऱ्यांनी खोटे आदिवासी स्वत:तर फायदा घेतातच शिवाय आपल्या भावी पिढीचाही उद्धार करून घेतात. तेव्हा जाती-जमातीचे खोटे दाखले घेणारे व देणारे याच्यांवर भारतीय दंड संहितेनुसार फौजदारी खटले भरावेत कारण " म्हातारी मेल्याचं दु:ख नाही काळ सोकावतोय! " अशी मागणी केली आहे.


आदिवासी युवकांनी या पुस्तिकेचा अभ्यास करून प्रत्येक आदिवासी जमातीला या सवलतींचा किती फायदा झाला, गुणात्मक फरक किती पडला व यात गैरप्रकार किती व कसे झाले याचा शोध घ्यावा. आणि पुस्तिकेत सांगितल्याप्रमाणे आचार - विचार करावा अन्यथा चंद्र सूर्य असूनही ते असेपर्यंत आदिवासींच्या जीवनातला गडद काळोख कदापीही संपणार नाही. खोटया आदिवासींचा धोका फार मोठा आहे. त्यासाठी सतत सतर्क राहण्याचा संदेश ही पुस्तिका देते.

( 'खोटया आदिवासींचा धोका' आदिवासी जागृतीपत्रिका - पहिली. संपादक व प्रकाशक, आदिवासी समाज कृती समिती, ३४९, गवळी बाबापथ, महादेव मंदिराजवळ, दापोडी, पुणे - ४११०१२. पृष्ठे-८४ किमंत-८ रूपये.)

(पान २५ वरून चालू)

कलांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. (२) आदिवासींचे जमीनविषयक व वनविषयक हक्क मान्य केले पाहिजेत. (३) प्रशासन व विकासकार्य करण्यासाठी त्यांच्यातील लोकांना शिक्षण देऊन कार्यतत्पर करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. सुरूवातीस बाहेरच्या काही तंत्रज्ञांची आवश्यकता भासेल, परंतु आदिवासी क्षेत्रात बाहेरच्या जास्त लोकांचा शिरकाव करण्याचे टाळले पाहिजे. (४) आदिवासी क्षेत्रांवर वाजवीपेक्षा जास्त व गुंतागुंतीचे प्रशासन लादू नये व त्यांना गोंधळात पाडू नये. त्यांच्यात सामाजिक व सांस्कृतिक संस्थांद्वारे विकासकार्य साधावे. (५) आदिवासींच्या विकासकार्यासाठी किती पैसे खर्च झाले यावरून प्रगतीचा निष्कर्ष न काढता, त्यांच्या स्वभावगुणविशेषांच्या विकासाच्या आधारे तो ठरवावा.

वरील सूत्रांनुसार आदिवासींच्या जीवनात फार ढवळाढवळ न करता त्यांना सुखी जीवन जगण्यास इतरांनी मदत करावी, या दृष्टीने आदिवासी विकासयोजना सध्या राबविल्या जात आहेत.



# झगडे - झेन्डे बंद

## मनोमिलनाकडे

सिडने शहरातून आदिवासींचे प्रचंड मोर्चे चालत निघाले होते. सम्पन्न ऑस्ट्रेलियाच्या स्थापनेची दोनशे वर्ष पूर्ण झाल्याचा महोत्सव राष्ट्रभर साजरा होत असतांनाच राजधानीतून ही हजारो, अर्धवस्त्रे पेहरलेली उघडी माणसे साऱ्यांचे लक्ष वेधून घेत होती. ऑस्ट्रेलियातल्या जंगलातून, दऱ्या - खोऱ्यातून व सर्व कानाकोपऱ्यातून आलेली ही आदिवासी मंडळी ऑस्ट्रेलियाचे जगाला अपरिचित असणारे दुसरे रूप प्रकट करत होती. अर्थात सस्मित चेहऱ्याने. होय! सस्मित चेहेऱ्याने कारण प्रदिर्घ असले तरी ते नेहमीचे लॉन्ग - मार्च (!) नव्हते. त्यांच्याबरोबर त्यांच्याच रक्ताचे नातेसंबंध असणारे शहरांतील सुशिक्षित आदिवासीसुद्धा मोर्च्यात सामील होते आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे आपल्याच नातेवाईकांना व वंशजांना हे शहरी आदिवासी प्रथमच एवढया सलगीने भेटत होते. मैलोन्मैल चालत चालत जातांना या शहरी व वनवासी आदिवासींचाच नव्हे तर नागरी संस्कृतीतल्या बिगर आदिवासींचाही परस्परांशी एक प्रदिर्घ संवाद सुरू झाला. मनोमिलनाची एक नवी लहर ऑस्ट्रेलियातून लहरत गेली. पत्रकार, वकील, प्राध्यापक, विद्यार्थी - नेते सारे या आदिवासींच्या मागे मागे निघाले. परस्परांविषयीचा अविश्वास दूर सारून सारे एकमेकांना जवळून भेटलेत आणि उत्स्फूर्त प्रेमाने आदिवासींच्या समस्यांची राजधानीत खुली चर्चा झाली. संवाद, बैठका, चर्चा, सभा आणि साऱ्यांची एकमेकांशी बोलण्याची, दुसऱ्याची बाजू समजावून घेण्याची धडपड. सर्वत्र हेच दृश्य.

आदिवासी आणि बिगर आदिवासी, दोघांनाही एकमेकांच्या सहकार्याशिवाय प्रगती करता येणार नाही याची रोखठोक समजूत त्यांनी स्वत:लाच पटवून घेतली. उत्तरप्रांत जमिन प्राधीकरणाचे अध्यक्ष व आदिवासी नेते गालार्वी युनूपिंगू आपल्या भावना व्यक्त करतांना म्हणाले, "मायभूमीपासून आम्हाला तुम्ही दूर करू शकणार नाही! आणि आम्हीही तुम्हाला (बिगर - आदिवासीना) ऑस्ट्रेलियाबाहेर ढकलू शकणार नाही. आता तुम्ही आणि आम्ही एकमेकाशी जुळवून घेण्याचे दिवस आले आहेत. गोऱ्या व काळ्यांनी तडजोड करावयाची आहे. पण बिगर आदिवासींना आम्ही सांगू ईच्छितो की ज्या तुमच्या चुकांचे आम्ही बळी ठरलो, त्या चूका सुधारण्याचे रस्ते आपल्याला उपलब्ध झाले आहेत." या सामंजस्याच्या रस्त्यांचा वापर करून आदिवासींना त्यांचे जमीनीचे सर्व हक्क परत करावेत असेच हे आदिवासी नेते सांगताय. हे हक्क परत मिळणार नसतील तर आमच्या मायभूमीत तुम्ही येऊन दोनशे वर्षे झाल्याच्या आनंदात आम्ही कां सामील व्हावे असा स्पष्ट प्रश्न सुद्धा ते तेवढयाच निर्भयतेने विचारतात पण द्वेष आणि विरोधाचे रंग टाळूनच. पत्रकार निगेल हॉपकिन्सने आपल्या वृत्तपत्रात लिहीले, "सर्व तमाशे आणि दोषारोप झाल्यानंतर पुन्हा सामंजस्याचे वातावरण आले आहे. झगडे - झेन्डे, घोषणा आणि आरडाओरडा यांचे दिवस आता संपलेत. ऑस्ट्रेलियातल्या आदिवासींच्या राजकारणात १९८८ मधे एका नव्या युगाचा प्रारंभ होत आहे." हॉपकिन्स यांचे निरीक्षण कुणीही सहज मान्य करेल कारण अक्षरश: हजारो बिगर आदिवासी म्हणजेच नागरी विभागातल्या व्यक्ती व संस्थांचे प्रतिनिधी आदिवासींच्या मोर्चात उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते. व्यापक चर्चेच्या या फैलावातून अनेक नवे प्रस्ताव पुढे आले आहेत. एवढेच नव्हे तर आदिवासींच्या आंदोलनात विविध प्रकारे मदत करण्यासाठी बहुसंख्येने पुढे सरसावलेत, काहींनी आपले संसार आपल्या पाठीशी बांधून आदिवासींच्या वस्त्यांची वाट धरली.

## प्रचाराचे भ्रमणार्त

साऱ्या राष्ट्रातल्या नागरीकांची सहानुभूती मिळाल्याने आदिवासी व बिगरआदिवासीत एकजूट निर्माण करण्याची तीव्र जाणीव आली आहे. पण यामुळे आदिवासींचे सारे प्रश्न सुटलेत असे मानणे निश्चितच चूकीचे ठरेल. कारण गेली दोनशे वर्षे ब्रिटिश वंशातल्या युरोपियन व्यक्तिंनी आदिवासींच्या जमीनीची लूट केली आहे. त्यात उभारलेल्या खाण उद्योगात ज्यांचे आर्थिक हितसंबंध गुंतलेले आहेत, त्यांचा शासनव्यवस्थेवर आणि अगदी न्यायालयीन यंत्रणेवरसुद्धा फार मोठा प्रभाव आहे. या हितसंबंधीयांच्या जोरदार प्रचारांनी व्यवहारातील सारी समीकरणे आदिवासींच्या विरोधात गेली आहेत. उदाहरणार्थ आदिवासींसाठी केलेल्या जमीन कायद्यांमुळे त्यांचा प्रमाणाबाहेर फायदा होऊन अर्थव्यवस्थेवरच परिणाम होत असल्याच्या प्रचाराला

अपेक्षेबाहेर यश आले, आणि तो प्रत्येक प्रश्नात एका ठाम अडथळयाचे रूपाने उभा राहतोय. वस्तुस्थिती मात्र अगदी विरूद्ध आहे. उत्तरप्रांतातली ४० प्रतिशत जमीनीवर ताबा करणारे गोरे ऑस्ट्रेलियन-ब्रिटिश एकूण लोकसंख्येत फक्त १/१० आहेत, तर १/३ लोकसंख्या असणाऱ्या आदिवासींजवळ मात्र एकूण ४८ प्रतिशत जमीन आहे. तेरा दशलक्ष हेक्टर जमीन परकीय हितसंबंधीयाचे ताब्यात आहे. ऑस्ट्रेलियातल्याच एका नवकोट नारायणाच्या म्हणजेच पिटर शेखीन यांच्या एकटयाच्या ताब्यात या जमीनीचे क्षेत्रफळ अर्ध्या इंग्लडएवढे आहे. महसूल म्हणून पिटर शेखीन सरकारला प्रतीवर्षी प्रती स्केअर मैल जमीनीमागे ऑस्ट्रेलिया सरकारला फक्त एक डॉलर देतो. पर्यावरणाला घातक नसतील तसेच आदिवासींच्या पवित्र ठिकाणांना धक्का लागणार नसेल, तर या जमीनीवर व्यापारी गतीविधिया सुरू करण्यात आदिवासींनीही स्वारस्य दर्शविले आहे. आदिवासींच्या ताब्यात जमीन दिल्यास तेथे कुणालाच पाउलही टाकता येणार नाही, हा प्रचार असत्य असल्याचे यामुळे सिद्ध झाले.

आदिवासींचे जमीनीचे हक्क नाकारण्यासाठी ब्रिटिशांनी व ऑस्ट्रेलियन्सनी गेली दोनशे वर्ष एका भ्रमजालाला जन्म दिला आहे. "दोनशे वर्षापूर्वी ब्रिटीश येथे आले तेंव्हा सारा ऑस्ट्रेलिया अगदी सुना-सुना होता, आणि अनेक भागात तर तेच पाउल टाकणारे पहीले मानव होय" या एकाच भ्रमजालावर गोऱ्यांच्या शोषणाची व फसवणूकीची इमारत उभी आहे.

## मायभूमीचे हक्कदार

तेथे - प्रसिद्ध झालेल्या 'आदिवासींचे जमीनविषयक हक्क : राष्ट्रीय महत्वाचा नैतीक प्रश्न' या पुस्तकातल्या माहितीनुसार १७८८ म्हणजे सुमारे दोनशे वर्षापूर्वी ऑस्ट्रेलियातील आदिवासींजवळ जी जमीन होती, त्यापैकी एकूण दहा प्रतिशत जमीनही त्यांचेजवळ आज उरलेली नाही. भारतातील बिहार, ओरिसा आणि पूर्वीउत्तर प्रदेशातही नेमके असेच घडले आहे. महाराष्ट्रातील धुळे जिल्ह्यातील जमीनीचे पहिले रेकॉर्ड या शतकाच्या सुरवातीला ब्रिटीशांनी तयार केले तेंव्हा त्यात सुमारे नव्वद (९०) प्रतिशत जमीन भिल्ल, धानका, कोकणी, पावरा या जमातींची असल्याची नोंद आहे. आज धुळे जिल्ह्याचे लॅन्ड रेकॉर्ड तपासले तर काय आढळते ? तेच जे ऑस्ट्रेलियात आढळते. आज धुळे जिल्ह्यातील आदिवासींनी त्या ९० प्रतिशत जमीनींपैकी जेमतेम १० प्रतिशत जमीनीवर आपली गुजराण करताय. आणि एकेकाळी त्यांच्याच असणाऱ्या व आता गमावलेल्या त्या ८० प्रतिशत जमीनीवर ते शेतमजुरी करीत आहेत.

बिहारमधल्या आदिवासींच्या जमीनी कोळशाच्या खाणींसाठी लुटतांना क्षत्रिय जातींनी जो क्रुरपणा प्रदर्शित केला तसेच अगांवर शहारे आणणारे क्रौर्य ऑस्ट्रेलियात तेलाच्या खाणी मालकांनी म्हणजेच बाहेरून आलेल्या गोऱ्यांनी आदिवासींवर लादले होते. जॉन रॉबर्टस यांनी डोव्ह कम्युनिकेशन तर्फे प्रकाशित केलेल्या 'ऑस्ट्रेलियातील आदिवासींचे वसाहतीकरण' या पुस्तकात यांबद्दलची हृदयद्रावक सत्यकथा दिली आहे. एका विशाल नदीच्या काठावरील 'दजदा टेकडया' हे दोनशे वर्षापूर्वी तेथील आदिवासींच्या संस्कृतीचे एक विशेष केन्द्र होते. त्यांचे कायदे निश्चित करण्यासाठी एकत्र येण्याचे हे स्थान. येथेच एकत्र जमून ते त्यांच्या जमीनीबद्दलचे प्रश्न सोडवित. सण, महोत्सवप्रसंगी पूजा करण्याच्या अनेक पवित्र वस्तूसुद्धा याच टेकडयातील गुहात ठेवल्या जात असत. पण युरोपातून आलेल्या गोऱ्यांनी या ठिकाणाचा ताबा घेण्यासाठी आदिवासींच्या रक्ताचा सडाच सांडला. त्यांचे सामुदायीक हत्याकांड झाल्याचे पुरावे आजही सापडतात. जॉन रॉबर्टस यांनी या टेकडयातील गुहांना भेटी दिल्या तेंव्हा 'निप्पर टबागी' या वयोवृद्ध आदिवासीने या गुहात ठिकठिकाणी विखुरलेल्या मानवी हाडांचे पुंजके दाखविलेत. या शतकाच्या सुरवातीला ऑस्ट्रेलियातील पोलिसांनी केलेल्या आदिवासी हत्येचे ते पुरावे आहेत. आदिवासींनी अनेक शतकांपासून एका पिढीने दुसऱ्या पिढीला सुपूर्द केलेल्या त्यांच्या पूजेच्या पवित्र वस्तू खाण मालकांनी लुटून नेल्या. अनेक पवित्र वस्तूंचा विध्वंस करून मानववंशशास्त्राचे दृष्टीने परम महत्वाच्या असणाऱ्या गोष्टी त्यांनी नष्ट केल्या व साऱ्या मानवजातीचेच नुकसान केले. जीवंत माणसांविरूद्ध केलेल्या या अन्यायाने या गोऱ्यांचे समाधान न झाल्याने त्यांनी बुलडोझर आणून स्मशाने व मृतांना पुरलेल्या सर्व जागा तसेच गुहा उध्वस्त केल्यात. 'नूनकान्बट' नावाच्या या प्रदेशातल्या आदिवासींनी या साऱ्या प्रकारांविरूद्ध वेळोवेळी प्राण अर्पून जोरदार लढा दिला असला तरी तो यशस्वी मात्र कधीच झालेला नाही. ज्या जमीनीवर त्यांनी स्वतःचे प्राणांपेक्षा जास्त प्रेम केले,

जीचेसाठी रक्त सांडले, ती त्यांना सोडावीच लागली. या पराभवाने घायाळ झालेल्या आदिवासी कवीने 'धरित्री - माता' या कवितेत आपल्या दु:खाला वाट करून दिली आहे. या कवीचे नांव आहे 'शेन होवर्ड'.

आपल्या कवितेत होवर्ड त्याच्या जन्मभूमीला 'आई' म्हणून संबोधतो व 'तुझ्याच कुशीत घे, मी फार दु:खी आहे, माझ्यासाठी एक अंगाई गीत गा' अशी अंतर विचलीत करणारी विनंती करतोय. तो म्हणतो,

'परतूनी येतो तुझ्याकडे माते वसुंधरे
परतूनी येतो तुझ्याकडे
श्वास ना जुळे, व्याकुळ मी
जाणून घेण्या तुला अस्वस्थ मी
गा मजसाठी पुन्हा गीत स्वप्न समयीचे
येथेच जन्मलो, आंदुळलो, हिन्दोळलो
कवटाळीले कुशीत तुझ्या मनुष्यमात्राला
बाहुत धरशील तू वत्सले, माते वसुंधरे
गा मजसाठी पुन्हा गीत स्वप्नसमयीचे
भय दाटले उरी, कढव दु:खाचे
न संपते हे जीणे व्यथिताचे
ने मज परतूनी, ने मज परतूनी
बांधून घेशील नां तुझ्या मयिने, मातेवसुंधरे
गा मजसाठी पुन्हा गीत स्वप्नसमयीचे'

मूळ कवितेतील कारूण्य एवढे उत्कट आहे की आपल्याही भावना हेलावतात.

नव्याने गोऱ्यांच्या वसाहती निर्माण करणाऱ्यांमधील अनेकांना स्थानिक आदिवासींच्या सम्पन्न संस्कृतीची आणि हक्कांची ओळख पटली होती. उदाहरणार्थ १८४० मधे वसाहतीकरण योजनाधिकारी व ब्रिटिश नागरिक श्री जेम्स स्टिफन यांनी लिहून ठेवले आहे की, 'हे अनपेक्षित असले तरी सत्य आहे. येथील जमीनीचे सर्व हक्क येथल्या भूमिपूत्र आदिवासींचेच असल्याचे स्पष्ट आहे व त्यातील उपविभागाच्या तपशिलानिशी हे निर्विवादपणे प्रस्थापित झालेले सत्य आहे.' ब्रिटिशांनी आपल्या वसाहतीकरण्यापूर्वी ऑस्ट्रेलिया खंड निर्मनुष्य होता ही युरोपियनांची समजूत व प्रचार किती भ्रामक आहे हेच श्री जेम्स स्टिफन यांनी दाखवून दिले आहे. रॉबर्ट केली या लेखकाने आदिवासींची मातृभूमी केवळ भौगोलिक सरहद्द नसून त्यांचा नैतिक, आध्यात्मीक आधार असल्याचे प्रतिपादन केले आहे. (याच लेखात स्वतंत्रपणे प्रकाशित केलेली चौकट पहावी)

## तुमच्यासह आम्ही

स्थानिक रहिवासी असणारे आदिवासी आणि ब्रिटिश वंशाचे (अर्थातच बाहेरून आलेले) गोरे ऑस्ट्रेलियन्स यांच्यातल्या संघर्षाने अनेक हिंसक वळणे घेतली आहेत. पण त्यातली व्यर्थता आता दोन्ही बाजूच्या नागरिकांच्या लक्षात आली आहे. आपले एकमेकाबरोबरच सहजीवन आहे. आपला विकास व्हायचा असला तरी तो दुसऱ्या पक्षाबरोबर होईल व विनाश व्हायचा असला तरी तो दोघांचाही होईल याची खूणगांठ दोघांनीही लक्षात घेतली आहे. त्यामुळे एकीकडून आपल्या हितसंबंधांचे रक्षण करतांनाच, सहकार्याचे व शक्य तेथे देवाणघेवाण करून प्रश्न सोडविण्याची मनोवृत्ती निर्माण झाली आहे. 'आमचाच देश' ही हट्टाची भाषा आणि संघर्षाचे झेन्डे बाजूला सारून एकमेकाच्या सोयींचा विचार करण्याची तयारी दर्शविली जातेय. उदाहरणार्थ माऊंट ओल्गा परिसरातील विस्तीर्ण क्षेत्राचा ताबा एका जाहीर समारंभात आदिवासींना देण्यात आला. आदिवासींना या विस्तीर्ण क्षेत्राचे कायदेशीर हक्क देणाऱ्या कागदपत्रांवर गव्हर्नर जनरल सर स्टिफन यांनी स्वाक्षरी केली व हा प्रसंग ऑस्ट्रेलियातल्या सर्व राज्यात (दूरदर्शनवरील अन्य कार्यक्रम थांबवून) प्रसारीत करण्यात आला. ऑस्ट्रेलियातल्या या भागातल्या राष्ट्रीय वन्य उद्यानाच्या व्यवस्थापनातही आदिवासी व्यक्ति बहुसंख्य असतील अशी व्यवस्था करण्यात आली. परिस्थिती एका नव्या वळणावर आल्याचे २६ ऑक्टोबर १९८५ रोजी झालेल्या या कार्यक्रमाने स्पष्ट केले. गेल्या ३/४ वर्षात येणाऱ्या हजारो पर्यटकांबाबत या भागातल्या एका आदिवासी वृद्धाने आपला अभिप्राय ज्या मार्मीक शब्दात व्यक्त केला, तो नव्या युगाचा प्रारंभ सूचीत करतोय. या वृद्धाने म्हटलेय, " आज आम्हाला हक्क दिल्याचे सांगताय, पण आम्ही येथून कधीही दूर झालो नव्हतो. आम्ही हक्क कधीच सोडले नव्हते. बदल एवढाच झालाय की पूर्वी बाहेरून येणारे गोरे आम्हा आदिवासींचे नियम जाणत नव्हते. मला आनंद वाटतो की आमचे नियम आता त्यांनी आत्मसात केले आहेत. आम्ही आता बरोबरीने कामे करतो. बाहेरील माणसे येण्याला आमचा विरोध नाही, आमचे जीवनाला धक्का न लावता जगायला ते शिकलेत याची आम्हाला खुशी आहे.

**(शब्दांकन - उल्हास राजज्ञ.)**

# मातृभूमी

माझी मातृभूमी
वृक्षलता आणि पशुपक्ष्यांसह एक जिवंत व्यक्तित्वच.
आमची माणसे आणि आमची मातृभूमी, आम्ही एकाच गीताचे अर्थ आहोत.
आम्ही आमच्या, मातृभूमीला आवाज दिला आहे.
आमची जमीनच आमचे नाते आहे, आमचे कुटुम्ब आहे, आमचा वंश आहे.
आमच्या अस्तित्वाचा आणि आध्यात्मीक तत्त्वज्ञानाचा तीच तर आधार आहे.
ती घरकुल आहे आमचे.
आमच्या इतिहास - कथेशी निगडित असणाऱ्या आमच्या वंशाची ही परमपवित्र भूमी.
वंशश्रेष्ठीनी त्यांच्या प्रतिभेचा अन कर्तृत्वाचा साक्षात्कार येथेच घडविला.
आमची प्रतिके केवळ परमेश्वर नाही, आणि कलेतून जेव्हा ते साकारलेत ते केवळ मूर्ती नाहीत तर आमच्या सांस्कृतिक वारश्याची प्रतिरूपे आहेत. पूर्वकालात याच प्रतिक - गीतांनी साऱ्या विश्वाला अस्तित्व देत गायन केले.
आमच्या पूर्वजांनी पावलापावलावर विखुरलेत शब्द आणि संगीतमय नाद.
त्यामुळे या जमीनीत जीवंतता आहे.
ज्याची ज्याची या कथा - भूमीशी नाळ जोडली आहे, त्या आमच्या वंशातल्या प्रत्येकाची ही अगदी एकट्याची अन तेव्हाच साऱ्या वंशाची मालकी आमच्या पूर्वजांनी आम्हाला दिली आहे.
पण आता आमच्यातील अनेक या आदिवासी - भूमीवर नाहीत, त्यांची वस्ती येथे नाही. आणि अनेकांची आदिवासी जमात आता ओळखूही येत नाही. ते विस्थापिनाचे बळी सारे गमावून बसलेत. अन हेच आम्हाला अस्वस्थ करतेय. कारण आम्हा आदिवासींसाठी आमची जमीनच आमचे जीवन आहे. ती काही केवळ गोऱ्या युरोपियन सर्व्हेअरने आखलेली भौगोलीक हद्द नाही. ती आमच्या अस्तित्वाचा मूलबिंदू आहे. ही मातृपितृरूपी वंशदात्री जमीन; नद्या आणि ढग, वाळू आणि आकाश यातून आणि हे सारे निर्माण करणाऱ्या दैवी तत्वाने घडली आहे. मला अन माझ्या मातृभूमीला त्या एकाच दैवी शक्तिने निर्माण केले आहे. ही जन्मभूमी आमची आहे, आम्ही तीचे आहोत. माझ्या भौतीक अन आध्यात्मीक गरजांची परिपूर्ती करणारी आणि नवा इतिहास घडवणारी ही माझी मातृभूमी.
या इतिहास कथा पिढयानपिढया चालत आल्या आहेत. पवित्र जागेतल्या भाषेने त्यांना घडविले आहे. जेंव्हा ही पवित्र जमिन आम्ही गमावतो, तेव्हा आम्ही आमचा भूतकालच गमावतो, आमची स्मृती हरपते, आमच्या वंशापासूनच आम्ही तोडले जातो. खरे तर आम्ही आम्हालाच हरवून बसतो.

**रॉबर्ट केली.**

# हृदये जुळली पाहिजेत

*भारतातल्या ऐक्यावर मी विशेष भर देतो. आपण मिळविलेल्या राजकीय ऐक्यावरच नव्हे ; तर त्या पलीकडे जाऊन भावनात्मक ऐक्यावर मी भर देतो. आमची हृदये" जुळली पाहिजेत विसंवादाचे सूर विरले पाहिजेत.*

-पंडित जवाहरलाल नेहरू.

✡ ✡ ✡ ✡ ✡ ✡ ✡ ✡ ✡ ✡ ✡ ✡ ✡ ✡ ✡ ✡ ✡ ✡

(पान ४८ वरून चालू)

(१) गरीब शेतकऱ्यास म्हणजे ज्याच्याजवळ ८ युनिटपेक्षा कमी गुरे आहेत. त्यांना ४ युनिट जनावरे जंगलात मोफत चारता येतात व ४ युनिट सवलतीच्या दराने चारता येतात. यात शेती करणारे शेतमजूर, गावकामगार व खेड्यातील छोटे धंदेवाले यांचाही समावेश होतो. ज्यांच्याजवळ ८ युनिटपेक्षा जास्त जनावरे आहेत त्यांना दर औत जमिनीमागे ६ युनिट जनावरे सवलतीच्या दराने चारता येतात.

(२) जास्त जनावरांना जंगलात चारता यावे म्हणून नियमाप्रमाणे चारता येणाऱ्या गुरांच्या संख्येत २५ टक्के वाढ करता येते व ज्या ठिकाणी चराईची दुसरी सोय नाही अशा ठिकाणी सर्व नोंदलेली जनावरे उपलब्ध असलेल्या कुरणातच नियमाला अपवाद म्हणून चारण्यास परवानगी मिळते.

(३) गावापासून फार दूरच्या जंगलात गुरे चारण्यास न्यावी लागल्यास चराई आकारात एक चतुर्थांश सूट देण्यात येते.

**किरकोळ सवलती**

(१) ज्यांची घरे आगीत अथवा पुरात नष्ट झाली आहेत अशा गावांना अथवा व्यक्तींना निरनिराळ्या जातीचे इमारती लाकूड ठराविक प्रमाणात मोफत मिळते.

(२) आबादीस लागून असलेली राखीव जंगलांची हद्द ६६.०१ कि. मी. आत घेतली जाते. तसेच शेतीच्या फार जवळ जंगलांची हद्द येत असल्याची तक्रार असल्यास तिचे निवारण करता येते.

(३) काटेरी झुडपांचा दर प्रत्येक गाडीस २५ पैसे करण्यात आला आहे.

**औरंगाबाद आयुक्त विभाग**

या विभागात स्वतंत्र मंजूर केलेल्या सवलती नाहीत. मात्र ज्यांची घरे जळाली अगर पुरात वाहून गेली अशा लोकांना दुसऱ्या व तिसऱ्या प्रतीचे इमारती लाकूड जिल्ह्याधिकाऱ्यांच्या मान्यतेनुसार मोफत दिले जाते.

# महादेव कोळयांचे सण आणि उत्सव : एक मानवशास्त्रीय दृष्टीकोण.

लता बापट

मानवशास्त्रामध्ये मानवाचा सर्वांगिण अभ्यास केला जातो. त्यादृष्टीने मानवाची संस्कृती हा मानवशास्त्राचा प्रमुख विषय आहे. संस्कृतीचा विचार करीत असताना मानवशास्त्रज्ञ सांस्कृतिक बदलावर विशेष भर देतात. सांस्कृतिक बदल हा प्रामुख्याने दोन कारणांनी होतो; १) एका संस्कृतीचा दुसऱ्या संस्कृतीचा दुसऱ्या संस्कृतीशी संबंध आल्यावर त्यांच्यामध्ये रूढी, परंपरा, आचार विचार यांच्यात देवाणघेवाण होते. त्यामुळे मूळ संस्कृतीमध्ये बदल होतो. जेव्हा बाह्य संस्कृतीच्या सान्निध्यात आल्यामुळे मूळ संस्कृतीमध्ये बदल होतो तेव्हा बाह्य कारणामुळे सांस्कृतिक बदल झाला असे आपण म्हणतो. २) काही वेळेस अंतर्गत घटनांमधील संघर्षातून किंवा त्याच संस्कृतीमधील जुन्या घटनांचा, विचारांचा नवीन अर्थ समजून संस्कृतीमध्ये बदल घडून येतो. अशावेळेस अंतर्गत कारणांमुळे संस्कृतीमध्ये बदल झाला असे आपण म्हणतो.

जेव्हा बाह्य संस्कृतीच्या सान्निध्यामुळे मूळ संस्कृतीमध्ये बदल होतो तेव्हा त्या समाजातील लोक एकीकडे मूळ संस्कृतीमधील मूल्ये, रूढीपरंपरा यांचे जतन करण्याचा प्रयत्न करतात तर दुसरीकडे नवीन संस्कृतीमधील मूल्यांचा, रूढीपरंपरांचा स्विकार करून मूळसंस्कृतीमध्ये त्यांना योग्य ते स्थान देण्याचा प्रयत्न करतात. थोडक्यात नवीन मूल्ये, रूढीपरंपरा यांचे मूळ संस्कृतीच्या मूल्यांशी तादात्म्य किंवा एकरूपता कशी आणता येईल याचा प्रयत्न करतात. अशा तऱ्हेने एकीकडे नवीन संस्कृतीचे स्वागत आणि दुसरीकडे जुन्या मूल्यांचे जतन या दूहेरी प्रयत्नातूनच नवीन संस्कृती जन्माला येते. यालाच आपण सांस्कृतिक बदल असे म्हणतो.

सांस्कृतिक बदलाचा वरील दृष्टीने अभ्यास करताना त्या संस्कृतीमधील सण आणि उत्सव यांना महत्त्वाचे स्थान आहे. प्रस्तुत लेखामध्ये हिन्दू महादेव कोळी या आदिवासी समाजात होणाऱ्या सांस्कृतिक बदलाचा अभ्यास ते साजरे करीत असलेल्या सण आणि उत्सव यांच्या आधारे करण्याचा प्रयत्न केला आहे.

हिन्दू महादेव कोळी ही आदिवासी जमात महाराष्ट्रामध्ये जुन्नर, भीमाशंकर इत्यादी भागात आढळते. प्रस्तुत लेखासाठी जुन्नर तालुक्यातील खटकाळे, अंजनावळे, देवळे इत्यादी छोटया छोटया गावांमधून विखूरलेल्या या जमातीचा अभ्यास केला आहे.

हिन्दू महादेव कोळयांची मातृभाषा मराठी आहे. त्यांचा मुख्यदेव भैरवनाथ की जो शंकराचा अवतार मानला जातो तो असून विठोबा, श्रीकृष्ण, मरीमाता, कळसूबाई देव देवतांची आराधना हे लोक करतात. त्यांचा व्यवसाय शेती हा असून तो तितकासा प्रगत अवस्थेत नाही. या शिवाय मच्छीमार, मध गोळा करणे, लाकूडतोड इत्यादी दुय्यम व्यवसाय ही जमात करते. तलाठी, सरपंच, पोलीस पाटील इत्यादी मिळून गावांचा कारभार बघतात. अंजनावळे गांवामध्ये शिक्षणाचा विशेष प्रसार झालेला दिसून येतो. त्यामुळे गावांत तसेच गावांतील लोकांच्या विचारसरणीमध्ये बराच बदल झालेला दिसून येतो. याचा परिणाम म्हणजे गांवामध्ये जादूटोणा, करणी वगैरे प्रकार तितकेसे दिसून आले नाहीत किंवा भगताचे प्राबल्यही दिसून आले नाही.

जुन्नर मध्ये हे लोक बाजाराच्या निमित्ताने येत असल्यामुळे त्यांच्यावर शहरी जीवनाचा परिणाम झालेला दिसून येतो. शहरामध्ये साजऱ्या होणाऱ्या अनेक सणांचे आणि उत्सवांचे अनुकरण करून या लोकांनी त्यांचे स्वागत केले आहे.

या आदिवासी जमातीमध्ये साजरे होणारे सण आणि उत्सव यांचे दोन विभागात वर्गीकरण करता येते.

१) संस्कृतीचे जतन करण्यासाठी साजरे होणारे सण.
२) संस्कृतीच्या संवर्धनासाठी साजरे होणारे सण.

या दोन्ही विभागातील सणांची आणि उत्सवांची आपण सविस्तर माहिती घेऊ.

**संस्कृतीचे जतन करण्यासाठी साजरे केले जाणारे सण आणि उत्सव :-**

संस्कृतीचे जतन करणे ही सोपी गोष्ट नाही किंवा एखाद्या व्यक्तीचे ते काम नाही तर समाजातील अनेक लोकांनी एकत्र येऊन संस्कृतीचे जतन करणे आवश्यक असते. त्यासाठी समाजातील लोकांचे एकमेकांशी असलेले संबंध शुद्ध आणि सात्विक असण्याची गरज आहे. लोकांचे एकमेकांशी अशा प्रकारे संबंध प्रस्थापित करण्यामागे सण आणि उत्सव यांना महत्त्वाचे आहे. होळी, बैलपोळा, संक्रांत, किंकांत, दत्तजयंती, तुकाराम बीज, एकादशी इत्यादी सण या दृष्टीने महत्त्वाचे आहेत.

बैलपोळा हा एक पारंपारिक सण आहे. बैलपोळा या सणाला दुहेरी महत्त्व आहे. या सणाच्या निमित्ताने एकतर गांवांतील सगळे लोक एकत्र येतात त्यांच्यात विचारांची देवाणघेवाण होते आणि दुसरे म्हणजे आदिवासींचे त्यांच्या जनावरांवर असलेल्या प्रेमाचे ते प्रतीक आहे. आदिवासींचा मुख्य व्यवसाय म्हणजे शेती. ही शेती आजही अप्रगत अवस्थेतच आहे. त्यामुळे सहाजिकच बैल म्हणजे त्यांच्या व्यवसायातील उजवा हातच म्हणावा लागेल. या बैलांवरचे प्रेम, त्यांच्याबद्दल वाटत असणारी कृतज्ञता आदिवासी साजरा करीत असलेल्या या सणामागे दिसून येते.

या दिवशी प्रत्येक जण आपल्या बैलांना सजवितात. ते बैलांची शिंगे रंगवितात. विविध रंगांचे छाप त्यांच्या अंगावर काढतात, बैलांच्या डोक्याला बाशिंग बांधतात. अशा तऱ्हेने बैलांना सजविल्यावर हे आदिवासी बैलांची पूजा करतात, आणि त्यांना पुरणपोळीचा नैवेद्य दाखवितात. त्यानंतर या आदिवासींचा प्रमुख देव असलेल्या भैरवनाथाच्या मंदिरात बैलांना आणतात. या बैलांची लेझीम आणि ढोल यांच्या तालावर वाजत गाजत मिरवणूक काढतात. या मिरवणूकीचा शेवट अंजनावळे गावांतील आश्रमशाळेसमोर होतो.

होळी हाही एक पारंपारिक सण आहे. हा सण सुगीच्या काळात म्हणजे फाल्गुन महिन्यातील पोर्णिमेला साजरा केला जातो. या सुमारास शेतीची बरीचशी कामे संपलेली असतात. नवीन पिकं आणि धान्यं आल्यामुळे लोकही खुष आणि आनंदी असतात. त्यामुळे हा सण साजरा करण्यासाठी लोकं उत्साहाने भाग घेतात. अंजनावळे गांवातील आश्रमशाळेसमोरील मैदानात ही होळी पेटविली जाते. एका घमेल्यामध्ये गोवऱ्या, ऊसाची कांठी आणि लाकडे एकत्र ठेवली जातात. नंतर या सर्वांनी एकत्र पुजा केली जाते आणि पुरणपोळीचा नैवेद्य दाखविला जातो. या सुमारास गांवातील जमलेले लोक होळीभोवती ढोल वाजवून बोंब मारतात. या सणाच्या बाबतीत एक पारंपारिक कथा सांगितली जाते. पूर्वी भारतामध्ये हिरण्यकश्यपु नांवाचा एक क्रूर राजा राज्य करीत होता. त्याला प्रल्हाद नांवाचा मुलगा होता. हिरण्यकश्यपुला प्रल्हादाचा वध करावयाचा होता. परंतु त्याने केलेले दोन प्रयत्न फसले म्हणून हिरण्यकश्यपुची बहीण होलीका हिने प्रल्हादाला मारण्याचे आवाहन स्विकारले. तिने प्रल्हादाला मारण्याचे ठरविले. ती प्रल्हादाला मांडीवर घेऊन अग्नीवर बसली. परंतु अग्नीवर बसण्यापूर्वी तिने स्वत:भोवती अग्नीविरोधक वस्त्र गुंडाळले. तिचा हा दुष्ट विचार भगवान विष्णूंच्या लक्षात आला. त्यांनी वाऱ्याच्या सहाय्याने होलीकेच्या अंगावरील वस्त्र उडवून ते प्रल्हादाच्या अंगावर घातले. अंगावर अग्नीविरोधी वस्त्र पडल्यामुळे प्रल्हादाचे अग्नीपासून संरक्षण झाले. परंतु दुष्ट होलीका मात्र मेली. दुष्ट होलीकेचा नाश झाल्यामुळे सगळी प्रजा आनंदीत झाली. तो आनंद त्यांनी होळी पेटवून साजरा केला. त्या दिवसाची आठवण म्हणून होळी हा सण साजरा केला जातो. होळीनंतर पंधरा दिवसांनी येणारा गुडीपाडवा हा सणही हे आदिवासी लोक साजरा करतात. हिरण्यकश्यपुचा वध या दिवशी झाला असा या लोकांचा समज आहे. या दिवशी प्रत्येकजण आपल्या दारावर कांठी उभारतात, नवीन भांडे व कापड त्यावर घालतात. घरात जेवणासाठी गोडधोड करतात.

संक्रांत आणि किंक्रांत हे सणही महादेव कोळी पारंपारिकतेने साजरे करतात. १४ जानेवारीला गावांतील सगळेजण एकत्र जमतात आणि जंगलात शिकार करण्यासाठी जातात. शिकार करून आणलेले ससे, रानडुक्कर इत्यादींची गांवाला मेजवानी असते.

दत्तजयंती हाही त्यांचा एक पारंपारिक सण आहे. मार्गशीर्षातील पोर्णिमेला दत्तजयंती साजरी करतात. कुकडेश्वर या गांवामध्ये असणाऱ्या कुकडेश्वराच्या मंदिरात दत्तजयंती साजरी केली जाते. या दिवशी येथे जत्रा भरते. काही निमित्ताने शहरांमध्ये रहात असलेले महादेव कोळी दत्तजयंती साजरी करण्यासाठी कुकडेश्वर येथे एकत्र जमतात.

अशा तऱ्हेने विविध प्रकारचे पारंपारिक सण आणि उत्सव साजरे करण्याच्या निमित्ताने महादेव कोळी एकत्र येतात आणि आपल्या संस्कृतीचे जतन करण्याचा प्रयत्न करतात.

संस्कृतीचे संवर्धन, वृद्धी केवळ तिचे जतन करून होत नाही. कारण संस्कृतीचे जतन केल्यामुळे संस्कृतीची वृद्धी होत नाही तर ती क्षीण होत जाते. संस्कृतीची वृद्धी होण्यासाठी संस्कृतीमध्ये बदल घडून येणे किंवा घडवून आणणे आवश्यक आहे. हे ओळखूनच महादेव कोळ्यांनी अनेक नवीन सण आणि उत्सव यांचे स्वागत केले आहे. गेल्या दहाबारा वर्षांत शिवजयंती, नवरात्र, २६ जानेवारी, गणेशोत्सव इत्यादींसारखे उत्सव या भागात साजरे होऊ लागले आहेत. संस्कृतीच्या संवर्धनासाठी, नवीन मूल्यांचे व विचारांचे स्वागत आणि परिचय करून देण्याच्या दृष्टीने या सणांना महत्त्व आहे.

**संस्कृतीच्या संवर्धनासाठी साजरे होणारे सण-**

गणेशोत्सव, २६ जानेवारी, शिवजयंती हे उत्सव या आदिवासी भागात अलिकडेच सुरू झालेले आहेत. हे उत्सव साजरे करण्यात आदिवासी तरूणांचा महत्त्वाचा सहभाग आहे. शिक्षणाच्या निमित्ताने तसेच नोकरी, आठवडयाचा बाजार इत्यादी अनेक गोष्टींच्या निमित्ताने आदिवासी जीवनाचा शहरी जीवनाशी जवळून परिचय झाला. या परिचयातूनच शहरी जीवनातील चांगल्या गोष्टी त्यांनी उचलल्या आणि आत्मसाद केल्या. वरील उत्सव साजरे करणे हे या अनेक आत्मसाद केलेल्या गोष्टींपैकी काही होत. हे उत्सव साजरे करण्यामागचा प्रमुख उद्देश सामाजिक आणि सांस्कृतिक बदल करणे हाच आहे. आदिवासी तरूणांच्या हे लक्षात आले की हे आदिवासी श्रद्धाळू, धर्मांवर विश्वास ठेवणारे आहेत, म्हणून जर एखादा सामाजिक, सांस्कृतिक बदल घडवून आणायचा असेल तर हे सण साजरे करण्याशिवाय अन्य मार्ग नाही. हे लक्षात घेऊनच त्यांनी वरील उत्सव साजरे करण्याचे ठरविले.

गणेशोत्सव भाद्रपद महिन्यात दहा दिवस साजरा करतात. गांवांमध्ये सार्वजनिक गणपती बसविला जातो. या दहा दिवसांमध्ये अनेक सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रम करण्यात येतात. भजन, किर्तन इत्यादींद्वारा आदिवासींमध्ये नवीन मूल्यांचा प्रचार व प्रसार केला जातो.

शिवजयंती ही वैशाख महिन्यात साजरी केली जाते. या दिवशी पोवाडा, शौर्यगीते, समरगीते तसेच शिवाजी राजांच्या आयुष्यातील महत्त्वाच्या गोष्टी सांगितल्या जातात.

२६ जानेवारी या राष्ट्रीय सणाला आदिवासींमध्ये काही वेगळेच स्थान आहे. हा राष्ट्रीय सण घरोघरी साजरा न होता. आश्रमशाळेतील मुले एकत्र येऊन तो साजरा करतात. अंजानावळे येथील आश्रमशाळेतील मुले हा सण फार चांगल्या पद्धतीने साजरा करतात. पहाटेच शाळेचे अंगण झाडून स्वच्छ केले जाते. गांवातील प्रमुख व्यक्तीच्या हस्ते झेंडावंदन होते. या प्रसंगी गावांतील इतर प्रमुख व्यक्ती विद्यार्थ्यांना हिताचे शब्द सांगतात. सर्वात महत्त्वाची आणि कौतुकाची गोष्ट म्हणजे ही आदिवासी मुले मराठी बरोबरच हिन्दी आणि इंग्रजीमधून देशाच्या इतिहासाबद्दल माहिति देतात. आता हिन्दी आणि इंग्रजी मधून भाषण देण्याचा त्यांचा प्रयत्न कितीही वादाचा असला तरीदेखील तो त्यांच्या प्रगतीवर, जगाच्या बरोबर जाण्याच्या ईर्षेवर नक्कीच प्रकाश टाकतो. या दिवशी रात्री आश्रमशाळेतील मुले एकत्र येऊन विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम करतात. आम्ही ज्या प्रसंगी उपस्थित होतो तेव्हा दोन मुलींनी हुंडाबळीवर खुप सुंदर नाच केला होता तसेच दारूबंदीवरही कार्यक्रम झाला. म्हणजे विविध

**(पान ६२ बर पाहा)**

# महाराष्ट्र राज्यातील वनविषयक सवलती व कल्याण योजना

## सुधीर जोग

### प्रास्ताविक

'महाराष्ट्र राज्यातील वनविषयक सवलती व कल्याण योजना' ही पुस्तिका आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेने १९८० मध्ये प्रसिद्ध केली. आदिवासी आणि जंगल यांचे नाते अतूट आहे. आदिवासींना वनविषयक सवलतींची माहिती व्हावी व त्यायोगे वनसंवर्धनात व वनविकास कार्यात त्यांचा सहभाग वाढावा, तसेच आदिवासी क्षेत्रात काम करणाऱ्या शासकीय, अशासकीय कर्मचाऱ्यांना आदिवासींना मिळणाऱ्या वनविषयक सवलतींची माहिती व्हावी असा ही पुस्तिका प्रसिद्ध करण्याचा उद्देश असल्याचे प्रस्तावनेत नमूद करण्यात आले आहे. या पुस्तिकेत देण्यात आलेल्या माहितीचा आढावा येथे घेण्यात आला आहे.

### जंगल उत्पादने

सागवान, बिजा, ऐन, हळदू, तिवस हे महाराष्ट्र राज्यातील महत्त्वाचे जंगल आहे. गोंद, लाख, हिरडा, मेदाम, मोह, आवळा, पळसपाडा, दवीपुळले, मुरूडशेंग, काटे, शिंगे, मध, मेण, जनावरांची कातडी, कुसुम फुले, अचार, तेंदू, खिरमी, मोहाची फुले, सर्व प्रकारच्या वेली, पळसाची पाने, तेंदूची पाने, मोहाची पाने हे गौण प्रतीचे जंगल उत्पादन आहे.

### आदिवासी व जंगल यांचे अतूट नाते

महाराष्ट्र राज्यातील आदिवासी प्रामुख्याने जंगल भागात राहतात. जंगलच त्यांचे घर व उपजीविकेचे साधन आहे. जंगलातून त्यांना कंदमुळे, पाने, मध, फळे मिळतात. जंगल उत्पादन आदिवासींच्या अल्प मिळकतीला पूरकच ठरते. आदिवासी वनदेवतांना बळी अर्पण करतात आणि एखादा वृक्ष तोडण्यापूर्वी त्या झाडाला प्रथम काहीतरी अर्पण करतात. शिकारीपूर्वी व शिकारीनंतर काही धार्मिकविधी ते करतात. त्यामुळे आदिवासींना जंगलाविषयी आत्मीयतेची भावना आहे. आदिवासी शतकानुशतके जंगलात वास्तव्य करून असल्यामुळे त्यांना जंगलातील लाकूड वापरणे, इतर जंगल उत्पादन गोळा करणे आणि जंगल प्राण्यांची शिकार करणे याबाबतीत भरपूर स्वातंत्र्य मिळाल्याने जंगल हे त्यांच्याच मालकीचे आहे अशी त्यांची दृढ धारणा आहे.

### जंगलविषयक धोरणाची पुनराखणी

एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत आदिवासींनी जंगल उत्पादनाच्या वापरासंबंधी सर्व हक्क व स्वातंत्र्य इच्छेनुसार भोगले. त्यानंतर बाहेरच्या लोकांनी जंगलात प्रवेश केला व त्यांनी आपल्या स्वार्थासाठी व पैसे मिळविण्यासाठी जंगलाचा दुरूपयोग केला. शासनाने राष्ट्राच्या हिताच्या दृष्टीने जंगलाचा दुरूपयोग टाळण्यासाठी व जंगल सुरक्षित ठेवण्यासाठी आपल्या सत्तेचा क्रमशः विस्तार केला. १८९४ मध्ये जंगलासंबंधी विवक्षित धोरण आखण्यात आले. या धोरणाचे मुख्य उद्दिष्ट असे होते की, जंगलातील व्यवस्था अशी असावी की जेणेकरून सर्वसाधारणपणे जनतेचा फायदा व्हावा व जंगलाच्या परिसरात राहणाऱ्या लोकांना आजपर्यंत जे हक्क मिळाले त्यावर

बंधने घातली जावीत. जंगलविषयक नवीन धोरण अंमलात आणण्याचे समर्थन असे होते की, जंगलाचे परिसरात वास्तव्य करणाऱ्या गावकऱ्यांना त्यांच्या घरगुती व शेतीविषयक गरजा भागविण्याकरिता जंगल उत्पादनाचा उपयोग व्हावा. मात्र राष्ट्रहिताला विघातक होईल अशी कोणतीही उपाययोजना अंमलात आणू नये. स्थानिक लोकांच्या गरजा या ठरावीक मर्यादेपर्यंत पुरविण्यात याव्यात. या धोरणाची १९५२ मध्ये केंद्र सरकारने पुनराखणी केली. कारण १८९४ ते १९५० या काळात देशातील लोकसंख्या ४० टक्क्यांनी वाढली आणि परिणामी शेतीसाठी अधिक जंगल व पडीत जमिनी मिळविण्यासाठी अधिक मागणी येऊ लागली. बदलत्या अर्थकारणानुसार शेती विकास, औद्योगिक विकास व दळणवळणाच्या साधनांत सुधारणा यासाठी जंगलाचे महत्त्व किती असावे हे चांगल्या रीतीने समजावून घेतले गेले व त्याप्रमाणे केंद्र सरकारने १९५२ मध्ये पुन्हा नवीन धोरण आखले. या धोरणानुसार जंगलांचे पुढीलप्रमाणे वर्गीकरण करण्यात आले.

**जंगलाचे वर्गीकरण-**

**(अ) सुरक्षित जंगल.** -असे जंगल की, जे भौतिक दृष्टिकोणातून किंवा हवामान दृष्ट्या राखले जाते किंवा निर्माण केले जाते.

**(ब) राष्ट्रीय जंगल.** -असे जंगल की, जे सरंक्षण, दळणवळणाची साधने, उद्योगीकरण किंवा इतर लोकोपयोगी गरजा भागविण्यासाठी राखले जाते.

**(क) ग्रामीण जंगल.** -असे जंगल की, लाकडाचा पुरवठा करणे, शेतीच्या अवजारासाठी लाकूड पुरविणे, गुरांना चारा मिळविणे व इतर स्थानिक गरजांची पूर्ती व्हावी या दृष्टिकोणातून ज्याची देखभाल केली जाते.

**नवीन जंगल धोरणाचे आदिवासींवर गंभीर परिणाम**

या नवीन धोरणामुळे आदिवासींवर गंभीर परिणाम झाले. जंगलातील जमीन शेतीसाठी देण्याची सवलत काढून टाकण्यात आली. राखीव जंगलाच्या ठरवून दिलेल्या भागातून ग्रामीण लोकांच्या गरजा पुरविण्याची प्रथा बंद करण्यात आली आणि आदिवासींची जंगलातील खेडी ताब्यात घेऊन त्यावर बंधने घातली गेली. इतकेच नाही तर जनावरांना चरण्यासाठी दिलेल्या सवलतींचे प्रमाणही कमी करण्यात आले. एकेकाळी जो आदिवासी आपणास जंगलाचा राजा म्हणून संबोधित असे, तो सर्वस्वी जंगल खात्यावर परावलंबी झाला. आदिवासी वनग्राम जंगलाचा आवश्यक भाग म्हणून राहिले नाही तर निव्वळ अवलंबित ग्राम बनले. वंशपरंपरेने चालत आलेले आदिवासींचे हक्क यापुढे हक्क म्हणून ओळखले गेले नाहीत. १८९४ मध्ये ते हक्क व सवलती म्हणून संबोधले जाऊ लागले तर आता त्यांना फक्त सवलतीच म्हणून संबोधण्यात येऊ लागले.

डॉ. वेरिअर एल्विन यांनी जंगल धोरणावर टीका करताना असे म्हटले आहे की, वंशपरंपरेने चालत आलेल्या आदिवासींच्या शेतीपद्धतीवर बंधने घातली गेली व त्याला एकाच खेडयात राहण्यासाठी आदेश देण्यात आले व एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी भटकण्यावर बंधन घालण्यात आले. जर त्याचेजवळ जनावरे असतील तर ती ठरवून दिलेल्या सीमेचे उल्लंघन करतील व त्यामुळे त्याला फार मोठया प्रमाणावर दंड भरावा लागेल अशा प्रकारच्या काळजीत त्याला सतत ठेवण्यात आले. उलट तो जर वनग्रामात राहात असेल तर त्याला कोठेही जंगल खात्याच्या कामासाठी बोलावण्यात येईल असे सांगण्यात आले. जर तो अन्य ठिकाणी राहिला तर त्याला प्रत्येक प्रकारचे जंगल उत्पादन मिळविण्यासाठी निरनिराळे परवाने कायद्याने घेण्यास भाग पाडले. यामुळे आदिवासी आत्मविश्वास गमावून बसला.

**राज्यातील वनविषयक सवलती**

वनग्रामवासी व वनानजिक असलेल्या खेडयांतील गावकऱ्यांना भारतीय वनकायद्यानुसार राखीव व संरक्षित जंगलातून काही वनउत्पन्नाचा व मालाचा वापर करण्यास सवलती दिलेल्या आहेत. सर्वसाधारणपणे प्रत्येक

जिल्ह्यातील अशा सवलती वेगवेगळ्या असून त्या कोणत्या व कशा प्रकारच्या आहेत हे शासनाने वेळोवेळी प्रसिद्ध केले आहे. आदिवासी व डोंगर भागात राहणाऱ्या जमाती यांनासुद्धा वनउत्पन्ने व माल यांचा वापर करण्याबाबत काही सवलती आहेत. जंगलात व जंगलाच्या आसपास राहणाऱ्या लोकांना आपल्या घरगुती उपयोगाच्या वस्तू, शेतीची अवजारे आदिबाबत तसेच त्यांच्या इतर स्वरूपाच्या गरजा भागवता याव्यात या हेतूने या सवलती देण्यात आल्या आहेत.

या सवलतींमुळे कित्येकांच्या उपजीविकेचीही सोय झाली आहे. या सवलतींचा व्यापारी दृष्टीने उपयोग करून त्यातून फायदा मिळवू पाहणे हा त्यांचा दुरूपयोग होय. असा दुरूपयोग करता कामा नये. जंगले ही राष्ट्राची महत्त्वाची संपत्ती आहे आणि तिचा राष्ट्राकरिता व स्थानिक लोकांकरिता जास्तीत जास्त उपयोग होणे इष्ट आहे. पुढील पिढयांनाही जंगलाचा फायदा मिळेल अशा रीतीने जंगलाची जोपासना केली पाहिजे. जंगलाची उपयुक्तता दीर्घकालीन असते याची सतत जाणीव ठेवली पाहिजे आणि स्थानिक लोक, त्यांची गुरे, त्यांची शेती यांच्या दृष्टीने मोलाची असलेली ही जंगल संपत्ती धोक्यात येणार नाही अशी दक्षता घेतली गेली पाहिजें. या राष्ट्रीय संपत्तीची व्यवस्था सरकार पाहते. पण तिचे खरे विश्वस्त स्थानिक लोकच आहेत. तेव्हा या राष्ट्रीय संपत्तीची जोपासना व वाढ करणे हे गावकऱ्यांचे एक महत्त्वाचे कर्तव्य ठरते. कारण यामुळे त्यांना या सवलती व जंगलांचे सर्वसाधारण फायदे यांचा सतत लाभ होत राहतो. जंगलाची नासाडी होण्याची मुख्य कारणे म्हणजे जंगलांना लागणाऱ्या आगी, बेकायदा चराई व चोरटी तोड ही असून बव्हंशी गावकऱ्यांच्या निष्काळजीपणामुळेच जंगलाची अशी नासाडी होते.

सरकारने दिलेल्या सवलती सढळ आहेत आणि म्हणून या राष्ट्रीय संपत्तीची हानी होईल अशा कोठल्याही अनधिकृत कारवाया करण्याचे गावकऱ्यांनी टाळले पाहिजे. जंगलातून गावकऱ्यांना सरपण, इमारती लाकूड, झोपडयांकरिता वासे व शेतकी अवजारांकरिता लाकूड मिळते. इतकेच नव्हे तर जंगलापासून त्यांच्या शेतीच्या दृष्टीने फार महत्त्वाचे फायदे होतात. जंगलामुळे जमिनीची धूप होत नाही किंवा पाण्याचे दुर्भिक्ष्य पडत नाही. जंगलाची जर भरमसाट तोड झाली तर पुरामुळे व वादळामुळे गावकऱ्यांचे, घरादाराचे व शेतीचे अतोनात नुकसान होते. शेतजमिनींचा कस हा गावाजवळ जंगल आहे वा नाही यावर तसेच गावातून वाहणाऱ्या नदीनाल्यांच्या पाणलोटाच्या क्षेत्रात जंगल आहे वा नाही यावर अवलंबून असतो. नद्यांना बारमाही पाणी पाहिजे असेल तर त्यांच्या पाणलोट क्षेत्रातील जंगलांची काळजीपूर्वक जोपासना करणे जरूर आहे.

**बनविषयक सवलतींचा जिल्हावार तपशील**

जंगलाबाबतच्या सवलती व हक्क निरनिराळ्या विभागात वेगवेगळे असून काही सर्वसाधारण त्या सर्व विभागास लागू आहेत तर काही एकेका जिल्ह्यास विशिष्टपणे लागू आहेत.

सवलती व हक्क जंगलाचे उत्तम संरक्षण करण्याच्या बोलीवर लोकांना मोफत उपभोगता येतात. पण हे काही वंशपरंपरागत हक्क नव्हेत. सरकारच्या अखत्यारीतील ती बाब असून त्यात सुधारणा करण्याचा अगर ते कमी करण्याचा सरकारला पूर्ण अधिकार आहे.

पुढील सवलती ज्या गावाजवळ राखीव ( Reserved ) व संरक्षित ( Protected ) जंगल आहे त्या गावच्या लोकांना मोफत उपभोगता येतील.

सवलती उपभोगणाऱ्या प्रत्येक वनग्रामवासीयाने पुढील कर्तव्य पार पाडली पाहिजेत :-

(१) वन कर्मचाऱ्यांना जंगलातील आग विझवण्यास मदत करणे.
(२) जंगलातील गुन्हे पकडण्याच्या कामी मदत करणे.
(३) सरकारी कर्मचाऱ्यांना गुन्ह्यासंबंधी माहिती पुरविणे.
(४) जंगलविषयक गुन्हे घडू न देण्याची दक्षता घेणे.

खालील सवलती या मुंबई जंगल संहिता भाग १ यातील कलम १३२ ते १४६ प्रमाणे आहेत.

प्रत्येक वनग्रामवासियात स्वत:च्या उपयोगाकरिता स्वत:च्या डोक्यावरून नेता येईल एवढीच जंगलात उत्पन्न होणारी कोणतीही वस्तू परवान्याशिवाय नेता येते.

(१) शेतकऱ्यास शेतीस लागणारे पाणी जवळपास उपलब्ध नसल्यास परवानगीने जंगलातून मोफत नेता येते.

(२) जंगलातून नदीचे, ओढयाचे अगर तलावाचे पाणी शेतीकरिता नेता येते. तसेच जंगलातील झरे, बंधारे, तलाव अशा नैसर्गिक स्वरूपाच्या आणि ज्यावर सरकारने काहीही खर्च केलेला नाही अशा पाण्याच्या साठयातील पाणी शेतीकरिता वापरता येईल. तसेच, शेतीसाठी जंगलाच्या हद्दीत विहिरी खोदण्यास व कालवे काढण्यास परवानगी मिळते. जंगलातील तलाव व कालवे यांच्या पाण्याच्या मार्गात अडथळे आणणारी झुडपे साफ करण्यास परवानगी मिळते. यापैकी कोणत्याही कामासाठी फी आकारण्यात येत नाही.

(३) ज्या गावकऱ्यांना जंगलातून पाणी नेण्याचा हक्क आहे अशा ठिकाणी १५ मीटर (५० फूट) रूंदीचा मार्ग आखून देण्यात येतो व त्यास काटेरी कुंपण घालण्यास गावकऱ्यांना परवानगी आहे. यासाठी लागणारी काटेरी झुडपे वन विभागीय अधिकाऱ्यांच्या परवानगीने मोफत मिळतील.

(४) वनचराईस जंगले सर्वत्र खुली असतील. मात्र परप्रांतातील गुरास फी आकारली जाते. त्यांना मोफत वनचराईसाठी महसूल विभागाकडून मोफत पास मिळवावे लागतील आणि चराईबाबतच्या नियमांचे पालन करावे लागेल.

(५) गावठाणापासून सुमारे अर्धा किलोमीटरच्या आतील जंगलाचा भाग चराईसाठी खुला राहील.

(६) गावकऱ्यांच्या सोयीसाठी जंगलाच्या बंदिस्त भागातून खुल्या भागातील चराईच्या जागी जाण्यासाठी जंगल खात्याकडून मार्ग आखून देण्यात येतील.

(७) विभागीय वनधिकाऱ्यांनी संमत केलेल्या भागातून, स्वत:च्या उपयोगाकरिता अगर शेतीकरिता दगड, माती मोफत आणता येते.

(८) गळून पडलेली पाने व गवत स्वत:च्या शेतीच्या व घरकामाच्या उपयोगाकरिता आणता येते.

(९) तोंड चालू असलेल्या कूपातून त्यात रोपे लावण्याआधी खालील लाकूड नेता येते.

(अ) तोडून पडलेली व निरूपयोगी म्हणून मक्तेदारांनी टाकून दिलेली लाकडे.

(ब) तोडलेल्या झाडांच्या फांद्याची लाकडे शेतीच्या किंवा घरकामाकरिता नियमाप्रमाणे नेता येतात.

(१०) आगीत घर जळाल्यास एखादी झोपडी उभी राहील इतपत साधारणत: १० रूपये किंमतीची हलकी लाकडे मामलेदाराचा अथवा महालकऱ्याचा दाखला दाखवल्यावर नजीकचे वनक्षेत्रपाल ताबडतोब देऊ शकतात. जळीत व पूरपीडित गावकऱ्यांना पुन्हा घरे बांधण्यासाठी जंगलातून मोफत इमारती लाकूड जिल्हाधिकाऱ्यांकडून मिळणाऱ्या सबसिडीतून दिले जाते.

तसेच वनग्रामवासियांना ठरावीक इमारती लाकूड जिल्हाधिकाऱ्यांच्या संमतीने ठरविलेल्या दरात तोड चालू असलेल्या कूपातून मिळू शकते. तसेच जंगल कामगार सोसायटयाही त्यांच्या कक्षेत येणाऱ्या वनग्रामवासियांना इमारती लाकूड व सरपण फाटा देऊ शकतात. शेतीच्या अवजारांकरिताही मोफत व काही ठिकाणी माफक दरात लाकूड मिळू शकते.

वरील सर्वसाधारण सवलती व हक्कांशिवाय आणखी काही सवलती व हक्क वेगवगेळ्या जिल्ह्यांत चालू आहेत.

## ठाणे जिल्हा
## राखीव जंगल - खुले भाग

(१) राबाकरिता गवत, वाळलेली पाने, बोरू वनग्रामातील रहिवाशांना मिळतात.

(२) पुढील १४ प्रकारची बिनकिमती झुडपे तोडून नेता येतातः करवंद, बाभळी, काळाकुडा, केवणी, भुरजांभूळ, अभुरून, मस्नोडी, ऊकशी, कुडा, गोमेटी, तोरणी, भोकर कुडे, घाईती.

(३) बांबू व ताड झाडाखेरीज तोडलेल्या झाडांच्या १५ से. मी. (६ इंच) लपेटीच्या आतील फांद्या, गवत, बोरू तोडीच्या कूपातून नवीन रोपे लावण्यापूर्वी घरगुती व शेतीच्या उपयोगाकरिता नेता येतात. एखाद्या वर्षी एखाद्या जंगलात तोडीचा कूप नसल्यास जंगलातून वरील माल नेण्यासाठी लोकांना कूपात प्रवेश देण्याची खास व्यवस्था केली जाते.

(४) साग, तिवस, खैर, शिसम, ऐन व चंदन ही झाडे तोडून जंगलात पडलेली, वाळलेली झाडे वनग्रामवासियांना व डोंगरातील आदिवासींना केवळ स्वतःच्या घरगुती उपयोगाकरिता नेता येतात. पुढील १४ वन्य जमातींना ती विकण्याकरिता नेता येतातः भिल्ल, कातकरी, धोडिया, मल्हार कोळी, दुबळा, कोकणा, फासेपारधी, वडार, कैकाडी, वाघरी, मल्हार रामोशी, वेदू, ठाकूर, वारली.

(५) बांबू व कारवी वनग्रामवासी व वरील २४ वन्य जमातींना त्यांच्या गावच्या हद्दीतील जंगलातून स्वतःच्या घरगुती उपयोगाकरिता नेता येतात. तसेच कारवी परगावी विकण्याकरिता डोईओझ्यावर नेता येते.

**टीप १.** - बांबू घरगुती लहान धंद्याकरिता बिन व्यापारी दराने नेता येतात.

**टीप २.** - आठवडयातून एक वेळ डोंगरी व आदिवासी जमातींना उदरनिर्वाहाकरिता 'प्रत्येकी रूपये ३.५० किंमतीच्या बांबूच्या वस्तू तयार करून परगावी विकण्यासाठी व बिनपासाने व मोफत नेता येतात.

(६) झाडांचे काटे शेतीच्या व घरगुती उपयोगाकरिता डोईओझ्याने तसेच पासावर गाडीनेही नेता येतात. मात्र या गाडयांची वाहतूक ठरावीक मार्गानेच करावी लागते. हे पास दरवर्षी फक्त १ नोव्हेंबर ते ३० जून या काळातच वनपालाकडून किंवा रक्षकाकडून गावकऱ्यांनी घ्यावेत. ठरवून दिलेल्या जातीच्या वाटयांबाबत ही सवलत लागू आहे.

(७) आदिवासींना व वनग्रामस्थांना कोणत्या प्रकारची वनउत्पादने घरगुती वापरासाठी, शेतीसाठी अथवा विक्रीसाठी नेता येतील त्याची सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे आहे : हिरडा, बेहडा, ताडांची फळे, शिकेकाई व अन्य राखीव फळाखेरीज इतर किरकोळ वनउत्पादने-

| | |
|---|---|
| (अ) आपटा, टेंभुर्णीची पाने, बेलाची पाने, मोहाची फुले व फळे व चिल्हार साल. | केवळ स्वतःच्या घरगुती उपयोगाकरिता नेता येतात. मोहाची फळे मात्र ग्रामवासियांना विकण्यासाठी नेता येतात. |
| (ब) खाद्य, कंदमुळे, रानटी फळे, फुले, मध, मेण, डिंक व औषधी वनस्पती. | स्वतःच्या घरगुती उपयोगाकरिता व विकण्यासाठी नेता येतात. |
| (क) ताडाची पाने .. | शेती करणाऱ्या ग्रामवासिकांना घरगुती उपयोगकरिता नेता येतात. |
| (ड) काटरी झुडपे (वर कलम ६ मध्ये दिलेल्या जातीची). | आदिवासी जमातींना घरगुती उपयोगाकरिता, शेतीसाठी व विकण्याकरिता नेता येतात. |
| (इ) पळसाची पाने .. | आदिवासी जमातींना घरगुती उपयोगांकरिता व विकण्यासाठी नेता येतात. परंतु वनग्रामवासियांना स्वतःच्या घरगुती उपयोगाकरिता फक्त नेता येतात. |

(८) राखीव जंगलाच्या बंद भागामध्ये कोणत्याही सवलती नाहीत, पण वनविभागीय अधिकारी यांच्या परवानगीने गवत, बोरू, पाने (साग, आपटा, टेंभुर्णी व्यतिरिक्त) व सुकलेले लाकूड इत्यादी नेता येते.

(९) भारतीय जंगल कायद्यातील संरक्षित जंगलविषयक नियमानुसार, स्वत:करिता तसेच अन्य कामाकरिता लाकडे, झुडपे, तोडता येतील व वाहून नेता येतील. वनग्रामवासियांना फक्त स्वत:च्या उपयोगाकरिता नेता येतील.

## नाशिक जिल्हा

(१) स्वत:च्या घरगुती उपयोगाकरिता व शेतीच्या अवजाराकरिता कोणत्याही जातीचे वाळलेले व पडलेले लाकूड जंगलातून डोक्यावरून नेता येईल इतपत वाहून नेता येते.

(२) घरगुती उपयोगाकरिता कार्वी नेता येते.

(३) गवत कापून नेता येते, तसेच किरकोळ वनउत्पादने कोणत्याही जंगलातून नेता येतात.

(४) आंबा, चिंच, उंबर, आवळी, करवंद व जांभूळ ही फळे जंगलातून सुरगाणा येथील गावकऱ्यांना नेता येतात.

(५) शेतीपासून १०० फुटाच्या आत जंगल भागातून राबाकरिता झाडे तोडता येतात.

## सांगली जिल्हा

(१) सर्वसामान्य सवलतीपैकी क्र. ४ च्या सवलतीनुसार येथेही मोफत चराईची मुभा आहे.

(२) ठरावीक फी भरून वाळलेले लाकूड व किरकोळ वन उत्पादने नेता येतात.

(३) जवळ जवळ सर्व तालुक्यांतील लोकांना शिमगा सणास होळीकरता उंबर, पांगारा, सावर, मॅन्गोविन, पाछवरी व हिरेमाल इत्यादी हलक्या प्रतीची लाकडे विनामूल्य नेण्याचा हक्क आहे.

(४) साग व चंदन सोडून इतर झाडांची १५ से. मी. (६ इंच) पर्यंत व्यास असलेली पडलेली लाकडे वनग्रामवासियांना फक्त घरगुती कामासाठी नेता येतात.

(५) साग, शिसम, चंदन, होने किंवा बिबा, पत्ती किंवा ऐन सोडून इतर जातींचेही लाकूड व बांबू शेतकऱ्यास शेतापासून ३९.६ मीटर (४४ यार्डस्) पर्यंत असलेल्या वनातून 'गाळा' बांधण्यासाठी वा कुंपण घालण्यासाठी नेता येता येतात.

(६) होळीच्या सणाकरिता हलक्या प्रतीच्या १ ते ४ झाडांचे लाकूड व बांबू वर्षातून एकदा प्रत्येक खेडेगावास नेता येते. (बिगर वनग्रामांनासुद्धा ही सवलत देण्यात येते. मात्र तिचा दुरूपयोग करता कामा नये.)

(७) साग, शिसम व चंदन सोडून इतर झाडांचे लाकूड स्वत:च्या उपयोगाकरिता व शेतीच्या अवजाराकरिता वनग्रामवासियांना पुढील सवलतीच्या दराने मिळते :-

(अ) ५० रूपयांपर्यंत सारा भरणाऱ्या वनग्रामवासी शेतकऱ्यांस मोफत परमिटवर ५० रूपये किंमतीपर्यंत लाकूड.

(ब) ५० ते १५० रूपये सारा भरणाऱ्यांस मंजूर झालेल्या दराच्या निम्म्या दराने ५० रूपये किमतीपर्यंत.

(क) १५० रूपये वर सारा भरणाऱ्यास मंजूर झालेल्या दराप्रमाणे.

(८) वनग्रामवासियांना डोक्यावरून वा गाडीने कार्वी शेताच्या कामाकरिता नेता येते.

(९) (अ) शेतीच्या व घरगुती कामाकरिता काटेरी झुडपे डोईओझ्याने व गाडीभाराने मोफत वनग्रामवासियांना व बिगर वनग्रामवासियांना मिळतात.

(१०) (अ) हिरडा, शिकेकाई व करंज फळे सोडून इतर रानटी फळे नेता येतात.

(ब) पत्रावळी, चटया, विडया व घरावर घालण्याकरिता झाडांची पाने नेता येतात.

(क) तसेच सर्व तऱ्हेचे वेत नेता येतात.

(११) वन मंडळाधिकाऱ्यांच्या परवानगीने वनग्रामवासियांना त्यांच्या गावापासून एक फर्लांगाच्या आत असलेल्या दाट जंगलामधील झुडपे साफ करता येतात.

(१२) काटे व काटेरी झुडपे तोडीच्या कूपातून वनविभागाकडून पैसे भरून परमिटवर कुंपन वगैरेकरिता मिळतात.

(१) जवळपास पाणी नसल्यास कोणासही जंगलातून पाणी घेण्यास अडथळा केला जाणार नाही.

(२) (अ) कोणताही मोबदला न घेता जंगलातील विहिरी, तळी, ओढे, नद्या आणि पाण्याची नैसर्गिक स्थाने ज्यावर शासनाने पैसे खर्च केले नाहीत अशा ठिकाणाहून पाणी शेतीकरिता केव्हाही नेता येईल. (मात्र शासनाचा पाणी वापरण्याचा हक्क कायम राहील.)

(ब) शेतीकरिता पाणी वापरायचे असल्यास विहिरी व कालवे खोदण्यास मोफत परवानगी दिली जाईल. मात्र अर्जास योग्य तो कोर्ट फी स्टॅम्प लावला पाहिजे.

(क) तसेच तलावातील, कालव्यातील गाळ काढण्यात व पाण्याच्या प्रवाहास अडथळा आणणारी झुडपे वगैरे काढण्यास परवानगी दिली जाते.

(३) जंगलातून ज्या गावांना पाणी नेण्याचा हक्क आहे त्यांना १५ मीटर (५० फूट) रूंदीचा रस्ता तयार करून त्याला मोफत काटेरी झाडांचे कुंपण घालण्यास वनविभागीय अधिकाऱ्यांकडून अर्ज करून परवानगी मिळते. तशा मार्गावरील झुडपे काढून टाकण्यास गावकऱ्यांना अर्ज करून परवानगी मिळते.

(४) गावाच्या ०.४ कि. मी. च्या परिसरातील जंगल चराईस बंद ठेवले जाणार नाही.

(५) वनाधिकाऱ्यांनी संमत केलेल्या जागेवरून एखाद्याला घरगुती व शेतीच्या उपयोगाकरिता दगड व माती मोफत नेता येते.

(६) गळून पडलेली पाने व गवतसुद्धा घरगुती व शेतीच्या उपयोगाकरिता गोळा करून नेता येते.

(७) वनविभागातील घरे जळल्यास त्यात राहणाऱ्या माणसांना ताबडतोब झोपडी वगैरे बांधण्यास रू. १० पर्यंत हलक्या प्रतीची लाकडे वनाधिकारी मामलेदारच्या दाखल्यावर देऊ शकतात व पुनर्वसनाकरिता जिल्हाधिकारी सबसिडीमधून देऊ शकतात.

(८) शेतीच्या उपयोगाकरिता कार्वी नेता येते.

(९) घरावर घालण्यास कोलंब जातीचे गवत नेता येते.

(१०) मध, लाख, मोहाची व रानटी फळे नेता येतात.

(११) कुंपणास लागणारी काटेरी झुडपे नेता येतात.

(१२) राबाकरिता ठरवून दिलेल्या जातीच्या झाडांच्या फांद्या नेता येतात.

(१३) जंगलातून पाऊलवाटा तयार करण्यास परवानगी मिळते. मात्र दुसऱ्या लोकांच्या हक्कास त्यामुळे बाध न यावा. वाट तयार करण्यास लागणारा खर्च अर्जदारांनीच करावा.

(१४) खुल्या वनविभागातील गवत कापून नेता येते.

(१५) गायराने जेथे जेथे वनविभागात सामील केली जातील तेथे ती खुली करण्यात यावीत अगर जंगलातील तितकाच भाग चराईकरिता मोकळा ठेवण्यात यावा.

## रायगड (कुलाबा) जिल्हा
## (जुने जंजिरा संस्थान)

(१) ज्या लोकांना कौलीशिवाय भाताची शेती करण्याचा हक्क आहे. अशांचा त्या भागातील साग, शिसम व चदंन जातीची झाडे सोडून इतर झाडांवर हक्क राहील.

(२) परंतू ज्या जमिनी ठरावीक मुदतीकरिता शेतीस दिलेल्या आहेत व ज्यांचा शेतसारा भरावा लागतो आणि 'कौल' ही प्राप्त करून घेतला आहे अशा जमिनी ज्यांच्यापाशी आहेत त्यांचाही राखीव झाडे सोडून इतर झाडांवर हक्क आहे. मात्र इतर जमिनीतील झाडांवर हक्क नाही.

(३) जे कोणी स्वत:च्या खर्चाने सरकारी जमिनीवर झाडे लावतील त्यांचा त्या झाडांवर व त्यांच्या उत्पन्नांवर हक्क राहणार नाही.

(४) ज्या लोकांना वरकस जमिनी सर्वे डयुटीप्रमाणे दिल्या जातात त्या लोकांचा सरकारने झाडे तोडून राहिलेल्या (साग, शिसम, चंदन, हिरडा व ऐन जातीची झाडे सोडून इतर जातीच्या) झाडांच्या खुंटावर वगैरे हक्क राहील व त्यावर येणाऱ्या फुटकांवरही जमाबंदी अहवालात नमूद केल्याप्रमाणे हक्क राहील. मात्र या जमिनींच्या वहिवाटदारानांही पुढील वर्णनाच्या कोणत्याही झाडावर कोठलाही हक्क सांगता येणार नाही.

(अ) रस्त्याच्या दुतर्फा ४-५ मीटरच्या (१५ फूट) आतील झाडे.

(ब) करवंदीची झाडे सोडून इतर फळझाडे. या झाडांची विल्हेवाट शासनाने करावयाची आहे व ज्या झाडांवर सरकारी कर आहे ती झाडे.

(क) देवळे, मशिदी, धर्मशाळा, सरकारी इमारती यांच्या भोवतीची व स्मशानभूमी व सार्वजनिक उद्याने येथील सर्व झाडे सरकारने राखीव ठरवली आहेत.

(ड) तसेच नदी, नाले, तळी, झरे, विहिरी वगैरे ठिकाणची गुरांकरिता व सावलीकरिता राखून ठेवलेली झाडे.

(इ) महसूल खात्याकडून पडिक जमिनी शेतीकरिता देताना जी राखीव झाडे म्हणून ठेवली आहेत अशी झाडे. ही झाडे सरकारने तोडल्यावर त्यांच्या फुटव्यांवरही सरकाचाच हक्क राहील. ज्या लोकांस वरकस जमिनी दिल्या आहेत त्यांना वर दर्शविलेली राखीव झाडे सोडून इतर झाडे योग्य किंमतीत मिळू शकतात. मात्र सरकार ती झाडे तोडीपर्यन्त त्यांचे रक्षण करण्याची जबाबदारी त्यांचेवर राहील आणि परवानगी न घेता त्यांनी झाडे तोडल्यास ते शिक्षेस पात्र होतील. राखीव झाडांपैकी ऐन जातीच्या झाडाच्या डहाळ्या कापण्याच्या व त्यासाठी नियमानुसार वरकस जमिनीचा वापर करण्याचा हक्क वहिवाटदारास मिळू शकतो.

मात्र हक्काची झाडे तोडण्यापूर्वी कमीत कमी १० दिवस आधी नजिकच्या वनाधिकाऱ्यांना लेखी कळवून परवानगी घेणे जरूरीचे आहे. हक्काची झाडेसुद्धा मन मानेल तशी तोडता येणार नाहीत. त्यांची २० वर्षे तरी वाढ झाली पाहिजे. मात्र शेतीच्या अवजारांसाठी उदा. नांगरास ताबडतोब लाकूड पाहिजे असल्यास जाहिरनाम्यानुसार वनपालास १० दिवस आधी लेखी कळवून मगच ती झाडे तोडता येतील. शासनाने जंगल मक्तेदारांना काजूच्या झाडांची किंमत दिलेली असल्यामुळे वरकस जमिनी कसणाऱ्यांना नियमानुसार झाडांची किंमत भरल्यावरच या झाडांची मालकी देण्यात येईल. यापुढे अशा काजूच्या फळांचा लिलाव वनविभागाकडून करण्यात येऊ नये. काजूच्या झाडांची किंमत वनविभागाकडे जमा करण्यात यावी व किंमत भरल्याशिवाय झाडांची मालकी त्यांना मिळणार नाही अशी माहिती वरकस जमिनी कसणाऱ्यांना देण्यात यावी. इतर झाडांची मालकी सेटलमेंट जाहीरनामा १८९६ प्रमाणेच राहील.

शेतीकरिता, माचमाळा, गोठा वगैरे बांधण्यासाठी ठरवून दिलेल्या हलक्या प्रतीच्या झाडांची लाकडे देण्यात येतील.

## पूर्वीच्या भोर संस्थानातील सुधागड तालुका

(१) शेतीच्या कामाकरिता डहाळ्या तोडण्यास परवानगी आहे.

(२) माचमाळ्यासाठी हलक्या प्रतीच्या झाडाच्या काटक्या मामुली पैसे भरून नेता येतात.

## कोल्हापूर जिल्हा

(१) वाळून पडलेली लाकडे घरगुती उपयोगाकरिता डोईओझ्याने नेता येतात.

(२) राबाकरिता लागणारा माल (२५ डोई ओझ्यापर्यंत) मोफत नेता येतो व त्याहून जास्त नेण्यास दर डोई ओझ्यास ६ पैसे फी द्यावी लागते.

(३) इमारती लाकूड मोफत अगर ठरविलेल्या दराप्रमाणे गरिबास व गरजू माणसास देण्यात येते.

## रत्नागिरी जिल्हा

(१) शेळ्या व मेंढया सोडून इतर जनावरांस वाघेरीखेरीज इतर जंगलात मोफत चारण्यास परवानगी आहे.

(२) साग, खैर, शिसमखेरीज इतर जातीची पडलेली व वाळलेली लाकडे फक्त घरगुती उपयोगाकरिता नेता येतात. ती विकता येत नाहीत.

(३) जास्तीत जास्त १५ से. मी. (६ इंच) जाडीच्या किंवा त्याहून कमी जाडीच्या फांद्यांचे लाकूड वार्षिक तोडीच्या कूपातून नेता येते.

(४) नांगर वगैरे शेतीच्या अवजारांसाठी लाकूड मोफत मिळते.

(५) पडलेली पाने व फांद्यांचे लाकूड शेतीच्या कामाकरिता नेता येते.

(६) पाणी आणण्यासाठी, देवळात जाण्यासाठी जंगलातील वाटांचा उपयोग करण्यासाठी परवानगी आहे.

## सोलापूर व सातारा जिल्हा

सुरूवातीस दिलेल्या सर्वसाधारण १० सवलती दिलेल्या आहेत.

### विदर्भातील सवलती

नागपूर, वर्धा व चंद्रपूर विभाग

### संरक्षित जंगले

(१) निस्तार :- वझिब उल अर्जने ठरविलेल्या मर्यादेत तयार करण्यात आलेल्या निस्तार पत्रकात नमूद केलेल्या मर्यादेइतका निस्तार दिला जातो. जरूरीपुरती काटेरी झुडपे, पळसपाने वगैरे मोफत मिळतात.

(२) बांबू :- वाळलेले बांबू केवळ घरगुती उपयोगाकरिता मोफत नेता येतात व वझिब उल अर्जात खास नमूद केले असल्यास ओले बांबू मंजूर केलेल्या दराच्या निम्म्या दराने नेता येतात.

(३) घरांच्या दुरूस्तीकरिता लाकडे :- या कामासाठी सतकथा जातीच्या झाडाची लाकडे मोफत नेता येतात. साग, साल, शिसम व सेमल (साबर) जातीची लाकडे तोडण्यास मनाई आहे.

(४) घरबांधणीसाठी लागणारे लाकूड :- उपआयुक्त व महसूल खात्यातील आधिकाऱ्यांच्या परवानगीने गावकऱ्यांना पुढील प्रमाणात लाकडे मिळू शकतात.

| | | |
|---|---|---|
| (१)तहसिलदारामार्फत | .. | २०० रू. किंमतीपर्यंत |
| (२)अपर जिल्हाधिकाऱ्यामार्फत | .. | ५०० रू. किंमतीपर्यंत |
| (३)जिल्हाधिकाऱ्यांमार्फत | .. | ५०० रू. किंमतीवरील |

(५) निस्तारप्रमाणे सागाचे लाकूड :- सागाचे लाकूड मोफत मिळत नाही. पण एखाद्या गावकऱ्यास साग विकत घ्यावयाचा असल्यास महसूल अधिकाऱ्याकडे अर्ज करून मंजुरी मिळवावी लागते व नंतर जंगल विभागाकडून जंगलात झाडे कापून दिली जातात.

(६) शेतीच्या उपयोगाकरिता लागणारे जरूर तेवढे लाकूड जंगलातून मोफत मिळते.

(१) (अ) शेतकऱ्यांना लागणारे इमारती लाकूड व जळण-शेतीकरिता लागणारे ६० से. मी. (२४ इंच) वेढीच्या आतील लाकूड जिल्हाधिकारी यांच्या सल्ल्याने विभागीय वन अधिकारी यांनी ठरविलेल्या दराप्रमाणे उपलब्ध असतात. हे दर बाजारभावाच्या निम्मे असतात.

(ब) ६० से. मी. (२४ इंचाच्या) वरील वेढीचे लाकूड बाजारभावाने शेतकऱ्यांस दिले जाते.

(क) मक्तेदारांना दिलेले कुप :- मक्तेदारांनी ६० से. मी. (२४ इंच) च्या आतील वेढीचे लाकूड व सरपण विभागीय वन अधिकारी यांनी ठरवुन दिलेल्या दराप्रमाणे शेतकऱ्यांस विकावयाचे असते. हे दर बाजारभावाच्या निम्मे असतात. जेथे जेथे मोळीचा दर ६ पैशांपेक्षा जास्त आहे तेथे तेथे तो ६ पैसे करावा. मात्र जेथे ६ पैशापेक्षा कमी आहे. तेथे तोच चालू ठेवावा.

(२) शेतीच्या अवजारांना लागणारे लाकूड :- शेतकऱ्यांना गावच्या पाटलाकडून विक्रीनिदर्शक पासावर अवजारांसाठी लाकूड नेता येते. हे पास जिल्ह्यातील प्रचलित किंमतीबरहुकूम असावेत. ही सवलत दरवर्षी फक्त जून, जुलै व १५ सप्टेंबर ते १५ नोव्हेंबर या काळातच देण्यात येते.

(३) जळण व गवत :- शहराच्या ८ कि. मी. (५ मैलांच्या) परिसरातील जंगलातून सरकारने ठरविलेल्या दराप्रमाणेच मिळते. बाजारातील भाव वाढू नयेत म्हणून सरकारकडून दर निश्चित करण्यात येतात.

(४) जंगलातील पडलेल्या व विकल्या न जाणाऱ्या झाडांचे सरपण-राखीव वनातील रस्त्याच्या दोन्ही बाजूस २ किलोमीटर अंतरातील वठलेली जळणाची सर्व झाडे वनविभागामार्फत तोडून परवान्यावर लोकांना विकत दिली जातात.

(५) ज्यांची घरे जळाली अगर पुरात वाहून गेली अशांना पुनर्वसनाकरिता साग सोडून इतर लाकूड मोफत मिळू शकते. वनाधिकाऱ्यांना योग्य वाटल्यास वेळप्रसंगी सागाचेही लाकूड देतात.

(६) जर राखीव जंगलाची हद्दगावतील वाडयांना अगर झोपडयांच्या वस्तीस लागून असेल तर ती हद्द ०.१००५८४ किलोमीटर (५ साखळी) मागे हटविण्यात येईल. परंतू या पट्टयांची व्यवस्था वनविभागाकडेच राहील व हद्दी दाखविणाऱ्या रेषेची रूंदी १.५ मीटर (५ फूट) राहील.

(७) लग्नाकरिता वगैरे लागणारी सालईची १ ते २ झाडे प्रत्येकी रूपये १.२५ भरून नेता येतात.

(८) मोहा, आचार वगैरे खाण्यातील फळे मोफत नेता येतात.

(९) कुंपनाकरिता काटेरी झुडपे-जेथे काटे उपलब्ध नसतील त्या ठिकाणी वनविभागामार्फत तोडल्या जाणाऱ्या कूपातून तोडलेल्या झाडांचा झाडोरा ठरावीक दराने कुंपणाकरिता मिळतो. हिरवी काटेरी झुडपे तोडता येत नाहीत.

(१०) वनचराई.-गावकऱ्यांचे दोन भाग पाडण्यात आले आहेत. (१) शेतकरी व (२) बिगर शेतकरी. तसेच शेतकऱ्यांच्या जनावरात पुन्हा दोन भाग पाडले आहेत : (१) शेतीच्या उपयोगाची जनावरे व (२) इतर जनावरे. वनचराईतही दोन भाग आहेत : (१) सवलतीचे दर व (२) व्यापारी दर.

## भंडारा जिल्हा

नागपूर, वर्धा जिल्ह्यास लागू असलेल्या वरील सर्व सवलती या जिल्ह्यासही लागू आहेत.

## यवतमाळ जिल्हा

(१) निस्ताराच्या सवलती-घरगुती व शेतीच्या उपयोगासाठी बांबू, इमारती लाकूड इत्यादीबाबत नव्या विस्तार सवलती देण्यात येतात. तसेच पूर्वी जमीनदारी जंगलात लोकांना ज्या सवलती होत्या त्या सर्व ती जंगले शासनाने ताब्यात घेतल्यावरही चालू ठेवण्यात आल्या आहेत.

(२) वनराईच्या सवलती - नवीन चराईचे नियम, १९५२-५३ सालापासून चालू आहेत व त्याप्रमाणे ४ युनिटस् पर्यंत गुरे मोफत चारता येतात आणि बाकीची शेतकऱ्यांजवळ असलेल्या जमिनीच्या प्रमाणात सवलतीच्या दराने चारता येतात. तसेच गावापासून फार दूर चरावयास जनावरे पाठवावी लागल्यास वनचराई शेकडा २५ टक्क्यांनी कमी आकारली जाते. राखीव नजिकच्या गावातील गुरे रोज चारण्याची मुभा आहे. पण भटक्या जनावरांना मात्र राखीव जंगलात थारा मिळत नाही.

(३) शेतकऱ्यांस लागणारे इमारती लाकूड व सरपण - ६० सें. मी. (२४ इंच) रूंदीची लाकडे व सरपण फाटा स्वत:च्या घरगुती कामाकरिता व शेतीकरिता सवलतीच्या दराने खालील ठिकाणाहून मिळतो.

(१) मक्तेदारांना लीजने दिलेल्या भागातून.

(२) विरळणीच्या आणि कटाई चालू असलेल्या कूपातून बाजारभावाच्या निम्म्या दरात सरपंच अगर पाटील यांच्या दाखल्यावर या जिनसा मिळू शकतात.

(४) शेतीच्या अवजारांकरिता - खरीप व रब्बी हंगामात म्हणजे जून ते जुलै व सप्टेंबर ते नोव्हेंबर मध्ये शेतकऱ्यांना नजिकच्या राखीव जंगलातून त्यांच्या शेतीची अवजारे दुरूस्त करण्यास लागणारे लाकूड विक्रीनिदर्शक (रेटेड) पासावर मिळते व हे पास गावच्या पाटलाकडे मिळतात.

(५) राखीव जंगलातून सरपणाची सोय - ज्या भागात सरपणाची टंचाई आहे त्या भागातील लोकांना राखीव जंगलातील वठलेली, निरूपयोगी झालेली झाडे काही ठरावीक दराने आणता येतात.

(६) जळित घरांसाठी गावकऱ्यांना मिळणाऱ्या सवलती - दुसऱ्या इमारती लाकडे व गवत, जळलेली घरे पुन्हा बांधण्यास मोफत मिळतात. तसेच सगाचेही लाकूड वनाधिकाऱ्यांच्या निर्णयानुसार मोफत मिळते.

(७) गावाच्या आवारात लागून असलेल्या राखीव जंगलाची हद्द गावकऱ्यांच्या सोयीसाठी व निस्तारासाठी ०.१००५८४ कि. मी. (५ साखळी) पर्यंत मागे हटविण्यात येते.

(८) लग्नकार्यासाठी आवश्यक असणारी सालईची झाडे दर झाडास रूपये १.२५ प्रमाणे मिळू शकतात.

(९) राखीव जंगलातून मिळणाऱ्या निस्तार सवलती - मोहा, चार, डिंक वगैरे खाद्योपयोगी उत्पादने राखीव जंगलातून रयतेस मोफत नेता येतात. हल्ली त्यांचा लिलाव केला जात नाही.

(१०) गावकऱ्यांना राखीव जंगलातील नाल्यांना बांध घालता येतात तसेच त्यांची दुरूस्ती करता येते.

(११) ज्या विभागात काटेरी झुडपे नाहीत त्या भागातील शेतकऱ्यांना जंगलातून कुंपणाकरिता लागणारी काटेरी झुडपे वगैरे सवलतीच्या दरात मिळू शकतात. तसेच मक्तेदारांनी टाकून दिलेले बांबूचे अवशेष, फांद्या इत्यादी भागही सवलतीच्या दराने मिळतात.

(१२) सार्वजनिक कामाकरिता मोफत लाकडे - सार्वजनिक इमारतीकरिता राखीव जंगलातून मोफत इमारती लाकूड मिळू शकते. यात ६ से. मी. (२४ इंच) पर्यंत रूंदी असलेले लाकूड, बांबू व साल इत्यादींचा समावेश होतो. या लाकडाकरिता प्रथम जिल्हाधिकारी यांचेकडे अर्ज करून मंजुरी घ्यावी लागते व तोडीचा खर्च अधिक १० टक्के खर्च भरावा लागतो.

## अमरावती जिल्हा

यवतमाळ जिल्ह्यात असलेल्या वरील सवलती याही जिल्ह्याला लागू आहेत त्याखेरीज मेळघाट तालुक्यातील शेतकऱ्यांना पुढील सवलती मिळतात. बांबू, राजदेई, धार्णी व पाटिया सोडून सर्व बांबू कटाई खेरीज अमरावती जिल्ह्यातील अचलपूर व मेळघाट तहसील व अकोला जिल्ह्यातील अकोट तहसील यांना खुल्या आहेत. तसेच उल्लेखित ३० गावांतील रहिवाशांना स्वत:च्या घरगुती उपयोगाकरिता सवलतीच्या दराने व व्यापाराकरिता विक्रीनिदर्शक पासावर बांबू मिळू शकतात. सवलतीचा दर शंभर बांबूस रू. १.२५ असा आहे. मात्र हा दर विभागीय वन अधिकारी, जिल्हाधिकारी व वनसंरक्षक यांच्या मंजुरीने बदलू शकतात.

वरील बांबू चालू तोडीच्या कूपातून नेता येतील.

धार्णी, राजदेई व पाटिया बांबू सेरीजमधील तोडीचे कूप घरगुती उपयोगाकरिता बांबू नेण्यास वर्षभर खुले राहतील. मात्र व्यापाराकरिता दर वर्षी १ जानेवारी ते ३० एप्रिलपर्यंत बांबू नेता येतील.

मेळघाट संहिता भाग दहातील कलम ६ प्रमाणे चिखलदरा सिव्हिल स्टेशनमधील रहिवाशांना विशिष्ट सवलती मिळू शकतात.

चिखलदऱ्यातील रहिवाशांनी मागणी केल्यास त्यांना खालीलप्रमाणे लाकूडफाटा व इतर जंगलातील वस्तू मोफत मिळतील.

इमारती लाकडे - २ आरस, ४ धोरन, २५ धुनी व ५० बल्ली.

वाळलेले सरपण - २० गाड्या.

सुके बांबू - २०० नवीन बांधणीस, १०० दुरूस्तीकरिता.

हिरवे बांबू - ५०.

शाकारणीचे गवत - ५०० पुला.

सागाची पाने - १० मोळ्या.

महूल साल - ४ मोळ्या.

वनग्रामवासियांना शेतीकरिता लाकडे व काटेरी झुडपे मोफत मिळतात. घरबांधणीस व दुरूस्तीस पुरेसे लाकूड, व गवत मिळते. वाळलेले सरपण मोफत मिळते. तसेच बांबू, पाने, खाद्यफळे, फुले व कंदमुळे स्वत:च्या उपयोगाकरिता मिळतात. इमारती लाकूड व हिरवे बांबू शक्यतोवर चालू तोडीच्या कुपातून दिले जातात. जंगलातून इमारती लाकडे तोडण्यास वनसंरक्षकाची मंजुरी घ्यावी लागते. वरील सर्व सवलती इमारती व दळणवळण खात्यातील मजूर वर्गासही (रस्त्याच्या बाजूने राहणारे) मिळू शकतात. आणि त्या कमी जास्त करण्याचा अधिकार विभागीय वनाधिकाऱ्यास आहे. रयतवारी गावच्या रहिवाशांना विभागीय वनाधिकाऱ्यांच्या सांगण्यावरून जंगलातील काही कामे करण्याच्या बोलीवर जंगलातून घरगुती उपयोगाकरिता मोफत वस्तू मिळतात.

## अकोला जिल्हा

यवतमाळ जिल्ह्यास लागू असलेल्या सर्व सवलती या जिल्ह्यासही लागू आहेत. त्याशिवाय आणखी काही सवलती पुढे दिल्या आहेत :-

राखीव जंगले - (१) वन विभागाकडून तोडल्या जाणाऱ्या कूपांपैकी एकचतुर्थांश कूपातील ६० से. मी. (२४ इंच) रूंदीच्या आतील लाकडे व सरपण हे बाजारभावाच्या निम्म्या दराने गावकऱ्यांना विकता येते.

(२) तसेच विरळणी व दुय्यम कटाईची कामे चालू असलेल्या कूपामधील लाकूड शेतकऱ्यांना सवलतीच्या दराने मिळते.

(३) मक्तेदारांना त्यांच्या कूपातील ६० सें. मी. (२४ इंच) पेक्षा कमी रूंदीचे लाकूड व सरपणापैकी निम्मे सरपण शेतकऱ्यांना ठराविक दराने विकावे लागेल अशा आशयाचे एक कलम कबुलायत करारात समाविष्ट करण्यात आले आहे.

(४) शेतीच्या हंगामात जर शेतकऱ्यांची नांगरासारखी अवजारे मोडली तर ती दुरूस्त करण्यास लाकूड रेटेड पासावर ८ कि. मी. च्या (५ मैलांच्या) आतील राखीव जंगलातून मिळू शकते.

(५) रस्त्यापासून अर्धा कि. मी. च्या (२ फर्लांगाच्या) आतील वठलेली झाडे पाहून त्यापासून निघालेले सरपण जनतेस परवान्यावर नेता येते.

(६) ज्या शहराची वस्ती १०,००० किंवा त्याहून जास्त आहे अशा शहरांपासून ८ कि. मी. च्या (५ मैलांच्या) परिसरात असलेले कूप राखीव असून त्यातील गवत, सरपण रेटेड पासावर जनतेला मिळते.

**२. चराईसंबंधी सवलती** - १९५२ मध्ये शासनाने वनचराई नियमांत सुधारणा केल्या असून त्यानुसार सवलती मिळतात.

(पान ३३ वर पाहा)

# आदिवासी विकास आणि शिक्षण

## अनुताई वाघ

भारतातील अगदी मुळचे रहिवासी ते आदिवासी. यांना आदिमजाती असेही म्हणतात. यांच्यामध्येही आदि-आदिमजमाती आहेत.

जसजशी भारताबाहेरून येणाऱ्या लोकांची वस्ती भारतात होऊ लागली तसतसे हे आदिवासी डोंगर, पहाडात, जंगलात सरकत गेले आणि म्हणूनच वनवासी कल्याण आश्रम संस्थेने या मंडळींना आदिवासी असे न संबोधता वनवासी म्हणायला सुरूवात केली आहे.

वनवासी या शब्दाचा मराठीत अर्थ फार वेगळा आहे. वनवास म्हणजे त्रास, कष्ट, एक प्रकारची शिक्षा, दु:खी जीवन. आमचे आदिवासी बंधु - भगिनी खडतर जीवन कंठीत असले तरी वनवास शब्दात अभिप्रेत दु:ख अगर दु:खाबद्दल खंत त्यांच्यामध्ये नाही. सदा हसत असणे हा त्यांचा स्थायिभाव आहे. प्राप्त परिस्थितीस हसतमुखाने सामोरे जाण्याचें त्यांच्या रक्तात भिनले आहे. तेव्हा आदिवासी हा शब्द मला योग्य वाटतो.

भारतात अनेक आदिवासी जमाती आहेत. महाराष्ट्रातही पुष्कळ आहेत. माझा संबंध कोकणी, मल्हार कोळी, वारली, कातकरी मंडळींशी आला आहे. त्यांची राहणी, रीतिरिवाज, आर्थिक परिस्थिती, समज, गैरसमज यांच्याशी मी परिचित आहे. कधी कधी इतर आदिवासी जमातींतील बंधू - भगिनींची भेट होते. त्यांच्याशी केलेल्या गप्पागोष्टींतून दिसून येते की, थोडयाफार फरकाने चालीरीती, समज, गैरसमज सर्व आदिवासी जमातीत सारखेच आहेत.

मी जवळून पाहिलेले आदिवासी समाजसेवक कै. आचार्य भिसे, चाळीस वर्षापूर्वीचे चित्र त्यांच्या डोळयासमोर होते. त्या चित्रातील आदिवासी बंधु - भगिनींना पुढे - पुढे नि पुढेच आणायचे त्यांचे प्रयत्न होते आणि आज तरी अनेकांच्या प्रयत्नाने, शासनाच्या अनेक कल्याणकारी योजनांमुळे आणि आमच्या आदिवासी बंधु - भगिनींच्या सुजाण सहकारामुळे चाळीस वर्षातील चित्र बदलले आहे, ते अधिक देखणे, सुंदर होत आहे.

आदिवासींची वैशिष्टये

आदिवासी सामान्यत: आनंदी आहेत, अल्पसंतुष्ट आहेत. कष्टाळू आणि प्रामाणिक आहेत. पुष्कळ मंडळींचा समज आहे की, आदिवासी चोऱ्यामाऱ्या, खून वगैरे करण्यात पुढे आहेत, पण गेल्या चाळीस वर्षाच्या माझ्या अनुभवाने मला म्हणावेसे वाटते की हा अगदीच अपप्रचार आहे. त्यांच्यावर अन्याय होत आहे. ते फार भित्रे आहेत. त्यामुळे स्वत:वर होणारे अन्याय, स्वत:ची दु:खे मुकाटयाने गिळतात.

जंगलातील मूळ वस्तीत शिकार करणे, कच्ची कंदमुळे, फळे गोळा करणे, पर्णाच्छादित अथवा कुडाच्या घरात राहणे, पूर्वीच्या काळी वल्कले, आता साधारण कपडे वापरणे, असेच जीवन दिसते. दिवे नाहीत, संध्याकाळ झाली की गुडीचप - चिडिचप. मग सभा, खेळ, मुलांशी गप्पागोष्टी, शिक्षण वगैरे कितीतरी लांब राहिले.

जंगलातून लाकूड, लाख, डिंक, बोरे, सागाच्या बिया यांसारखी जंगली संपत्ती गोळा करता येते. त्याच्या बळावर आपण पुष्कळ पैसे मिळवू शकतो याचे भान त्यांना नाही आणि म्हणून मधली मंडळी त्यांच्याकडून अल्पशा मजुरीवर ही कामे करून घेतात. कोळशाच्या भट्टया हे सर्व यातलेच प्रकार आहेत. सर्व कामे शहाणी माणसे या मंडळींकडून थोडया मजुरीत करून घेतात. त्यांचे सर्व आयोजन परस्पर होते, म्हणून आदिवासी बंधु - भगिनींना स्वत: बुद्धी चालविणे, विचार करणे याची सवय नाही. बाहेरची मंडळी आली नाहीत तर आपण काय करू शकतो, हे त्यांना सुचत नाही. निरूपाय होऊन ते स्वस्थ बसतात, नाहीतर जवळच्या शहरात जगण्यासाठी जातात. तेथे त्यांना काम कोठे मिळते, राहायला जागा कोठे मिळते, खायला काय मिळते, नको असलेल्या कोणत्या सवयी लागतात, हे सगळे भयंकर आहे.

आणि म्हणून तुम्ही माणूस आहात, तुम्हाला पुष्कळ येते, तुमचेजवळ माती, पाणी, लाकुड सर्व आहे. तुम्हीच सहकारी सोसायटी काढा. जंगलसंपत्ती गोळा करा, विटांच्या भट्टया लावा वगैरे पटवून

द्यायला हव्या. त्यांच्यातील अस्मिता जागृत करायला हवी. त्या दृष्टीने त्यांचे शिक्षण व्हायला हवे.

आमचे आदिवासी बंधु-भगिनी प्रेमळ व विनोदी आहेत. रात्रीच्या रात्री नाचून आनंद उपभोगतात. आमच्या भागातील तारपा नृत्य, गौरी नृत्य मी पाहिले आहे. असाच बोहाडा पण पाहिला आहे. बोहाडा हे सामाजिक शिक्षणाचे प्रभावी साधन होऊ शकेल. नृत्यकलेला उत्तेजन दिले पाहिजे.

आदिवासींमधील दारूचे व्यसन ही एक मोठी समस्या आहे. पण ती एकदम सुटणार नाही. त्यांच्यातील अस्मिता जागृत करणे, व्यक्तिमत्त्वास आव्हान देणे, यामुळे व्यक्तिगत व सामाजिक विकास जसजसा होईल तसतसा हा राक्षस आपोआप गाडला जाईल.

थोडक्यात आदिवासी बंधु-भगिनी, बालके यांना सुधारित जगामध्ये योग्य स्थान मिळवून देण्यासाठी शिक्षणाची आवश्यकता आहे. ते त्यांच्या जीवनाशी मिळतेजुळते असले पाहिजे. परिसरातून टिपले पाहिजे.

शासनाने आदिवासी उपयोजनेद्वारा अनेक सोयीसवलती आदिवासींसाठी करून दिल्या आहेत. ती माहिती त्यांच्यापर्यंत पोहोचत नाही. फॉर्म भरणे, पोहोचविणे, योग्य कार्यवाही करणे या सर्व गोष्टींसाठी त्यांचे शिक्षण होणे जरूर आहे. निरक्षरतेमुळे होणारे अनर्थ त्यांच्या नजरेसमोर आणून दिले पाहिजेत. या सर्वांसाठी आदिवासी बंधु-भगिनींचे विशेषत: युवक-युवतींचे सामान्य-शिक्षण व्हायला हवे.

'सामान्य-शिक्षण' शब्द मी मुद्दाम वापरला आहे. शिक्षण म्हणजे शालेय पुस्तकी शिक्षण हा अर्थ घेतला जातो. अक्षरओळख होणे, वाचता येणे, सोपी उदाहरणे करता येणे या गोष्टी आवश्यक आहेत, पण त्याचा अर्थ त्या प्रथम नाहीत.

सर्वसामान्य शिक्षण हे आदिवासींच्या भोवती असणाऱ्या परिसरातून व घडणाऱ्या घटनांतूनच देता येते. प्रसंगाचा फायदा घ्यायचे सुचले पाहिजे, अशा शिक्षण केंद्राची अत्यंत जरूरी आहे. युवक-युवतींच्या सर्वसामान्य शिक्षणाबरोबरच आजच्या बालकांच्या शिक्षणाचाही विचार करायला हवा. लहानपणापासून जाणीव-जागृतीच्या दृष्टीने बालकांचा विकास करीत गेल्याने त्यांचे भविष्य उज्ज्वल होईल.

आदिवासी बालकांच्या शिक्षणाच्या दृष्टीने शासनाने आश्रमशाळा काढल्या आहेत. इतर अनेक सोयी-सवलती उपलब्ध केल्या आहेत. याचा फायदा नि:संशय दिसून येतो, पण तो गरजेच्या प्रमाणात फारच थोडा.

आदिवासी वस्तीत पाडयापाडयावर शिक्षण केंद्रे हवीत. शालेय पुस्तकी शिक्षणावर भर नसावा. ११ ते ५ शाळेची वेळ, वार्षिक परीक्षा, पहिली, दुसरी वगैरे अशा प्रकारची शाळा येथे उपयोगी नाही. मुलांचे सहज शिक्षण व्हायला हवे. मुलांच्या सोईने शाळेची वेळ हवी. प्रगतीप्रमाणे मुलामुलींना पुढे नेले पाहिजे. वार्षिक परीक्षा, पास नापासाची जोखड नको. आजूबाजूला पसरलेल्या नैसर्गिक शिक्षण साधनांचा भरपूर उपयोग करून घेतला पाहिजे. वाचन-पाठ, कविता, बालनाटय हे सर्व परिसरास मिळतीजुळती असली पाहिजेत.

शासनाने अनेक सोयी केल्या असूनही आज कितीतरी मुलेमुली शिक्षणापासून वंचित आहेत.

मुलांना गुरे चारायला जावे लागते, जाऊ द्या. त्यांच्या या कामातूनच शिक्षणाचे धागे पकडू या. म्हशी, बैल, बकऱ्या त्यांची नावे, खाणेपिणे, सवयी, त्यांचे बछडे, सुंदर विषय आहेत. वाचनपाठ, कविता, उदाहरणे, विज्ञान, आरोग्य, भूगोल, इतिहास सगळे सगळे घेता येईल. मुले साभांळावी लागतात, सांभाळू द्या. त्यावरूनच वरीलप्रमाणे अनेक विषय घेता येतील. लाकडे आणावी लागतात, शेतात काम करावे लागते. ठीक! ही सगळी आमची शिक्षण माध्यमे आहेत.

एक प्रयोग म्हणून दाभोण येथील १२ पाडे मिळून ३०० मुलांसाठी ३ सहजशिक्षण केंद्रे आम्ही चालविली आहेत. एक नमुना येथे देत आहे.

सध्या 'मुक्त विद्यापीठ' ही कल्पना सगळ्यांच्या मनात घोळत आहे. विद्यापीठ म्हणजे बरेच वरचे टोक झाले. या मुक्त विद्यापीठाचा पाया म्हणजेच आमचे हे सहज शिक्षण केंद्र.

आदिवासी मुलांच्या शिक्षणात येणारे अडथळे लक्षात घेऊन या शाळेची कार्यपद्धती ठरविली आहे.

शाळेची वेळ सकाळी ११ ते २
सध्यांकाळी ६.२० ते ९.

शाळेची जागा मिळाल्यास प्रशस्त झोपडी न मिळाल्यास घनदाट वृक्षाची सावली. मात्र पावसाळ्यात झोपडीचा आश्रय घ्यावाच लागतो. त्या दृष्टीने झोपडी असणे आवश्यक. पाणी जवळ असावे. शाळेत येणाऱ्या मुलांच्या दृष्टीने मध्यवर्ती ठिकाण असावे. सध्या आम्ही दोन ठिकाणी झाडाखाली व एका ठिकाणी आमच्या स्वतःच्या झोपडीत शाळा भरवीत आहोत. पावसाळ्यासाठी झोपडया पाहून ठेवल्या आहेत.

## कार्यपद्धती

सकाळी - सुट्टी.

संध्याकाळी - खेळ, कवायत, गोष्टी, गोष्टीवरून नाटके, अभिनयगीते इत्यादी.

गप्पागोष्टी - गप्पागोष्टी हा अध्यापनाचा गाभा आहे. गप्पागोष्टी अगदी मनमोकळ्या व्हाव्यात. गप्पागोष्टींमध्ये मुलांचा संपूर्ण सहभाग असावा. गप्पागोष्टींतूनच मुलांना नकळत निरनिराळ्या विषयांचे ज्ञान व्हावे.

सहली - आठवडयातून एकतरी सहल व्हावी. नदीवरची सहल, करवंदे खाण्यासाठी सहल, डिंक गोळा करण्यासाठी सहल, अशा अनेक प्रकारच्या सहली घेणे. या सहलींच्या आधारे भूगोल, आरोग्य, समाजशिक्षण, भाषा, गणित शिक्षण, चित्रकला, हस्तोद्योग आदी अनेक विषय घेता येतात.

कृती - अनेक प्रकारचे देखावे तयार करून घेणे.

जसे-
(१) डोंगरातून नदी वहात येते.
(२) रानात गुरे चरत आहेत.
(३) खळ्यावर भाताची मळणी चालू आहे.
(४) झोपडया तयार होत आहेत.
(५) आठवडयाचा बाजार भरला आहे.
(६) एक जत्रा भरली आहे.
(७) शेतात नांगर धरला आहे.

असे अनेक देखावे घेता येतील. योग्य वेळी योग्य देखावा घ्यावा.

या देखाव्यांच्या आधारे भाषा, गणित, विज्ञान, भूगोल, आरोग्य आदि सर्व विषयांना स्पर्श होतो.

प्रात्यक्षिक-

अनेक प्रकारची प्रात्यक्षिके योजावीत.

जसे-
(१) पाणी गाळणे.
(२) कपडे धुणे.
(३) अंगण सफाई.
(४) भात, भाजी करणे.
(५) पापड करणे.
(६) चिंचेचा पाला वाळविणे.
(७) पळसाची पाने गोळा करून द्रोण पत्रावळी लावणे.
(८) बियांच्या माळा करणे.

परिसरातून अशी अनेक प्रात्यक्षिके सुचतील.

मुले प्रात्यक्षिकात रमतात आणि सहजपणे कितीतरी गोष्टी शिकतात.

**हस्तकला.** - वर सांगितलेल्या कृती आणि प्रात्यक्षिकांमध्ये हाताचा उपयोग होतोच. पण विशेष करून बोटाचे कौशल्य वाढविण्यासाठी चित्रकला, मातीकाम, शिवणकाम आदी व्यवसायाची योजना होणे आवश्यक आहे.

झाडांच्या जाड काडयांचे ब्रश व मातीचे रंग यांच्या सहाय्याने झोपडीच्या भिंती, झाडांचे ओटे, सारवलेली जमीन यावर चित्रे काढता येतात. जुनी पोस्ट कार्डे गोळा करून त्यावर पांढरे कागद चिकटवून शिवणकार्डे तयार होतात. जुन्या रद्दीतून चित्रे कापून चिकटविता येतात.

**सुशोभन.** - आपण जेथे शिकण्यासाठी बसलो आहोत, ती जागा स्वच्छ व सुशोभित असली पाहिजे. यासाठी पानांची तोरणे करणे, पानाफुलांचे गुच्छ करणे, फुलांचे हार करणे, बियांच्या रांगोळ्या घालणे, निवडुंगाच्या फुलदाण्या करणे वगैरे अनेक गोष्टी येतात.

मुलांच्यातील सौंदर्य अभिरूचीचा विकास करणे हा एक हेतू आहे. मुले आनंदाने हे सगळे करतात. करता करता शिकतात. त्यांच्या या शिक्षणात सगळे विषय येतात.

गाणी, गोष्टी, नाटके हे मनोरंजनाचे आणि त्यातून सहज शिकण्याचे महत्त्वाचे माध्यम आहे.

मुलांची अनुकरण शक्ती तीव्र असते. ऐकतात पाहतात तसेच करण्याचा, त्याप्रमाणे वागण्याचा त्यांचा आग्रह असतो. या त्यांच्या अभिनयकलेस वाव मिळाला पाहिजे.

गोष्टी ऐकायची आणि तेथल्या तेथेच गोष्टीतील घटनानुसार नाटक करायचे. व्यासपीठ, पोषाख, दिव्याचा झोत कशाचीच गरज लागत नाही. गोष्टींची निवड व गोष्ट सांगण्याची प्रभावी रीत यांवर पुढचे नाटक अवलंबून आहे.

पाठांतर मुलांना आवडते. भाषा तोंडी बसते. गाण्याचे विषय मुलांच्या जीवनाशी परिचित असावे. शब्द सोपे, चाल गेय.

**खेळ कवायत.** - खेळणे ही मुलांची स्वाभाविक वृत्ती आहे. धावणे, पळणे, उडया मारणे, नाचणे, खूप आवडते. जंगलात राहणारी ही आदिवासी मुले झरझर झाडावर चढतात. उंचावरून उडया मारतात. फांदीला लोंबकळून झोके घेतात. सूरपारंब्या खेळतात. हे सगळे खेळ घ्यायला हवेत. त्यांच्या चढओढी लावाव्या. खोखो, हुतूतू, आटयापाटया, लंगडी हे सगळे खेळ आवडतात.

मुलींचे फुगडया, झिम्मा वगैरे खेळ त्यांना माहीत नाहीत ते चालू करावे.

**दुकानाचा खेळ.** - मुलांना लुटूपुटीचे खेळ आवडतात. त्यात त्यांच्या कल्पनाशक्तीचा विकास होतो. दुकानाच्या खेळामुळे व्यावहारिक ज्ञानाची पण भर पडते.

एक दुकानदार, बाकी सगळी गिऱ्हाइके, लहान टोपल्या, शिसरे, मिठाईची रिकामी खोकी, ताटल्या, डबे या सगळयांमध्ये दुकानदार आपल्या वस्तू ठेवतो. शक्य झाल्यास चणे, फुटाणे, कडधान्ये, थोडा गहू, तांदूळ हे प्रत्यक्षच द्यावे. शक्य नसल्यास पाने, खडे यानांच वरील वस्तुंची नावे द्यावी. घरी तयार केलेली तराजू पण असावी. खेडयातील मुलांना असा तराजू तयार करता येईल. पुठयाची नाणी व जाड कागदाच्या नोटा कराव्यात, फळयावर वस्तूंचे भाव लिहावे. मुलांना वाचता येत नाही हे खरे. पण वाचण्याचे वातावरण मुलांच्या भोवती असणे आवश्यक असते. शहरामध्ये निरनिराळ्या घरांवर, दुकानांवर, कचेरीवर, रस्त्यावर पाटया असतात. घरी रोज वर्तमानपत्रे येतात. पत्रे जातात, मोठी भावंडे शाळेत जातात, घरी अभ्यास करतात, परीक्षेच्या गोष्टी बोलतात. एकूण वाचनाचे, अभ्यासाचे वातावरण भोवती असते. ती उणीव भरून काढण्यासाठी झाडाझाडांना त्यांच्या नावाच्या चिठया चिटकविणे, घरांवर कार्डबोर्डावर लिहिलेल्या पाटया लटकावणे वगैरे प्रयत्न करून वाचनाचे वातावरण तयार करायला हवे.

मुले येतात, दुकानदाराजवळ वस्तूचा भाव ठरवतात. मोठया माणसाप्रमाणे घासाघीस पण करतात, मजा येते.

दुकानदाराच्या खेळामुळे सर्व विषयांना स्पर्श होतो. विशेषकरून गणित विषयास व व्यावहारिक ज्ञानास अधिक चालना मिळते.

**प्रदर्शन.** - मधूनमधून निरनिराळ्या प्रदर्शनांची योजना व्हावी. पानांचे प्रदर्शन, फुलांचे प्रदर्शन, बियांचे प्रदर्शन, पिसांचे व घरटयांचे प्रदर्शन, शंखशिंपल्यांचे प्रदर्शन, निरनिराळ्या आकाराच्या व वजनाच्या दगडांचे प्रदर्शन अशी निसर्गातील वस्तूंच्या सहाय्यानेच अनेक प्रदर्शने आयोजित करता येतात. धान्याचे प्रदर्शन, गवताचे प्रदर्शन, कणसाचे प्रदर्शन अशी प्रदर्शने आयोजित करता येतात.

प्रदर्शनाचे हेतू :

(१) मुलांच्या संग्रह वृत्तीस अवकाश मिळावा.

(२) व्यवस्थित नीटनेटकी वर्गवारी, मांडणी करण्याची सवय लावणे हा बुद्धिविकासाचा एक महत्त्वाचा भाग आहे.

(३) सामान्य ज्ञान वाढावे.

(४) भाषा विकास व्हावा.

(५) प्रदर्शन मांडण्याचे, दाखवण्याचे व आवरण्याचे काम शिक्षकांच्या मदतीने मुलेच करतात. त्यामुळे त्यांच्यामध्ये धीटपणा येतो. तेव्हा वरचेवर प्रदर्शने योजली जावीत.

**परिचय पाठ.** - निरनिराळी धान्ये, पाने, फुले, फळे, वाहने, पशु, पक्षी वगैरेंचा परिचय आहे. यासाठी काही वस्तू प्रत्यक्ष मिळतील तर काही ठिकाणी चित्राच्या साहाय्याने परिचय द्यावा लागेल.

**गृहभेटी :** - अधूनमधून एखाद्या पालकाच्या घरी सर्व मुलांना घेऊन जावे. कितीही गरिबी असली तरी घरातील मंडळी प्रेमाने मुलाचे स्वागत करतात. एकमेकांशी जवळीक निर्माण होते.

वर सांगितल्याप्रमाणे मुले सहज शिकतील अशी अनेक माध्यमे आहेत. या सर्व माध्यमांतून मुलांची मानसिक तयारी होतच असते, त्यातूनच प्रत्यक्ष वाचन, लेखन, गणित या विषयांचे शिक्षण अगदी सहजगत्या होते. उदा. गुरे चारणे.

प्रात्यक्षिक :

**गुरांचे प्रकार.** - गाई, म्हशी, बकऱ्या, गाईंची वासरे, म्हशीच्या पारडया, बकऱ्यांची कोकरे, जनावरांचे खाणेपिणे.

**शब्द.** - गाय, वासरू, गवत, चाटणे, म्हैस, पारडी, झाडापाला, हाकणे, करी, कोकरू, पाणी, हंबरणे.

अनेक शब्द येतात. मुलांकडून बोलून घेणे, फळयावर लिहिणे, वाचून दाखविणे, पाटीवर लिहून घेणे या शब्दातूनच येणाऱ्या ग, क, र, प आदि अक्षरांची ओळख करून देणे. काही दिवसांनी सर्व मुळाक्षरे होतील. ती मग क्रमाने फळयावर लिहिणे, ओळखून घेणे, हळूहळू बाराखडया घेणे.

आपण तात्कालिक तयार केलेले वाचनपाठ प्रथम व्हावेत, असे बरेच पाठ होता होताच मुळाक्षरे व बाराखडया होतात. मग बालभारतीतील धडेही वाचता येतील.

याप्रमाणेच अंकगणित.

प्रथम मोजण्याचे वातावरण तयार करणे, हळूहळू नऊपर्यंतच्या अंकांची ओळख, बिया, पाने आदींच्या सहाय्याने संख्या तयार करणे, वाचणे, लिहिणे, बेरीज, वजाबाकी, गुणाकार भागाकार घेता येतो. अत्यंत हौसेने मुले हे शिकतात.

**भूगोल.** - दिशा, जागेचा नकाशा, जवळपासच्या गावाचे अंतर, स्थानिक उत्पन्न, आठवडयाच्या बाजारात इतर ठिकाणाहून येणारे पदार्थ हे वरील सर्व माध्यमांच्या आधारे घेता येते.

**आरोग्य.** - आरोग्याच्या सवयी लावायच्या असतात. तिकडे आग्रहाने लक्ष हवे. स्वच्छता, प्राण्यांची काळजी, आहार वगैरे गोष्टींबद्दल वरील सर्व माध्यमांचा चांगला उपयोग होतो.

**इतिहास.** - वरील माध्यमापैकी गोष्टी या माध्यमाचा इतिहास व पौराणिक कथा, या कामी उपयोग होतो.

**विज्ञान.** - या विषयाचा सर्वच माध्यमाशी निकट परिचय आहे. येथे एक शंका येईल अशा मुक्त अभ्यासाला नीटनेटके स्वरूप कसे येईल. मुलांना पुढे सरकण्यासाठी इयत्ता व निश्चित अभ्यासक्रमाची गरज आहे. अभ्यासक्रम हा प्रत्यक्ष अभ्यासक्रमातूनच तयार होतो, तरी साधारण तीन वर्षांमध्ये इतरत्र चालू असणारा चार इयत्तांचा अभ्यास पूर्ण व्हावा अशी माझी कल्पना आहे. शिक्षकांजवळ दैनंदिनी हवीच. मासिक, त्रैमासिक, षण्मासिक, वार्षिक योजना हव्यातच. त्या त्यांच्या पिशवीतल्या वहीत तयार असाव्यात. मनात घोळत राहाव्यात. त्या आधारे मधून मधून चाचण्या घ्याव्यात. वार्षिक परीक्षेनंतर वर्ग बदलण्याची पद्धत नसावी. मधून मधून होणाऱ्या चाचण्यांच्या आधारे मुलांच्या प्रगतीचे मापन व्हावे. त्यानुसार त्यांना पुढचे

मार्गदर्शन होत राहावे. प्रत्येक मुलाच्या कुवतीप्रमाणे त्याला अभ्यासात प्रगती करण्याची संधी मिळावी. सारांश, शालेय सर्व विषयांचा अभ्यास वर सांगितलेल्या सर्व माध्यमातून सहजगत्या होतो. म्हणूनच ही शाळा म्हणजे सहज शिक्षण केंद्र.

चार भिंतींच्या आत पाच तास बसून परीक्षांचे जोखड मानेवर ठेवून केलेल्या अभ्यासातील जडपणा या अभ्यासात नाही. हा जिवंत उत्साहाने भरलेला पुढे पुढे जाऊ इच्छिणारा अभ्यास आहे.

आदिवासी मुला - मुलींच्या शिक्षणाबरोबरच व्यवसाय शिक्षणाची जोड हवी.

जंगलामध्ये पुष्कळ नैसर्गिक संपत्ती विखुरलेली आहे. या जणू सोन्याच्या खाणीच आहेत. याचा उपयोग कसा करून घ्यावा याकडे लहानपणापासूनच मुलांचे लक्ष वेधून घेतले पाहिजे. कल्पना लढविणे, करून पाहणे, सतत शोधीत राहणे याची मनाला सवय हवी. हाताने सतत काही करीत राहण्याचे वळण हवे. पाच तास शाळेच्या चार भिंतीत बसून नुसती पोपटपंची शिकणे यात काहीच अर्थ नाही. आमची आदिवासी बालके निसर्गाच्या मांडीवर खेळतात. त्यांना खेळत खेळत व काहीतरी करीत करीत शालेय शिक्षण व व्यवसाय शिक्षण दोन्ही करता येईल.

## विटांच्या भट्टया लावणे

(१) मुलांना मातीकाम आवडते. आमच्या बालवाडीतील मुलांनी काडयाच्या पेटयांचे साचे करून विटा पाडल्या, पाच हजार विटा जमल्या, मग आम्ही भट्टी लावली, काही विटा काळ्या झाल्या, काही बदामी झाल्या, पण दगडासारख्या टणक आपटून फुटत नाहीत. हे कामाचे ठोकळे (ब्लॉक) झाले. त्याचबरोबर पुढे जाता विटांच्या भट्टया लावण्याची पूर्वतयारी पण झाली. या भाजलेल्या विटांच्या साहाय्याने आम्ही गणित, भाषा, भूगोल, विज्ञान, खेळ या सर्व विषयांशी समन्वय साधला.

(२) अनेक प्रकारच्या बिया गोळा करणे, यात सागाचे बी, पांगाऱ्याचे बी, आबईचे बी, करंजाचे बी यांचा विशेष समावेश आहे. मुले अनेक प्रकारच्या बिया, शेंगा गोळा करतात. त्यांच्याकडून व्यापारी अगदीच नगण्य मोलाने विकत घेतात. हे काम शाळेने आपल्याकडे घ्यावे.

त्यामध्ये बाजारभाव, आर्थिक व्यवहार, वजने - मापे या सर्वांची ओळख आपोआप होते. पुस्तकातील मुद्दाम रचलेली उदाहरणे सोडविण्यापेक्षा जीवनातील चालू व्यवहारातून उदाहरण सोडविण्याचे कौशल्य प्राप्त झाले तर तेथे नापास होण्याची भीतीच नाही.

(३) पळसाची पाने व सागाची पाने गोळा करणे, पावसाळ्यात आदिवासी मंडळीच्या छत्र्या म्हणजे पळसाच्या पानाने तयार केलेली इरली, भय्या मंडळी कागदाऐवजी पळसाच्या पानातच खाऊच्या पुडया बांधतात.

पळसाच्या पानांच्या पत्रावळी छान होतात. सागाची पाने भली मोठी असतात. त्यांचाही असाच अनेक रीतीने उपयोग होतो. पावसाळ्यास सुरूवात होण्याआधी आदिवासी मंडळी आपल्या झोपडयांची छप्परे उलगडून पुन्हा नवी व्यवस्थित करून घेतात. त्या वेळी वरील दोन्ही प्रकारची पाने उपयोगी पडतात.

हे सर्व आमच्या जंगलानजिक असणाऱ्या खेडेगावातील व्यापारी मंडळींना माहीत आहे. पळसाच्या पानांचे तयार पुडे अगदीच कमी भावात ही मंडळी विकत घेतात व नंतर भरभक्कम भावाने विकतात.

आमच्या सहज शिक्षण केंद्र ऊर्फ जंगलातील शाळेनेच हा व्यवहार करावा.

(४) करवंदे, चिंचा, आवळे, जांभळे, आंबे वगैरे फळांचे हंगाम येतात. आमची वनबाळे त्या वेळी आनंदाने नाचत असतात. झाडावर चढून कच्ची फळे खाणे, करवंदाच्या जाळीत घुसून कच्ची पक्की करवंदे खाणे हा त्यांचा दिवसभराचा उद्योग असतो. मग दुसरे काही जेवण वगैरे नकोच असते. मुलांना कच्चे खायला द्यावे, असे आवर्जून शिकविण्याची येथे गरज नाही. या त्यांच्या फळे खाण्याच्या छंदामुळेच त्यांचे दात भक्कम, स्वच्छ दिसतात. त्यांची दृष्टी तीक्ष्ण असते. मुलांनी खाऊन उरल्यावर या सर्व फळांचा संग्रह करणे व तो विकणे, लोणची, मोरंबा, जेली वगैरे तयार करून विकणे या गोष्टी शाळेमार्फतच व्हाव्यात. पुन:पुन:

सांगायला नको की, यामध्ये सर्व विषयांचे शिक्षण आहे, श्रमप्रतिष्ठा आहे, आत्मगौरव आहे.

## बांबूच्या वस्तू तयार करणे

(५) सगळ्या जंगलातून बांबू मिळत नाहीत. विशिष्ट भागातच असतात. येथे सहज गुरे चारता चारता ही मुले बांबूच्या वस्तू तयार करू शकतील. त्यात मुख्यतः त्यांच्या आवडत्या बासऱ्या, बैलगाडीला लागणाऱ्या वंगणाचे नळे, सुपे, टोपल्या, करंडया, वगैरे अनेक वस्तू.

(६) काही जंगलांतून विशिष्ट प्रकारचे गवत आढळते. आपण मोळाचे कुंचे म्हणतो, ते एक प्रकारचे गवतच आहे. अशा काही काही गवताच्या टोप्या तयार करतात. हा व्यवसाय लक्ष देऊन वाढविला तर त्याला चांगला बाजार आहे.

## खजुरीच्या पानांच्या चटया

(७) खजुरीची झाडे जेथे जास्त प्रमाणात आहेत तेथे हा धंदा जोरात चालेल. सध्या म्हातारी माणसेच चटया विणीत बसतात. मुलांनाही हा छंद लावला पाहिजे. बोटाला वळण, पोटाला खाणे हा दुहेरी लाभ आहे.

(८) आणखी बारकाईने पाहू गेल्यास जंगलातील लहान मोठ्या ओढ्यांच्या, नद्यांच्या काठी सापडणारे दगड, शंख, शिंपले या सर्वांचा संग्रह करणे त्यासाठीपण बाजार आहे.

(९) मासे पकडणे हा एक जंगलातला सहज होणारा व्यवसाय आहे. समुद्र अथवा मोठ्या नद्यांमध्ये अनेक प्रकारचे व पुष्कळ मासे येथे मिळत नाहीत. पण आदिवासींचे रोजचे भक्ष्य असणारे मासे, खेकडे वगैरे मिळतात.

(१०) पशू, पक्षी यांना पाळावे, प्रेम लावावे, ही सवय पण लहानपणापासूनच लागली पाहिजे. त्यासाठी कुक्कुटपालन, वासरांची जोपासना करणे या गोष्टी शाळेकडून व्हाव्यात.

अशा पुष्कळ गोष्टी सांगता येतील. लहानपणापासून अशा रीतीने उद्योगाची सवय लागली तर मोठेपणी जगण्यासाठी म्हणून जवळच्या शहरात पळणे आणि कोठे तरी मजुरी करणे ही प्रवृत्ती थांबेल.

## नवीन शैक्षणिक धोरण ठरविताना आदिवासी बालकांच्या शिक्षणासाठी

(१) थोडया थोडया अंतरावर शाळा असाव्यात. पाडे एकमेकापासून लांब असतात. मध्ये लहान नद्या, नाले असतात. पावसाळ्यात मुलांना शाळेत जाणे जमत नाही.

थोडया वेळाच्या असल्या तरी चालेल पण वस्तीपासून जवळ शाळा असाव्यात.

(२) परिसरातून शिक्षण हे धोरण असावे.

(३) तिमाही, सहामाही, वार्षिक अशा ठरावीक परीक्षा नसाव्यात. मधून मधून चाचण्या घेऊन प्रगतीप्रमाणे मुलांना पुढे पुढे नेत राहावे.

(४) शाळेमध्येच व्यवसायकेंद्रही असावे.

(५) अशा शाळा चालविण्यासाठी म्हणून हौशी शिक्षकांचे खास प्रशिक्षण व्हावे.

(६) शिक्षकांनी शाळेच्या जागीच राहिले पाहिजे. त्यासाठी शाळागृहाबरोबरच एक शिक्षकनिवासही बांधला जावा. शिक्षकांकडून भाडे घ्यायला हरकत नाही.

(७) वरील नमुन्यातील शाळांची पाहणीही सर्व हेतू लक्षात घेऊनच व्हावी.

# आदिवासींमधील सांस्कृतिक बदल आणि संघर्ष

## डॉ. गोविंद गारे

संस्कृती म्हणजे काय? संस्कृती या शब्दाचा अर्थ शब्दकोषाप्रमाणे असा आहे : 'आपण जोपासना केल्यामुळे जो छानदारपणा (म्हणजे रिफाइनमेंट) आला आहे तो'. दुसरा अर्थ, 'सुधारणेचा एक प्रकार'. मानवशास्त्रज्ञ ज्या ज्या वेळी 'आदिवासी' वर लिहितात, त्या वेळी त्यांचा भर संस्कृतीवर असतो. आदिवासी बांधवांची एक निराळी पण फार जुनी अशी संस्कृती आहे. पण जसजशी ही मंडळी बाहेरच्या जगाच्या संपर्कात येतात तसतशी त्यांची ही संस्कृती देशाच्या संस्कृतीत विलीन होत असते हे निर्विवाद होयः आज ही बहुतेक मंडळी समाजापासून दूर अशा राना-डोंगरांत राहात आहेत. त्यांची स्वतःची गावेच्या गावे वसलेली आहेत. पण आता ह्या राना-डोंगरांतही रस्ते व दळणवळणाची इतर साधने उपलब्ध होऊ लागली आहेत. त्यायोगे बाहेरच्या समाजाबरोबर ह्या लोकांचा संबंध वाढत आहे. तसेच, बाहेरचा समाजही काही ना काही निमित्ताने आदिवासी भागात वावरू लागला आहे. त्याचा परिणाम म्हणजे दोघांच्याही जीवनावर एकमेकांच्या संपर्काने परिणाम घडत आहे. देशात सर्वत्र भौतिकशास्त्राच्या प्रगतीमुळे एक बदल घडून येत आहे. 'अवकाशयुग' किंवा 'अणुशक्ती युग' सुरू झाले आहे असे आपण आता बोलत असतो. पृथ्वीपासून ५०० मैल उंचीवरून मनुष्य अवकाशात चालू शकतो. एखादे अवकाशयान पृथ्वीपासून २ १/२ / ३ लाख मैलांवर असणाऱ्या चंद्राभोवती फिरू शकते व तेथून संदेश व छायाचित्रे पाठवू शकते, किंवा एखादा हायड्रोजन बॉंब सगळे जग एका सेकंदात नष्ट करू शकतो. ह्या ज्या गोष्टी घडून येतात त्यांना आपण शास्त्राचा विकास म्हणतो. हा विकास जंगलातील आदिवासींपर्यंत जाऊन पोहोचला नसला तरी त्यांना ह्याबद्दलची माहिती अनेक मार्गांनी होऊ लागली आहे. आज ना उद्या हे सर्व शोध त्यांच्यापर्यंत जाऊन पोहोचतील. अवकाशयानातील माणसे लवकरच आदिवासींमधून घेतली जातील. तसेच अण्वस्त्रे किंवा हायड्रोजन बॉंब तयार करण्यातही त्यांचा हात राहील. कदाचित ह्या शक्तीचा उपयोग त्यांचेकडून विधायक कार्याकरिता होऊन सर्व जीवनच बदलेल.

येथे हे विसरता कामा नये की, २१ वर्षांवरील प्रत्येक आदिवासी प्रौढाला - स्त्रीला व पुरूषाला स्वतंत्र भारताच्या घटनेप्रमाणे मत प्राप्त झाले आहे. मागच्या अनेक निवडणुकांत त्यांनी आपला हक्क बजाविला आहे. इतकेच नव्हे तर लोकसंख्येच्या प्रमाणात लोकसभेवर, राज्य कायदेमंडळावर त्यांनी आपले आदिवासी सभासदही निवडून दिले आहेत. त्यायोगे मंत्रिमंडळातही त्यांचा मंत्री, उपमंत्री म्हणून समावेश झाला आहे. ही मंत्रिमंडळेच अवकाशयानातून कोणाला पाठवावयाचे, अण्वस्त्रे कोणी बनवायची, त्यांचा उपयोग कधी व कसा करावयाचा वगैरे बाबी ठरवीत असतात. हे ठरविण्याचा ह्या आदिवासी मंत्र्यांनाही अधिकार आहे.

आफ्रिका खंडातील बहुतेक सर्व आदिवासी स्वतंत्र झाले असून त्यांनी आपली स्वतंत्र अशी राष्ट्रे बनविली आहेत, असे दृश्य आपणास दिसते. तसेच ही राष्ट्रे इतर पुढारलेल्या राष्ट्रांच्या बरोबरीस कशी लवकर येतील याबद्दल यांचे जोराचे प्रयत्नही चालू आहेत. भारतात आदिवासींपैकी नागा व मिझो ह्या जमातींनी भारतापासून फुटून निघून स्वतंत्र राज्य बनविण्याकरिता मागची १७/१८ वर्षे भारताबरोबर सशस्त्र लढा दिला आहे. कोणती तरी परकीय सत्ता त्यांच्यामागे होती असे अनुमान काढता येते. पण ह्या परकीय प्रेरणेचा परिणाम इतका काळ सशस्त्र बंडात होऊ शकतो ही एक ध्यानात घेण्यासारखी घटना होय. काही वर्षांपूर्वी जगदाळपूरमध्ये जे अनिष्ट प्रकार घडले, ते त्या भागाचे आदिवासी जनतेतील जागृती दर्शवितात. बिहारमध्ये आदिवासींचे निराळे राज्य (झारखंड) मिळविण्याकरिता प्रयत्न चालू होते, तर महाराष्ट्र राज्यात कम्युनिस्ट तत्त्वज्ञानास आदिवासी जनतेचा पाठिंबा कमी होत आहे, हे कशाचे द्योतक आहे? आदिवासी जनतेच्या मनःस्थितीत मोठाच फरक घडून येत आहे ह्याचे हे चिन्ह होय. त्यांची राजकीय जागृती व त्याचबरोबर

झालेला त्यांचा निराशावाद त्यांच्या असंतोषाचे मुख्य कारण होय. त्यांचे दारिद्रय व बेकारी नष्ट करण्याचे खरे प्रयत्न झाल्याखेरीज त्यांचा असंतोष मिटणार नाही हे त्याचे उत्तर आहे.

संस्कृतीमध्ये धर्म ही एक घटना आहे. त्यांचा धर्म प्रकृतिवाद आहे. हे आदिवासी हिंदू धर्मीयांबरोबर हजारो वर्षे राहात आले. हिंदू धर्मीयांनी त्यांना आपणात मिसळवून घेण्याचा प्रयत्न केव्हाही केला नाही. उलट, त्यांच्यावर प्रभुत्व कसे गाजवावे व त्यांना आपले गुलाम कसे करावे हाच आपला प्रयत्न असे. पण या प्रयत्नात हिंदू धर्मीयांना यश आले नाही. कारण आदिवासी मंडळी अगदी दूरच्या जंगलांचा आश्रय घेती झाली. दुसऱ्या धर्मातील लोकांना आपल्या धर्मात घेण्याची हिंदू धर्मीयांत प्रवृत्ती नाही. त्याची कारणे अनेक असू शकतील. पण मुख्य कारण त्यांच्यातील जातिभेद हे असावे. कारण, धर्मांतर केल्यावर कोणास कोणत्या जातीत घालावयाचे तसेच ती जात अशा माणसाला सामावून घेण्यास तयार होईल काय ? असे गुंतागुंतीचे प्रश्न उद्‌भवतात. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे आदिवासी जनतेची आपल्या धर्मावरील श्रद्धा ही होय. ह्या श्रद्धेमुळेच आज ते हजारो वर्षे आपले स्वतंत्र जीवन जगत आहेत. त्यांच्या धर्माप्रमाणे त्यांच्या अगदी स्वतंत्र अशा देवता आहेत. ह्या देवता म्हणजे त्यांच्या रोजच्या जीवनावर ज्यायोगे परिणाम होईल अशाच प्राकृतिक पंचमहाभूतांसारख्या होत. त्यांचे म्हणणे आहे की, प्रत्येक महाभूतामागे एक अदृश्य अशी शक्ती आहे. तसेच, पूर्वजपूजा, हेही त्यांच्या धर्मांचे एक वैशिष्टय आहे. ह्या पूर्वजांचा प्रत्येक कौटुंबिक कृत्यावर परिणाम होत असतो. अशी त्यांची भावना आहे. मरणानंतर पूर्वज भूतपिशाच्चे होतात असा त्यांचा समज आहे. आपल्या देवतांकरिता त्यांनी कधी मंदिरे बांधली नाहीत किंवा त्यांची पूजाही केली नाही. त्यांची पूजा म्हणजे ह्या देवदतांना कोंबडा अगर बकरा बळी देणे हीच होय. त्यांचे उपाध्याय म्हणजे त्यांचे 'भगत'. ह्या भगतांमार्फत त्यांना कळायचे की, एखादा पूर्वज आपणावर रागवला आहे आणि त्याचा राग घालविण्याकरिता काय करावयाचे, तेही ह्या भगतांकडूनच समजायचे.

जे पुढारलेले आदिवासी आहेत ते लग्न, मरण वगैरे प्रसंगी हिंदू धर्मीयांप्रमाणे वागू लागले आहेत. लग्नकार्यात गावची सगळयात वडील स्त्री धवलेरी, तिचा आता भाग राहिलेला नाही. तिच्याऐवजी उपाध्याय आला आहे. लग्न म्हणजे नाच ह्या कल्पनेसही फाटा मिळाला आहे. मरणोत्तर पिंड देण्याची प्रथा त्यांच्यात सुरू झाली आहे. पण हिंदू धर्मांतील अनेक चालीरीती त्यांनी स्वीकारलेल्या असल्या तरी ते पुरे हिंदू बनलेले नाहीत. आदिवासींना हिंदू म्हणण्याचा प्रयत्न करणे तसे धाडसाचे होईल.

आता आपण ख्रिस्ती धर्माकडे वळू या. ह्या देशात सुमारे दोन कोटी ख्रिस्ती असतील. त्यांपैकी आदिवासी किती हे सांगता येणार नाही, पण त्यांची संख्या फारशी नसावी असे दिसते. काही राज्यांत, विशेषत: आसाम, नागालँड, मिझोराम, मेघालय, अरूणाचल, बिहार व मध्यप्रदेश ह्या राज्यांत त्यांची संख्या जास्त असेल, पण इतरत्र ती अगदी थोडी दिसते. उदाहरणार्थ, महाराष्ट्रात ५७ लाख आदिवासींत सुमारे १० ते १५ हजार गेल्या १०० / १५० वर्षात ख्रिस्ती झाले आहेत. बहुसंख्य आदिवासींच्या जीवनावर ख्रिस्ती धर्माचा फारसा परिणाम झाला आहे असे वाटत नाही. ख्रिस्ती मिशनऱ्यांना आदिवासींकडून तसा फारसा प्रतिसाद मिळत नसतो. दुष्काळ, पूर व इतर आर्थिक समस्यांनी पीडलेले आदिवासीच ख्रिस्ती बनतात. पण इतर आदिवासी जनता मिशनऱ्यांच्या प्रलोभनाला बळी पडत नसते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मिशनरी प्रवृत्तीला बराच आळा बसला आहे. आसाम, नेफा वगैरे भागांत ब्रिटिश आमदानीत ख्रिस्ती धर्माचा प्रसार बऱ्याच मोठ्या प्रमाणात झाला असला तरी धर्मांतराने त्यांच्या जीवनावर फारसा परिणाम झाल्याचे दिसत नाही. धर्मांतरित मंडळी गुप्तपणे प्राणिपूजा व निसर्गपूजा ( ॲनिमिझम ) अंमलात आणीत असतात. हे धर्मांतरित जरी स्वत:स इतरांपेक्षा श्रेष्ठ मानीत असले तरी इतर आदिवासी त्यांच्याकडे हे हीन आहेत ह्याच दृष्टीने पाहतात. दुष्काळ, पूर वगैरे बाबतीत सरकारने योग्य त्या उपाययोजना केल्या आहेत. तसेच शिक्षण सक्तीचे केले आहे. इतर विकास योजनाही अंमलात आणल्या आहेत. आता मिशनऱ्यांचे काहीच चालणार नाही हे निर्विवाद होय.

शहरी जीवन, उद्योगीकरण वा साप्ताहिक बाजार ह्या आर्थिक बाबी आहेत. मानवशास्त्रज्ञ म्हणतात त्याप्रमाणे ह्या बाबींचा संबंध संस्कृतीशी नाही. आपण शहरी जीवनच पत्करावे असे आदिवासींना वाटत नाही. अगदी थोडे आदिवासी लोक शहरांत स्थायिक झाले आहेत. मुंबईसारख्या ८० लाख वस्तीच्या शहरात उणेपुरे ८० हजारही आदिवासी नाहीत. त्यांपैकी २०/२५ हजार आदिवासी मुंबईच्या जुन्या रानावनात असतात. बाहेरून मुंबईस येणाऱ्या आदिवासींची संख्या फारच कमी आहे. तसेच, दिल्ली हे भारताच्या राजधानीचे शहर. त्याची वस्ती आता २० लाखांच्या वर गेली आहे. पण तीत आदिवासी औषधालाही मिळणार नाही. ५ कोटी आदिवासींपैकी १० लाख आदिवासीसुद्धा शहरी उद्योगधंद्यांत शिरले आहेत असे दिसत नाही. शहरी जीवन हे ग्रामिण व जंगली जीवनाहून अगदी भिन्न आहे. जंगलातून आल्यावर तेथील आदिवासींना आपले घरदार व शेती याबद्दलचा आर्थिक मोबदला स्वीकारून आपले मूळ वतन सोडावे लागते. अशा परिस्थतीत काही आदिवासी बांधव आणखी आतील भागात जातात तर काही त्या भागात जे नवे शहर वसू लागते त्यात जाऊन राहू लागतात. त्यांना मिळालेला आर्थिक मोबदला शहरातील व्यसनापायी केव्हाच संपून जातो. त्यांना धंद्याचे प्रशिक्षण नसल्यामुळे शहरात आदिवासी साधे मजूर बनतात व कसेतरी आपले पोट भरतात. त्यांचे जुने संस्कारी जीवन शहरात नष्ट होते व इतर मजूर त्यांच्याकडे पाहताना ते कोणी रानटी आहेत अशीच दृष्टी ठेवतात. आपले उद्दिष्ट असे आहे की, उद्योगधंद्याचे विकेंद्रीकरण होऊन ग्रामीण भागात धंदे जावेत. त्याकरिता दळणवळणाची साधने, पाणी, वीज वगैरे साधने सरकारने त्यांना उपलब्ध करून द्यायची. जंगल भागासंबंधी म्हणावयाचे तर जंगलउद्योगांना पुष्कळ वाव आहे. जंगलाचे उद्योगीकरण झाले तर आदिवासी बांधवांना त्यांच्या गावी काम व पैसा मिळू लागेल व ते शहराकडे धाव घेणार नाहीत हे निश्चित. उद्योगीकरणामुळे आदिवासी जीवनावर काय परिणाम होतात हे वर आले आहे. पण असे आदिवासी मूठभरच आहेत. त्यांच्या जीवनात शहरी जीवनाने क्रांती होत असली तरी तीन कोटी आदिवासींच्या नेहमीच्या जीवनावर त्याचा काहीच परिणाम होत नसावा.

शहरी जीवन किंवा उद्योगीकरण ह्यायोगे आदिवासी जीवनावर तितकासा परिणाम घडत नसला तरी साप्ताहिक बाजार अगर बाजाराच्या जागा ह्यांचा त्यांच्या जीवनावर बराच परिणाम होत असतो. साप्ताहिक बाजार देशाच्या कानाकोपऱ्यातून भरत असतात. त्या बाजारांना हजारोंच्या संख्येने दूरदूरचे आदिवासी बांधव येत असतात. त्यात त्यांच्या स्त्रियांचा भरणा फार मोठा असतो. त्याचप्रमाणे आदिवासींखेरीज इतर जनताही शेकडोंच्या संख्येने तेथे गोळा होते. ह्यायोगे वस्तूंची देवाणघेवाण तर होतेच पण एकमेकांचा संपर्कही वाढण्यात संधी मिळते. ह्यायोगे दोघांच्याही जीवनावर हळूहळू परिणाम होत असतात, तसेच आदिवासींची राजकीय प्रगती पाहता इतर मंडळी त्यांच्या बरोबर समानतेच्या भावनेने वागतात.

आपल्या समाजाचे पारंपरिकेतून आधुनिक अवस्थेत परिवर्तन होत असताना ताण व संघर्ष निर्माण होणे अपरिहार्य असते. त्या संघर्षाची कारणे शोधून काढणे व त्यांच्या अनिवार्य परिणामाची तीव्रता कमी करणे हे उचित होय. आता आपण आदिवासींच्या समाजाचा त्या दृष्टीने विचार करू.

आदिवासींमधील नव्या नेतृत्वाने आपल्या जमातीत राष्ट्रीयत्वाची जाणीव निर्माण केली आहे. भारताच्या घटनेने आदिवासींना केंद्रीय आणि राज्यांतील कायदेमंडळात राखीव जागा दिल्या आहेत. काही राज्यांतील मंत्रिमंडळात आदिवासींचा समावेश केला गेला आहे. पंचायत राज्यातही त्यांना प्रतिनिधित्व मिळाले आहे. या सर्व गोष्टींमुळे त्यांच्यात राष्ट्रीय भावना उद्भवली आहे. संस्थांतील निवडणुका लढविताना त्यांना राजकीय क्षेत्रातील प्रशिक्षण मिळत गेले आहे. परंतु घटनेतील खास तरतुदींनी आदिवासींचे समाधान झाले नाही.

आदिवासी जनता व इतर जनता यांत आर्थिक क्षेत्रात उद्भवणाऱ्या संघर्षाविषयी मला जास्त चिंता वाटते. प्राथमिक अवस्थेतील शेतीही न करता जंगल उत्पादन व जंगली जनावरांची शिकार यांवर चरितार्थ चालविणारे काही आदिवासी आजही आढळतात हे खरे.

पण त्यांची संख्या अत्यल्प असून ती उत्तरोत्तर कमी होत आहे. आदिवासींचा दुसरा एक गट, 'बदलती शेती' (शिफ्टिंग कल्टिव्हेशन) करणारा आहे. या गटात सुमारे २५ लाख आदिवासी असून भारताच्या ११ राज्यांतील सुमारे १५ लाख एकर जमिनीत ते दरसाल बदलती शेती करतात. बदलत्या शेतीचे अनिष्ट परिणाम त्यांना पटवून देण्याचे सरकारने व समाजसेवकांनी खूप प्रयत्न केले. पण त्यास यश आले नाही. या प्रश्नाविषयी श्री. एम. डी. चतुर्वेदी व श्री. एस. एच. हॉचर्ड (पूर्वीचे इन्सपेक्टर जनरल ऑफ फॉरेस्टस्) तसेच नियोजन मंडळाचे कार्यक्रमविषयक सल्लागार श्री. एम. एस. शिवरामन आणि आदिवासी विषयाचे एक तज्ज्ञ श्री. जे. पी. मिल्स या सर्वांनी व्यक्त केलेले विचार लक्षात घेतले पाहिजेत. बदलती शेती म्हणजे जमिनीचा अशास्त्रीय उपयोग हा समज त्यांच्या मते चुकीचा आहे. तसेच बदलत्या शेतीमुळे जमिनीची मोठया प्रमाणावर धूप होते हा समजही त्यांच्या मते चुकीचा आहे. याविषयी ढेबर कमिशनने आपल्या अहवालात पान १४६ वर म्हटले आहे- 'सुमारे १० टक्के' आदिवासी बदलत्या शेतीवर आपली उपजीविका करतात. बदलत्या शेतीविषयी सर्व तज्ज्ञांत एकमत नसताना त्यांना (आदिवासींना) आपल्या जमिनीस मुकावयास लावणे बरोबर ठरणार नाही. बदलती शेती ही आदर्श पद्धत नव्हे. याबद्दल सर्वांचे एकमत आहे. शक्य तेव्हा 'टेरेसिंग' आणि लागवडीच्या इतर पद्धती सुरू केल्या पाहिजेत याबद्दलही सर्वांचे एकमत आहे. परंतु विस्तृत प्रमाणशीर टेरिसिंग करणे शक्य नसल्याने बदलती शेती काही काळ चालू राहील असे दिसते.

खादी आयोगाने या प्रश्नाचा खोलवर विचार केला आहे. बदलत्या शेतीचा शास्त्रशुद्ध पायावर विकास करून त्यातील अपाय मर्यादित करणे; जमिनीचा कस वाढविणे आणि त्यासाठी अशा सर्व भागांत संशोधन करणे, हे धोरण योग्य ठरेल असा निष्कर्ष खादी आयोगाने काढला आहे. आदिवासींचे स्थिर शेतकरी म्हणून पुनर्वसन करण्याचा प्रयत्न करणारे सरकार व आदिवासी यांच्यात या क्षेत्रात कुरबूर निर्माण झालेली आहे.

आदिवासींचा तिसरा गट म्हणजे स्थिर शेती करणारा आणि जगंलकाम करून पुरवणी उत्पन्न मिळविणारा. आदिवासींमध्ये हा तिसरा गट सर्वात मोठा आहे. हा गट आता राजकीयदृष्टया जागृत झाला आहे. त्यातून नवे नेते उदयास आले आहेत. मंत्रिमंडळातील आदिवासी प्रतिनिधी तसेच राज्यातील कायदेमंडळे, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या, ग्रामपंचायती वगैरेमधील आदिवासी प्रतिनिधी या गटातील आहेत. या विशिष्ट वर्गाला प्रगती हवी असली तरी आपली स्वत:ची जीवनपद्धती बदलण्यास ते तयार नाहीत. जमीनदार, लहान व्यापारी, जंगलाचे ठेकेदार, सरकारी अधिकारी वगैरेंकडून आदिवासींची होणारी पिळवणूक थाबंली पाहिजे असे त्या वर्गास वाटते, आणि ह्याच ठिकाणी संघर्ष निर्माण झाला आहे. ही पिळवणूक नष्ट करण्यासाठी आदिवासी प्रतिनिधी झगडत आहेत. त्यांचे प्रयत्न बऱ्याच अंशी यशस्वी झाले आहेत.

आदिवासी व बिगर आदिवासी सभासदांच्या सरकारवरील प्रभावामुळे कूळ कायदा, कमाल जमीन धारणा कायदा, हस्तांतर जमिनीचा कायदा, आदिवासींची आर्थिक स्थिती सुधारणा कायदा, १९७६, एकाधिकार धान्य खरेदी कायदा, सावकारी नियंत्रण कायदा, जमीनदारी व तालुकादारी नष्ट करणारे कायदे करण्यात आले. आदिवासी हा आपल्या ग्रामीण समाजातील अत्यंत पिळला गेलेला वर्ग असल्यामुळे ह्या कायद्यांनी त्याला बराच दिलासा मिळाला आहे.

परंतु आदिवासींना मिळालेल्या जमिनीचे क्षेत्र अत्यंत लहान आहे. त्यातील पिके सर्वस्वी पावसावर अवलंबून असल्याने दर चौथ्या किंवा पाचव्या वर्षी पावसाच्या अवकृपेमुळे पिके नष्ट होऊन आदिवासींची संपूर्ण अर्थव्यवस्था कोलमडते. ती अर्थव्यवस्था पुन्हा सावरण्यास कित्येक वर्षे लागतात. चांगला पाऊस झालेल्या वर्षीही शेतीचे उत्पन्न जेमतेम दोन - तीन महिने पुरते. ढेबर कमिशनने म्हटल्याप्रमाणे लावणीचे काम संपल्यावर दुसरे काम नसल्याने पावसाळ्याचे किमान दोन महिने बहुसंख्य आदिवासींना कंदमुळांवर निर्वाह करावा लागतो. या काळातील उपासमार व वर्षाच्या इतर महिन्यांतील अर्ध - उपासमार आदिवासींना अतिशय जाणवते. पंचवार्षिक योजनांवर कोटयावधी रूपये खर्च होऊनही हा प्रश्न सुटलेला नाही. ही परिस्थिती कधी आणि कशी सुधारणार असा

आदिवासींचा प्रश्न आहे. आदिवासी विकास गटामुळे व आदिवासी उपयोजनेमुळे त्यांचे दारिद्र्य व बेकारी हे मुख्य प्रश्न सुटलेले नाहीत. पिण्याच्या पाण्याच्या विहिरी, वाहतुकीसाठी जोडरस्ते, शाळांच्या इमारती यांसारख्या काही सोयी उपयोजना विकासामुळे कार्यरत आहेत हे खरे, तथापि या क्षेत्रातील शेतीवरच भर दिला आहे. सुमारे ४० ते ५० टक्के आदिवासी भूमिहीन मजूर आहेत आणि बाकीचे आदिवासी त्यांच्यापाशी वरकस जमीन धरून १ ते १० एकरापर्यंत म्हणजे अपुरीच जमीन आहे. १० एकरांपेक्षा जास्त जमीन असणाऱ्या म्हणजेच सुमारे १० टक्के आदिवासी शेतकऱ्यांना फायदा मिळतो. उरलेल्या सुमारे ९० टक्के आदिवासींना याचा काहीच उपयोग होत नसल्याने त्यांच्यात बराच असंतोष आहे.

कुरबुरीचे आणखी एक कारण म्हणजे सध्याचे जंगलविषयक धोरण. ढेबर कमिशनने आपल्या अहवालात याविषयी एक संपूर्ण प्रकरण लिहिले आहे. जंगल ठेकेदाराच्या ऐवजी जंगल कामगारांच्या सहकारी संस्थांकडे जंगलाचे काम द्यावे असे अहवालात म्हटले आहे. मध्यवर्ती शासनाने राज्य सरकारांना अशीच सूचना केली असून जंगल कामगार सोसायटया सुरू करण्यासाठी पैशाची व्यवस्था केली होती. ढेबर कमिशनने याबाबत जोराची शिफारस केली आहे. १९६१ मध्ये ढेबर कमिशनने आपल्या अहवालात म्हटले की, महाराष्ट्र व गुजरात यात असलेल्या सुमारे ७०० जंगल कामगार सोसायटयांखेरीज बाकीच्या भारतात अशा फक्त ९० सोसायटया आहेत. जुन्या मुंबई राज्यात १९४८ सालात या सोसायटया सुरू झाल्या आणि आदिवासींत त्या अतिशय लोकप्रिय झाल्या. या सहकारी आंदोलनामुळे आदिवासींचे सुप्त गुण प्रकाशात आले. प्रचंड कामे सहकारी पद्धतीने व कार्यक्षमतेने पार पाडण्याची कुवत आदिवासी लोकांत आहे हे त्या चळवळीने जगास दाखवून दिले आहे. महाराष्ट्र व गुजराथ राज्यांत अशा सोसायटयांची संख्या व काम वाढविण्याची पद्धतशीर योजना इतर राज्यांना जंगल ठेकेदाराची पद्धत बंद करून सहकारी पद्धतीने कार्य सुरू करण्याचा प्रयत्न झाला. उपयोजना क्षेत्रांत आदिवासी सहकारी संस्था उभारण्यात आल्या आहेत. आदिवासींच्या दैनंदिन गरजा व शेतीच्या गरजा भागविल्या जाव्यात हा त्यामागील मुख्य उद्देश आहे. एकाधिकार धान्य खरेदी या संस्थेमार्फतच केली जात आहे. ठेकेदारीची पद्धत भारतीय घटनेच्या ४६ व्या कलमाविरूद्ध आहे. आदिवासींनी सहकारी पद्धतीने जंगल उद्योग सुरू केले तर त्यांच्या बेकारीच्या तीव्र प्रश्नांची सोडवणूक करता येईल. अमेरिका, स्वीडन इत्यादी प्रगत राष्ट्रांत जंगल उद्योगाचे हजारो कारखाने गेली कित्येक वर्षे चालू आहेत. मात्र भारतात गेल्या १०० वर्षांत अशा प्रकारचे जेमतेम २५० कारखाने चालू आहेत. जंगल उद्योगाचे कारखाने यापुढे आपण मोठ्या प्रमाणावर सुरू केले पाहिजेत. भारतात जंगल विपुल असल्याने दूरवरच्या जंगलातच असे कारखाने सहकारी पद्धतीने सुरू करणे शक्य आहे. या कारखान्यांत आदिवासींना काम मिळेल व शिवाय व्यवस्थापन आणि तांत्रिक काम प्रशिक्षण त्यांना मिळू शकेल. जंगल मालावरील प्राथमिक प्रक्रिया आदिवासी आपल्या खेडयातच श्रमप्रधान मार्गांनी करू शकतील. नंतरच्या प्रक्रिया जंगलातच असलेल्या सुसज्ज आधुनिक कारखान्यांत होऊ शकतील. परंतु जंगल विभागापासून कारखाने दूर जात आहेत. त्यामुळे सध्याच्या बेकारीत भर पडत आहे. जंगल संपत्तीच्या विकास व शास्त्रीय पद्धतीचा उपयोग याला कोणाचा विरोध असणार नाही. स्थानिक आदिवासींना प्रशिक्षण देऊन त्यांच्यावर ही जबाबदारी सोपवावी. जंगलवाढ झाली पाहिजे. त्यांत स्थानिक आदिवासी सहभागी केल्याविना जंगलवाढ कशी होणार? त्याचाही विचार झाला पाहिजे.

आदिवासींचा एक चौथा वर्ग आहे. पोलादचे कारखाने, विजेचे कारखाने, खाणी वगैरे सुरू झाल्यामुळे ज्यांना स्थलांतर करावे लागले अशा आदिवासींचा हा वर्ग आहे. बिहार, ओरिसा, पश्चिम बंगाल व मध्यप्रदेश, महाराष्ट्र यांतील काही आदिवासी विभागांत कारखाने आहेत. इतर राज्यांनीही जंगल विभागात लहान प्रमाणावर असे कारखाने सुरू केले आहेत. यामुळे किती आदिवासींना स्थलांतर करावे लागले, त्याचा अधिकृत आकडा मिळत नाही. परंतु माझ्या अंदाजाप्रमाणे तो आकडा सुमारे ५ लाखांचा असावा. उद्योगीकरणाचा आदिवासींवर काय परिणाम झाला याविषयी ढेबर कमिशनने आपल्या अहवालात एक प्रकरण लिहिले आहे. व्यक्ती, कुटुंब, समाज आणि परिस्थिती यावर औद्योगिक विकासाचा परिणाम होतो असे कमिशनने म्हटले आहे. यातून मानसिक, सामाजिक व आर्थिक

परिणाम होतात. उद्योगीकरणाच्या प्रश्नाचा या व्यापक संदर्भात अजून विचार केला गेला नाही आणि याविषयीचे संशोधन अगदी अपुरे आहे.

आदिवासींचे सक्तीने स्थलांतर हा सखोल महत्त्वाचा सामाजिक व नैतिक प्रश्न आहे. याची पुरेशी जाणीव संबंधितांना दिसत नाही. पिढयान् पिढयांची घरे आणि कामाची ठिकाणे सोडून आदिवासींना स्थलांतर करावे लागले. सरकारने जागा ताब्यात घेण्याच्या पद्धतीचा तपशील आदिवासींना माहीत नसल्याने, मिळाली तेवढी रोख भरपाई घेऊन त्यांनी घरेदारे सोडली. जवळपासच्या उद्योगनगरांतील अनेक आकर्षणांमुळे त्यांच्या खिशातील पैसा संपण्यास वेळ लागला नाही. यामुळे लवकरच ते निष्कांचन व भूमिहीन बनले. कोणत्याही कुशल अगर अर्धकुशल कामाचा अनुभव किंवा प्रशिक्षण नसल्यामुळे ते सारे आदिवासी भूमिहीन मजूर बनले.

ढेबर कमिशनच्या सात शिफारशी पुढे सारांशाने दिल्या आहेत :-

(१) वन्य विभागांत कारखाने सुरू झाल्याने, तसेच बाहेरील हितसंबंध तेथे आल्यामुळे आदिवासींवर काय परिणाम झाला त्याचे शास्त्रीय संशोधन तातडीने झाले पाहिजे.

(२) औद्योगिक योजना आणि पुनर्वसन योजना एकत्रित केल्या पाहिजेत. स्थलांतर करावे लागलेल्या लोकांनाही औद्योगिक योजनांचा लाभ मिळाला पाहिजे.

(३) पुनर्वसन योजनांत स्थलांतरित व्यक्तींचे शिक्षण-प्रशिक्षण वगैरेंच्या कार्यक्रमाचाही समावेश केला पाहिजे.

(४) स्थलांतरित आदिवासींसाठी त्या भागात एक वर्कशॉप किंवा उद्योग प्रशिक्षण केंद्र सुरू केले पाहिजे.

(५) कारखान्यांतील लोकांसाठी अन्नधान्ये, भाज्या, अंडी, मांस वगैरेंच्या निर्मितीसाठी स्थलांतरित आदिवासींना त्या भागातून जमीन व इतर सवलती मिळाल्या पाहिजेत.

(६) पाणीपुरवठा, आरोग्याच्या सोयी, शाळा, दवाखाने वगैरेंनी युक्त अशा नव्या वसाहती सुरू कराव्यात. आपल्या नेहमीच्या नैसर्गिक वातावरणातच आपण आहोत असे त्यांना वाटले पाहिजे.

(७) कारखान्यांतील कायम नोकऱ्या मिळण्याबाबत स्थलांतरित आदिवासींना अग्रहक्क मिळाला पाहिजे.

काही प्रमुख विचारवंतांचे या महत्त्वाच्या प्रश्नाकडे लक्ष गेले आहे. त्यांपैकी एक श्री. के. मल्होत्रा यांनी ' उद्योगीकरणाचा आदिवासींवरील परिणाम ' हा विचारप्रवर्तक लेख लिहिला आहे. उद्योगीकरणाच्या परिणामांचे पृथक्करण त्यांनी पुढीलप्रमाणे केले आहे. :-

(१) तांत्रिक कार्यक्षमता आणि आकडेवारी यांच्या संदर्भात सर्व प्रश्नांचा विचार करणाऱ्या अर्थपंडितांकडून उद्योगाचे नियोजन केले जावे.

(२) आदिवासींमधील हितसंबंधी लोकांनी उद्योगीकरणाचा फायदा मिळवून गरीब आदिवासींची पिळवणूक करण्यास त्यांना साधन मिळते.

(३) उद्योगीकरणामुळे परंपरागत सामाजिक संस्था नष्ट होऊन आदिवासींच्या सामूहिक जीवनास तडे जातात.

(४) उद्योगीकरणामुळे जुनी मूल्ये नष्ट होऊन जी नवी मूल्ये उदयास येतात ती आदिवासींना मानवत नाहीत.

(५) उद्योगीकरणामुळे उपभोग्य वस्तूंचा दर्जा कमी होऊन राहणीचा खर्च बेसुमार वाढतो.

(६) जुन्या मूल्यांची मोडतोड व नव्या अर्थव्यवस्थेची सुरुवात यामुळे लोकांच्या सवयी व गरजा प्रमाणाबाहेर वाढतात. पण त्यासाठी त्यांच्यापाशी पुरेसा पैसा नसतो.

आदिवासी समाजात नवा प्रवाह निर्माण होत आहे. आदिवासी दलितांना मिळणाऱ्या सवलतींचा हेवा अन्य जनांना वाटणे स्वाभाविक आहे. आदिवासींना मिळणाऱ्या सवलतींचा हेवा इतरांना का वाटावा? खरे म्हणजे तसा वाटायला नको. आदिवासी अद्याप अशिक्षित, अज्ञानी, असंघटित व अजागृत आहेत. त्याचा फायदा अपात्र सवलतदारांना होत आहे. अनेक खोटे, बनावट व मागासलेपणाचा बुरखा पांघरलेले लोक आदिवासींच्या सवलती प्राप्त करून खऱ्या आदिवासींना मागे ठेवत आहेत. परिणामी खऱ्या आदिवासींना शिक्षण, नोकरी आणि धंदे यांत मागे राहावे लागत आहे. आदिवासींसाठी धडपडणाऱ्या कार्यकर्त्यांना व हितचिंतकांना या प्रश्नाचे गांभीर्य अद्याप उमजलेले नाही. परंतु आदिवासी विकासातील ही धोंड हाच एक मोठा संघर्ष होण्याची भीती आहे. आता कुठे आदिवासी मुले शाळा-कॉलेजमध्ये जाऊ लागली आहेत व सवलतीला पात्र ठरत आहेत. परंतु या सवलती मिळण्याचे भाग्य त्यांच्या पदरात आहे की नाही हा यक्ष प्रश्न आता काळच सोडविणार आहे.

वरील सर्व गोष्टींमुळे समाजात संघर्ष निर्माण होतात. पण हे संघर्ष अनंतकाळ टिकणारे नाहीत. कालांतराने ते संघर्ष नष्ट होतील. वीज उत्पादक कारखाने, खाणी, नोकऱ्या वगैरे उद्योगांत फारच थोडया आदिवासींना काम मिळू शकेल. बहुसंख्य आदिवासी शेती व जंगल उद्योग यांवरच अवलंबून राहतील. उद्योगीकरणामुळे आपल्या बेकारीचा प्रश्न सुटणार नाही. तो जास्त गंभीर होईल. महाराष्ट्रात साखर कारखाने व सूतगिरण्या यांसारखे काही मोठे उद्योग सहकारी रीतीने चालू आहेत. इतर उद्योगही अशा रीतीने चालू करता येतील. जंगल विभागात जंगल उद्योग सहकारी रीतीने सुरू करणे शक्य आहे. त्यासाठी आदिवासींना योग्य ते प्रशिक्षण मिळाले पाहिजे. शिक्षण, शेती, सहकार, सहकारी जंगल उद्योगामुळे आदिवासींच्या बेकारीचा प्रश्न सुटल्यावर आदिवासींतील व इतरांतील सामाजिक संघर्ष नष्ट होऊन आदिवासी या देशातील समाजाशी एकरूप होऊन जातील.

(पान ३६ वरून चालू)

गुणदर्शनाच्या नावाखाली हुल्लडबाजीचा प्रकार की जो आज शहरांमधील शाळांमधून दिसतो तो दिसला नाही. तर या प्रसंगीसुद्धा या आदिवासी मुलांमध्ये त्यांच्या समाजाबद्दल, समाजात काय घटना चालल्या आहेत, आणि त्यावर कसे भाष्य करावयास पाहिजे याची जाण आहे. आदिवासी मुलांचा हा प्रयत्न वाखाण्यासारखा आणि शहरातील मुलांनी शिकण्यासारखाच आहे.

अशा तऱ्हेने २६ जानेवारी, गणेशोत्सव व शिवजयंती इत्यादी उत्सव साजरे करून महादेव कोळी आदिवासी हे त्यांच्या समाजात जागृती आणण्याचा, बदल घडवून आणण्याचा प्रयत्न करताना दिसतात.

दसरा आणि दिवाळी ते सांस्कृतिक सण आहेत. दिवाळी हा राम-सीतेचे लग्न असते म्हणून साजरी केली जाते. नवरात्राचा उत्सव अलिकडेच साजरा करावयास सुरूवात झालेली आहे. भैरवनाथाच्या मंदिरात नवरात्र १० दिवस साजरे केले जाते. पहिल्या दिवशी घटस्थापना केली जाते. सात प्रकारची धान्ये, गहू, सातु, हुलगा, वाल, साळी, नाचणी आणि हरबरा एकत्र करून केळीच्या पानावर त्याचा ढीग केला जातो. या ढीगावर पाण्याने पूर्ण भरलेले मातीचे भांडे ठेवले जाते. विडयाचे पान, नारळ, हळकुंड, कुंकू आणि फुले त्याला वाहिली जातात. दहाव्या दिवशी धान्ये उगवून वर आलेली असतात. विजयाचे प्रतीक म्हणून स्त्रीया ते उगवलेले धान्य डोक्यात घालतात. असे करण्यामागे त्यांचा असा विश्वास आहे की देवीने क्रूर राक्षसांना ठार मारून शांतता पसरविली. या दिवशी ही लोक आपटयाची पाने एकमेकांना वाटतात.

अशा तऱ्हेने आदिवासीमधील सामाजिक आणि सांस्कृतिक बदलाचा अभ्यास करीत असतांना ते साजरे करीत असलेले सण आणि उत्सव यांना महत्त्वाचे स्थान आहे. कारण त्यांच्या माध्यमातूनच सांस्कृतिक मूल्यांचे जतन केले जाते आणि नवीन मूल्यांचा परिचय, आणि स्विकार केला जातो.

# जथे

## उषाकिरण आत्राम

कालची खुरटी झाडे आता गर्द पालवू लागली
पंख तुटलेल्या राव्यांची त्यावर गर्दी दिसू लागली
कालचे बंदिस्त रावे, पिंजरा तोडून आले
अन् बेलाशक झाडावरची फळं चाखून चव सांगू लागले

माहितं नव्हता स्वाद, गंध; फक्त कळत होता गोडवा
मनसोक्त हुंदडतांना पानाफांद्यांवर स्वतःचाच मागोवा...
उंडता उडता रूतलेली रंगीबेरंगी धोंडयांवर
विष्ठा टाकून केली थोडीबटून समिक्षा...

आता आभाळनी क्षितिज, सागर नी मोती
पृथ्वी सुर्याचे नाते कळून चुकले त्यांनाही
बंदिस्त पिंजरे तोडून आभाळाचे घरटे केले
ढोलीत परत न फिरण्याची शपथ घेऊन
आभाळभर राव्यांचे थवेच्या थवें-

रावे बोलले 'आम्ही होणार नाही बंद
बोलणार नाही मिठू मिठू. खाणार नाही डाळीचे दाणें !
समोर उभे ठाकले गिधाडांचे थवें
अन् क्षणात सर्व रावें आभाळात पांगून गेले.....

# पुरावा

दशरथ मडावी

कोर्टात पुराव्याला फार महत्व
मग तो कसा का असेना !
खोटया पुराव्यांनी सत्यवान
फासावर गेला तरी कुणाचे काय जाते ?
परंतू पुरावा पाहिजे.

डाकूंच्या पुराव्यांनी सुटतात खुनी,
बहिष्कार घालणारे सुटतात निर्दोष,
पुराव्यांच्या विक्री सुलभेपुढे ...

परंतु एखाद्या गोंडावर! एखाद्या कोलामावर
अतीक्रमण केल्यावर गुन्हेगारं केले जाते
तेंव्हा,
त्याला प्रथम द्यावा लागतो
माणूस असल्याबद्दलचा पुरावा!

---

# रायसिंग ठाकरे

दोन भिलोरी कविता

१ :

कि कोहेरा हेगाते रा. दुष्काळ जमानो आलो हों,
ओन बी नाहा पाक्यों हेंगाते दुनीया हाल विहेरा .....
खाडया बी कुवा बी बोळाच आटाय, गिया हा,
पाय बी नाहा मिले हेंगते दुष्काळ ओली गियों होंरा ...
वाय वायरा, पोयरे रा उघडे नागडे फिरतेंहे,
खावटी नाहा मिले ऐगाते कामे पेदा जाहूरा ....
सरकार बी खुडची पे आराम केतो बोठो हों.
दुनिया हाल काय काय वेहे हेराला तयारी नाहा रा ...

वेगे आवरा, हेंगाते. रा बोयुने पहू मिलीने
शहादो तालुकाले हेंगाते मोर्चा लेते जाहू रा....

२ :

काष्टकरी भाय मारो डोंगरमा जाय
उपाशी तापाशी लाकडानी मोळी लावेसे....
तांती जेमे-तेमे घेरे आवे.
रोटेलो जोवेता खावटी नयी
कुकेळो गांगरीने वेचवाने निसरे......
शहाघाना बाजारमां वेचवाने जाय
मालदार सेळा बोलता नयी
किंमत आलवांनो दुःखे लाये....
मालदार ढेबरा बोलता नही
किंमत आलवानो दुःख लागे
खावटी सुटेना. मिरच नयी
ऐवी किमत ढेबरा बोले....
कष्टकरी केय से कष्टकरी भयाने
एकी करीने खतम करो मालदारी
हेला कष्टकरी राज्य लावानो से....

**अनुवाद,**

१ :

करतो काय अरे गडया, दुतांडी जमाना आला रं
पिकले नाही कुठले पीक हे दुनीयाचे आहेत हाल..
विहरी नी नद्यातले सारेच गेलेय आटून
पाण्याचा नाही पत्ता गडया दुष्काळ पसरला काठोकाठ ....
लहान लहान मुलं फिरतात उघडी नागडी
खावटीही नाही गडया शोधायला जाऊया काम...
सरकारही खुर्चीवर आराम करतेय खुशाल
बघत सुद्धा नाही दुनीयाची हालहवाल..
लवकर येरे गडया कातकरी बंधु भगिनी
शहाद्याच्या बाजराला मोर्चा घेऊन जाऊ....

२ :

कष्टकरी भाऊ माझा डोंगरात जातो
उपाशी तापाशी लाकडांची मोळी आणतो
तेथून जेमतेम झोपडीत पोचतो
भाकरीसाठी जवार नाही
कोंबडा आरवल्यावर सकाळी विकायला निघतो ...
शहाद्याच्या बाजारात विकायला जातो
मालदार हरामी बोलत नाही
किँमंत द्यायचा दुःख लागतो
खावटी सुटते तर मिरच्या नाही
अशी किंमत ढेरपोटया बोलतो...
एकी करू या नी नष्ट करू मालदारी
कष्टकऱ्यांवरच हे बंगले आहेत उभे
कष्टकऱ्यांच्या राज्यांची गोष्ट मी सांगतो...

---

## गाज

सोपान सुरकुले

सह्याद्रीच्या खोऱ्यात दारिद्रय पिकते
भरघोस पिकते.
इतके कि ते वर्षानुवर्षे पुरते
..असा शेतकोळी तुम्ही पाहीला का ?
रानातला पाला चवीला छान
स्वतःला वैभवाची घातलेली आण
मावळा म्हणून ओळख करून देतांना
या खोरीत मावळणारा तुम्ही पाहीला का ?
महादेवाचा पिंड जात्यावर ठेवून
दाणे दळत म्हातारी गाते
इतिहासाचे गाणे त्या गाण्यावर
झोपणारा वारा तुम्ही पाहिला का ?
पाहिला असालही बापये-
कदाचित ऐकला असाल

म्हणून तर गाजते तुमची चर्चा

मिळते डॉक्टरेट किंवा पुरस्कार तुम्हाला ;
अन् जुनाट वाडयात नादावी स्मशानशांतता
तसे हे महादेवी खोरे
आमच्या येते वाटयाला
सह्याद्री तुम्ही मी सर्वांनी पाहिला
आता सह्याद्रीतून
येत नाही प्रतिध्वनी, ऐकू येतो गाज
ढोलागत घुमतो प्रतीघात! प्रतीघात! प्रतिघात!

# पुस्तक परीक्षण :

**महाराष्ट्रातील आदिवासी : संस्कृती, समस्या व विकास**
**संपादक : डॉ. गोविंद गारे**
**आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे, १९८८,**
**लेख ३३, पृष्ठे १८६. किंमत रू. ३७-००**

महाराष्ट्र शासनाने आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था या संस्थेची स्थापना पुणे येथे ३ मे १९६३ रोजी केली. महाराष्ट्र राज्यातील आदिवासींची समाजरचना, अर्थव्यवस्था, कला, आरोग्य याबाबत संशोधन करणे, आदिवासी क्षेत्रात राबविल्या जाणाऱ्या योजनांचे मूल्यांकन करणे, कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण करणे इत्यादि कार्ये या संस्थेची आहेत. तसेच आदिवासी संस्कृति वस्तुसंग्रहालय आदिवासी संशोधन - पत्रिका संस्थेने स्थापन केल्या आहेत.

सदर ग्रंथ संस्थेच्या रौप्यमहोत्सवानिमित्त प्रसिद्ध करण्यात आला आहे. पुस्तक तीन भागात विभागले आहे.

**भाग पहिला** - आदिवासी विकास व समस्या : या भागात, आदिवासी विकासाच्या समस्या यांचा १९३८ च्या सिमिंग्टन अहवालापासून आढावा घेण्यात आला आहे. तसेच विकासाच्या दिशा, विकाससंस्था आणि स्त्री व जंगलविषयक कांही प्रश्नांबाबत चर्चा आहे. भारतासारख्या खंडप्राय देशात आदिवासींचे कितीतरी गट आहेत. आर्थिक, सामाजिक, धार्मिक आणि राजकीय विश्लेषण केले तर वेगवेगळे प्रभाव व वेगवेगळी परिस्थिती याचे आकलन होते. राजकीय जागृती व देशाच्या राजकीय प्रक्रीयेत आदिवासी प्रतिनिधी या महत्त्वाच्या बाबी आहेत. हिंदू धर्माचा पगडा असलेल्या सखल भागातही आदिवासी हिंदू झाला नाहीं. कदाचित जातीसंस्थेचा अडसर मधे आला असावा. ब्रिटिश राजवटीत पूर्व भागातील आदिवासी मोठ्या प्रमाणावर ख्रिस्ती झाले पण स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मिशनरींच्या धर्मांतर चळवळीस आळा बसला आहे.

१९३८ साली सिमिंग्टन या ब्रिटीश अधिकाऱ्याने धुळे जिल्ह्यातील आदिवासींची प्रत्यक्ष पाहणी करून त्याबाबतचा अहवाल शासनाला सादर केला. त्या अहवालातील बरेचसे निष्कर्ष आजही लागू पडतात. सावकारी, दारूचे व्यसन, सहकारी संस्थांची गरज, खरेदी - विक्री संघ, रोजगारविषयक परिस्थिती, वित्तपुरवठा असे कितीतरी प्रश्न सिमिंग्टनने हाताळले आहेत.

वाहरू सोनवणे व शरद कुलकर्णी यांचे जंगलविषयक समस्या आणि जमीन हस्तांतरण कायदाविषयक तरतुदी हे लेख उपयुक्त आहेत.

**भाग दुसरा** - आदिवासी शिक्षण : या भागात नऊ लेख आहेत. त्यापैकी तीन अनुताई वाघ यांचे व तीन डॉ. गोविंद गारे यांचे लेख आहेत. डॉ. गारे यांनी एकंदर शिक्षणविषयक समस्या व त्यावरील शासकीय उपाययोजनांची माहिती दिली आहे. अनुताई वाघ यांनी कोसबाड येथे आदिवासी शिक्षणविषयक अनेक प्रयोग केले आहेत. त्यावर आधारित माहिती व शिफारशी यांच्या लेखांत आहेत.

**भाग तिसरा** - आदिवासी साहित्य व कला. या भागात बारा लेख आहेत. त्यांत नृत्ये, लोकगीते, धार्मिक विधि, चित्रकला, हस्तकला, संग्रहालय इत्यादिविषयक लेख आहेत. आदिवासी संस्कृतीचे वैशिष्ठ्य व नेमकेपण कशात असते असे म्हटल्यास ते धर्म, कला, संगीत, साहित्य यांत असते असेच म्हणावे लागेल. समाज - संस्कृति परिवर्तनाचा परिणाम धर्म, कलांवर झपाटयाने होत नाही. संस्कृतीची शाश्वत मूल्ये धर्म, कला, साहित्य, संगीत यांत गुंफलेली असतात. आदिवासी संग्रहालये यावर विचारपूर्वक लेख संग्रहालय तज्ज्ञ डॉ. वसंत बेडेकर यांनी लिहिला आहे.

हा ग्रंथ विचार करावयास लावणारा व संग्रही बाळगण्यासारखा आहे.

**ए रिव्हयू ऑफ ट्रायबल रिसर्च स्टडीज**
**संपादक : डॉ. गोविंद गारे**
**आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे, १९८८**
**लेख ३२, पृष्ठसंख्या १६७ किंमत रू. ३५-००**

संस्थेच्या रौप्यमहोत्सवानिमित्त प्रकाशित केलेला हा दुसरा ग्रंथ. यांत २६ इंग्रजी व ६ मराठी लेख आहेत. आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेने २५ वर्षांत संशोधन व मूल्यमापन केलेल्या अहवालांचा आढावा या ग्रंथात घेण्यात आला आहे. यांत आदिवासी जीवनाशी निगडित असलेल्या सर्व शासकीय योजनांचे मूल्यमापन व त्याबाबत टिपण तशाच सूचना देण्यात आल्या आहेत.

**शिक्षणविषयक** : १) वसतिगृहांची उपयोजिता व वापर २) आश्रमशाळांचे मूल्यमापन ३) औद्योगिक प्रशिक्षण संस्था ४) स्वयंसेवी संस्थांच्या आश्रमशाळांचे मूल्यमापन ५) नाशिक जिल्ह्यांतील प्राथमिक व माध्यमिक शाळांतील गळती.

**जंगलविषयक** : १) जंगल कामगार सहकारी संस्थांचे कार्य २) आदिवासी अर्थव्यवस्थेतील जंगलांचे स्थान : ३) वनविषयक सवलती.

याशिवाय एकात्मिक विकास योजना, आरोग्य, कुष्ठरोग, जमीन हस्तांतरण, कर्ज व बांधील मजूर, पाटबंधारे योजना, पुनर्वसनाच्या समस्या इत्यादि अनेक योजनांच्या अध्ययनाबाबत लेख आहेत.

जंगलकामगार सहकारी संस्थांची संख्या १९४७-४८ साली ११ होती ती १९७७-७८ साली ४२२ झाली. याच काळात त्यांची सभासद संख्या ५०८ वरून ५६४०० वर गेली. परंतु बऱ्याच संस्था या नाममात्र आहेत. जंगलातील ठेकेदारांचे उच्चाटन झालेले नाही. विशेषत: वाहतूकीची साधने ठेकेदारांच्याच हातात आहेत. त्यामुळे या संस्थांचे उत्पन्न कमी आहे. आदिवासींची बेरोजगारी, त्यांच्याकरिता कल्याणकारी योजना या संस्था आखू शकल्या नाहीत. या संस्थांच्या माध्यमातून आदिवासी समाजात नेतृत्व उदयास आले. जमीन हस्तांतरणाबाबत असे आढळून येते की त्याबाबत अनेक कायदे करूनही आदिवासी अर्थव्यवस्था जमीन हस्तांतरणामुळे मागासलेल्या परिस्थितीत आहे.

ठाणे जिल्ह्यातील कर्जबाजारी व बांधील मजूरीविषयक अहवाल धक्कादायक आहे : त्यांतील प्रमुख निष्कर्ष असे :

१) ३१ टक्के आदिवासी कर्जबाजारी आहेत. बिगरआदिवासीत हे प्रमाण १२ टक्के आहे.
२) साधारण रू. ४२५ ते रू. ५२५ कर्ज प्रत्येक कुटुंबास आहे.
३) शेतकी करणाऱ्यांत कर्जबाजारीचे प्रमाण ५६ टक्के कुटुंबात आहे तर शेतमजुरांची २२ टक्के कुटुंबे कर्जबाजारी आहेत.
४) ६० टक्के कर्ज शेतकी कामासाठी तर ३० टक्के कर्ज लग्नकार्यासाठी घेतली जातात.
५) ५४ टक्के आदिवासींना व्याजाचा दर माहित नाही, २७ टक्के शेतमजुरीच्या रूपाने व्याज भरतात, १९ टक्के रोखीने अथवा भाताच्या रूपाने व्याज भरतात. पेरणीच्या वेळी दिलेला भात कापणीच्या वेळी दीड अथवा दुपटीने वसूल करण्यात येतो.
६) सावकाराकडील कर्जात ८० टक्के कर्जे लग्नाकरिता घेण्यात येतात.
७) ८ टक्के कुटुंबे बांधील मजूर आहेत. ९९ टक्के बांधील गडींनी लग्नाकरिता कर्ज काढले होते.

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था शासकीय असली तरी त्यांच्या संशोधनातून शासनाच्या योजनांच्या त्रुटी व आदिवासी समस्यांबाबत शास्त्रीय माहिती या ग्रंथात पाहावयास मिळते. हा ग्रंथ वाचनीय, मननीय व संग्राह्य आहे.



माडिया गोंड



माडिया गोंड युवती

Registered with the Registrar of News Papers of India Under No. 35835/80

**महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद**

आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत संशोधन, चर्चा व प्रकाशन.

कार्यकर्त्यांचे शिबिरांद्वारे प्रशिक्षण.

शासकीय, राजकीय व रचनात्मक कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना एकाच व्यासपीठावर आणून त्यांच्यात आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत आणि विकासाबाबत सुसंवाद घडवून आणणे.

मानव विज्ञान व सामाजिकशास्त्रे यांच्या शिक्षकांना व विचारवंताना, मुख्यतः आदिवासींबाबत अभ्यासकांना, एकत्र आणणे.

मानव विज्ञानाच्या सर्व शाखांत अध्ययन, संशोधन प्रकाशन.

या उद्देशाने 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' स्थापन करण्यात आली आहे. याच उद्देशाने मूर्त स्वरूप म्हणून 'हा का रा' सुरू करण्यात आला आहे. परिषदेचे सदस्यत्व स्वीकारून आपणही या कार्यात सहभागी व्हावे.

**मानव विज्ञान परिषदेचे सदस्यत्व**

| | |
|---|---|
| आजीव सभासद | २०० रूपये |
| परिषद वार्षिक सभासद | २० रूपये |
| आदिवासी कार्यकर्ते सभासद | १५ रूपये |

परिषदेच्या सभासदांना 'हाकारा' विनामूल्य पाठविला जातो.

आपले सदस्यत्व आणि वार्षिक वर्गणी कृपया खालील पत्त्यावर 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' (द महाराष्ट्र असोशिएशन ऑफ अँथ्रॉपॉलॉजिकल सायन्सेस) यांचे नावे पाठवावी. चेक पाठविल्यास अधिक दोन रूपयांची वटणावळ पाठवावी. मनीआर्डर पाठविल्यास फॉर्ममागे कृपया आपले पूर्ण नाव व पूर्ण पत्ता लिहावा.

**पत्रव्यवहाराचा पत्ता**

रा. के. मुटाटकर सचिव
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
६४, आनंद पार्क, औन्ध, पुणे ४११ ००७

**आपल्या क्रियाशील सहकार्याची अपेक्षा आहे.**